म.
वि
दा.
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २६४९
IRBK-0102649
IRBK-0102649
IRBK-0102649

# अन्धार-उजेड

गोविन्द केशव भट

IRBK-0102649
IRBK-0102649

जीवन-साहित्य : ६

प्रकाशक : विमल चित्रे,
खारीबाव, बडोदें
मुखपृष्ठ : दत्तात्रय गणेश गोडसे

सरकारी हुकुम नं. (D) १८२/१६४ ता. १-७-४७
प्रथमावृत्ति : ११०० प्रती : ता. १५ ऑगस्ट १९४७
किंमत रुपये तीन

मुद्रक : रमाकांत वेलदे,
सुदर्शन मुद्रणालय, नाशिक
सर्व अधिकार लेखकाधीन

# अंधार उजेड

गो. के. भट

ती. बाबूराव

आणि

सौ. यमुनाबाई सरंजामे

यांस

१. नाना असं कां करतात ? (‘समीक्षक’ : दिवाळी अंक १९४१) १
२. यथापूर्वम्… (‘ज्योत्स्ना’ : दिवाळी अंक १९४०) १९
३. मोरया (‘उन्मेष’ : फेब्रुवारी १९४२) ३१
४. मी स्त्री आहे (‘समीक्षक’ : ऑगस्ट १९४२) ३९
५. तुळशीचें लग्न (‘समीक्षक’ : फेब्रुवारी १९४२) ७१
६. ते मुंबईला येतात (‘समीक्षक’ : जानेवारी १९४६) ८३
७. सरदार (‘अभिरुचि’ : ऑगस्ट १९४४) ९९
८. अबोल रहिवासी (‘रागिणी’ : दिवाळी पुष्प १९४५) ११०
९. स्वाक्षरी (‘यशवंत’ : दसरा अंक १९४५) १२०
१०. अवसान (‘अभिरुचि’ : दिवाळी अंक १९४५) १४०

( ग्रं. क्रमांक........ )
२४५८

# नाना असं कां करतात ?

" रघ्या, खट मारलीस तूं ! "

प्रतिपक्ष्यानं मारलेली विटी झेलण्यासाठीं पवित्र्यांत उभा राहिलेला बंड्या एकदम पुढं झाला व त्यानं त्या मुलाच्या हातांतला दांडू धरला. तो मुलगा सांगूं लागला—

" चल...मी खट नाहीं मारली ! खोटं बोलतोस तूं ! "

बंड्या स्वतः कधीं खोटं बोलत नसे. आणि आतां हा मुलगा खोटं खेळून वर आपल्याला खोटं म्हणतोय, हें पाहून बंड्याला खूप संताप आला. त्यानं हाताच्या मुठी घट्ट वळल्या. डोळे मोठे केले आणि प्रतिपक्ष्यावर चाल करून जाण्यासाठीं तो पुढं सरसावला. त्याचं तें अवसान पाहून, तो मुलगा एकदम केविलवाण्या स्वरांत म्हणाला—

" देवाशपथ मी खट नाहीं मारली रे ! "

बंड्या एकदम थबकला ! आश्चर्य वाटायला नको.—कारण कुठल्याही गोष्टीनं बंड्याचं कुतूहल चटकन् जागृत होत असे. आणि एकदां असें अनिवार कुतूहल मनांत दाटलं

कीं त्या गोष्टीचा गंभीरपणानं विचार करून कांहीं तरी उत्तर शोधून काढल्याशिवाय त्याला स्वस्थ बसणं माहीतच नव्हतं. बंड्याच्या बुद्धीचा तल्लखपणा असल्या अकारण कुतूहलांत-सुद्धां डोकवल्यावांचून रहात नसे. म्हणूनच आतां त्याला भांडायचा विसर पडला आणि कुतूहलानं त्यानं विचारलं—

"देव कसा असतो रे?"

तो खट मारणारा मुलगा—"अहा रे! तुला माहीत नाहीं? तुमच्या घरीं देवघरांत राम...मारुती...गणपति... नाहींत वाटतं?"

"पण ते तर पितळेचे आहेत. देव पितळेचा असतो?"

"अं ऽ ...!" तो खट मारणारा मुलगा सपशेल गड-बडला! पण त्याचवेळीं बंड्याच्या मनांत दुसराच विचार आला. तो म्हणाला—

"देव केवढा असतो रे?"

त्यांच्यांत जो एक मोठा मुलगा होता तो पुढं सरसावला. आपलं बसकं नाक खाजवीत तो म्हणाला—

"मी सांगू का? मला ठाऊक आहे."

साऱ्यांचं लक्ष त्याच्याकडे वळलं. बंड्यानं अधीरतेनं म्हटलं—

"सांग...सांग पाहूं!"

"देव फार मोठा असतो. तुळशीच्या बुडखापासून रामाच्या शेंडीपर्यंत!"

"अं? म्हणजे काय?"

त्या मोठ्या मुलानं आपली जिवणी फाकली. डोळे बारीक केले आणि आपलं बसकं नाक खाजवीत म्हणाला—

"म्हणजे...तुळशीच्या बुडख्यापासून रामाच्या शेंडीपर्यंत! येवढं समजत नाहीं?" बंड्याला तेव्हां समजलं कीं नाहीं

 कुणास ठाऊक. पण घरीं आल्यावर त्यानं आपले डोळे

चौकसपणानं समोवार फिरविले. त्याला चटकन् आठवलं कीं आपल्या अंगणांत तुळस आहे! अंगणाकडे मोर्चा वळवण्यापूर्वी आई काय करते आहे हें पाहण्यासाठीं तो आंत गेला व ती देवापुढं नीरांजन लावण्यांत गुंतली आहे हें पाहिल्यावर तो अंगणांतल्या तुळशीपुढं येऊन उभा राहिला. मघा त्या मुलानं सांगितलेला तुळशीचा बुडखा म्हणजे काय, हें त्याच्या नीट ध्यानीं येईना. पण कांहीं तरी विचार मनांत येऊन त्यानं तुळशींतली माती हातानं खरवडून काढायला सुरवात केली. बराच प्रयत्न करून त्यानं तें रोप सगळं उपटून काढलं आणि त्याच्या मातीनं भरलेल्या मुळाकडे पहात तो पुटपुटला—

"हं...हें तुळशीचं बुडखं असेल! पण...पण रामाची शेंडी कुठं आहे?"

बंड्या आपल्या विचारांतच होता.

पण त्याचा समाधिभंग झाला तो पाठींत बसणाऱ्या धपक्यांनीं! बंड्या पहातो तों आई उभी. ती तुळशीपुढं दिवा ठेवायला आली होती. एकीकडे धपाटे सारखे देतच ती खेकसली—

"मेल्या, झालंय काय तुला? कसची वळवळ सुटली आहे तुझ्या हाताला? तिन्ही सांजेच्या वेळेला तुळस उपटलीस...!"

बंड्या तिच्या हातांतून निसटला. पाठींत धपके चांगलेच बसले होते. आईचं तोंडही चालूच होतं. पण बंड्या स्वतःच्या विचारांत असल्यामुळं रडायची त्याला आठवणच राहिली नाहीं!

आई तोंडानं शिव्या देत तुळशीचं रोप पुन्हां लावीत होती. तें बंड्या दूर उभा राहून पहात होता. त्यानं एकदम प्रश्न विचारला—

" रामाची शेंडी कुठं असते ग ? "

" तुझ्या डोंबल्यांत.... "

" पण आई, माझ्या डोंबल्यांत तर माझी शेंडी आहे. रामाची कुठंय ? " आई खूप रागांत होती. ती म्हणाली–

" मसणांत आहे जा मेल्या ! "

" मसणांत ? म्हणजे.... "

" म्हणजे वर ! जातोस कीं नाहीं इथून ? "

आईचा अवतार पाहून बंड्या अंगणांतून पळाला. पण त्याला खूप आनंद झाला. कारण रामाच्या शेंडीचा त्याला आतां शोध लागला होता. मसणांत म्हणजे वर, आणि वर म्हणजे आकाशांत ! बंड्यानं वर आकाशाकडे पाहिलं आणि स्वतःशीं तो विस्मयानं उद्गारला—

" अबब ! म्हणजे देव फारच मोठा असतो तर ! "

रात्रीं नाना हपीसांतून परत आल्यावर जेवायला बसतांनाही आपली आई अजून रागांत आहे याची बंड्याला दखलच नव्हती. मघाच देवाचा शोध लागल्यावर जो आनंद आणि विस्मय त्याला वाटला होता त्याच स्वरांत तो आतां म्हणाला–

" नाना...देव फारच मोठा असतो नाहीं ? "

नानांचे डोळे एकदम कौतुकानं भरून आले. बंड्योंची मुंज झाली आहे...जेवतांना त्याला आतां शिवूं नये...या गोष्टीचा त्यांना स्वतःलाच विसर पडला ! आणि डाव्या हातानं त्याला पाठीवर शाबासकी देत म्हणाले—" बंड्या, किती शहाणा आहेस तूं ! "

चपाती वाढण्यासाठीं बंड्याची आई पानापाशीं वाकली होती. तिला उद्देशून ते एकदम म्हणाले—" अग...आमच्या हपिसांतली मंडळीसुद्धां म्हणतात कीं...फार हुशार आहे छोकरा ! परवांचीच गोष्ट ना...आमच्या त्या गोगट्यांनीं त्याला पांखरांचा एक तोंडी हिशोब सांगितला होता. यानं

उत्तर तर चटकन् दिलं...पण लगेच त्यांना विचारतो कसा... पांखरांना बंदूक कां हो मारतात ? त्यांचा जीव घेणं चांगलं नाहीं, नाहीं का ?..." आणि नाना मोठ्यानं हंसूं लागले.

या प्रकारांत त्या माउलीचं संध्याकाळचं तुळशी-प्रकरण तसंच राहिलं होतं...पण नानांच्या आनंदांत सामील होण्या-शिवाय तिला गत्यंतर नव्हतं !

बंड्याचं जेवण केव्हांच संपून तो अंथरुणावर येऊन पडला होता. आंत नाना-आई बोलत असल्याचं त्याला ऐकूं येत होतं. पण त्याचं तिकडे लक्ष नव्हतं. आपले नाना आईपेक्षां किती चांगले आहेत या विचारानं तो स्वतःशींच आनंदांत होता. पण कशानं कुणास ठाऊक त्याला मागची आठवण झाली....आणि क्षणभर त्याचं मन भांबावून गेलं.—

आदल्याच वर्षी त्याची मुंज झाली होती. सकाळीं साधारण लवकरच उठून आंघोळ करून बंड्या संध्या करायला बसायचा. नानाही त्यावेळीं देवघरांत पुजा करीत असायचे. त्यांच्यासमोर पाटावर बसून मोठ्या ऐटीनं बंड्या संधेचे मंत्र धडाधड म्हणे आणि नाना मधूनच आपल्या-कडे कसे बघतात तें पाही. एकदां तो असाच बसून संध्या करीत होता. गायत्री जपाची वेळ आली म्हणून हातांत जानवं धरून तो मनांतल्या मनांत गायत्री जप करीत होता. (गायत्री जप मोठ्यानं म्हणायचा नाहीं असं त्याच्या गुरुजींनीं त्याला बजावून ठेवलं होतं!) आईला वाटलं संध्या संपली. म्हणून तिनं त्याला दूध प्यायला हांक मारली. बंड्या संध्या तशीच टाकून सोवळ्याच्या लंगोटी-निशीं स्वयंपाक-घराकडे पळाला. नाना कडाडले—

"बंड्या—इकडे ये पाहूं !"

बंड्या भीतभीत समोर येऊन उभा राहिला. नानांनीं विचारलं—

" संध्या झाली ? "

" नाहीं." बंड्या खोटं कधींच बोलत नसे !

" मग कुठं चाललास गाढवासारखा ? "

" आईनं हांक मारली... "

" ती शेण खाते ! तुला अक्कल नाहीं ? कां उठूं न् मोडूं कंबरडं ? " बंड्या निमूटपणानं संध्या पुरी करायला बसला. पण नाना रागावले कां...आणि आई शेण कशी खाते याचा त्याला प्रश्न पडला होता ! संध्या संपवून बंड्या जेव्हां उठला तेव्हां नाना पुन्हां म्हणाले—

" बंड्या, पुन्हां असं केलंस तर खबरदार ! जग काय... आचारविचार टाकून, शेण खाऊन उठलंय ! पण तुला या संवयी लहानपणापासून चांगल्या नाहींत. काय म्हणतोय मी ? "

भीतभीत मान डोलावून स्वयंपाक घराकडे वळतांना बंड्याच्या मनांत विचार आला होता. शेण खाणारा हा दुसरा प्राणी कोण ?...जग...?...म्हणजे ? पण नानांच्या रागाचं कारण त्याला उमजलं नव्हतं. तसे नाना आपल्याला नदीवर फिरायला नेतात...हलवायाकडून खाऊ घेऊन देतात... दर जत्रेतून चित्रं आणून देतात...मग एकादेवेळेस हें असं कां करतात नाना ?

त्यानंतरची गोष्ट. नानांनीं बंड्याला महिम्न-स्तोत्र शिकवायला सुरवात केली होती. पूजा आटोपल्यावर ते त्याला एकेक श्लोकाचा पाठ देत. बंड्या घोकायला बसे. ते बाजारांत जात. एकदां बंड्याला संथा देऊन, उच्चार बरोबर येतात कीं नाहीं हें पहाण्यासाठीं, कपडे करतांना नाना म्हणाले—

" बंड्या... हं वाच पाहूं ! "

बंड्यानं पोथी मिटली व श्लोक पाठ म्हणून दाखवला !

" बंड्या, पुन्हा म्हण...पुन्हां म्हण ! "

 बंड्यानं पुन्हां श्लोक पाठ म्हणून दाखवला ! नाना

इतक्या आनंदभरानं त्याच्याकडे धावले व दोन्ही हातांनीं त्याला कवटाळून त्यानं इतक्या आवेगानं त्याचा मुका घेतला कीं, बंड्या त्यांच्याकडे भांबावून पहातच राहिला. पण नाना त्याच आवेगांत म्हणाले—

"तुला काय आणूं बाजारांतून ?...श्रीखंड ?

नानांच्या मिशा गालाला लागल्यामुळं बंड्या गाल चोळीत होता ! तो आनंदानं हंसला—नाना जायला लागले तसं तो म्हणाला—"नाना पुढचा श्लोक सांगा ना...!"

त्यांना पुन्हां आनंदानं गहिंवरून आलं. "बंड्या...मी कारकून आहे रे साधा ! नाहींतर मी काय केलं असतं तुझ्याकरितां !"

बंड्याला ते काय बोलत होते याचा अर्थातच पत्ता लागला नाहीं...पण नानांना आनंद झाला होता हें त्याला नक्की समजलं. आणि म्हणून दिलेला श्लोक पाठ करण्या-साठीं तो ऐटींत मांडी ठोकून बसला आणि घोकूं लागला— पण थोड्या वेळानं त्याच्या शेजारचा एक मुलगा घरांत कसचं तरी पीठ मागायला आला. आणि मग त्यांच्या कालच्या विटीदांडूबद्दल गप्पा सुरू झाल्या ! त्यामुळं नाना बाजारांतून परत आल्याचं त्यांना कळलं नाहीं. नानांनीं त्याचा उद्योग पाहिल्यावर हातांतल्या काठीनं मारायला सुरवात केली ! त्याच्या दोस्तानं केव्हांच धूम ठोकली होती. बंड्या कळ-वळून म्हणाला—

"नाना, आतां नाहीं करणार....! अग आई ग... !"

"काय करीत होतास ?"

"बोलत होतों रघूशीं..."

"मी काय सांगितलं होतं तुला ?"

"हो...! अग आई ग... !"

आई स्वयंपाक करीत होती ती बाहेर आली. तें दृश्य पाहून ती म्हणाली—

" तरी मी सांगत असतें त्याला. पण त्याचं हुदडणं संपेल तेव्हां ना ? पण आतां हात आवरा अं... ! "

बंड्या आईच्या आश्रयाला पळूं पहात होता पण ती स्वयंपाकासाठीं सोवळ्यांत होती. म्हणून ती म्हणाली—

" हं...शिवशील मला ! बस पाहूं पुस्तक घेऊन आतां. अन् कबूल कर कीं पुन्हां असं करणार नाहीं म्हणून ! "

" खरंच नाहीं करणार...! "

नानांनीं हात आवरला होता. बंड्या रडत रडत श्लोक पाठ करूं लागला. त्याच्याकडे वळून नाना म्हणाले--

" रडूं नकोस आतां ! बंड्या...मी कां मारतो तुला ? "

नेमकं हेंच तर त्याला कळत नव्हतं !

जेवणाच्या वेळीं श्रीखंड खातांना मघाचा मार बंड्या विसरून गेला होता. पण असल्या प्रसंगानंतर आपलें नाना चांगले आहेत, यावरचा त्याचा विश्वास कोलमडूं पहात असे ! आई केव्हां रागावेल नि केव्हां नाहीं हें तो जाणूं शकत असे; पण नानांचं वर्तन मात्र त्याला अजून न सुटलेलं एक कोडं होतं ?

बंड्यानं स्वयंपाकघराकडे कान दिला. नाना व आई अजून बोलत होतें कांहीं. पण मघाच्या विचारांतच त्याला झोंपेची गुंगी येऊं लागली होती. आणि आतां क्षणांतच तो गाढ झोंपीं गेला. पण घरांत नाना त्याच्या आईला सांगत होते—

" अग...आणि हपीसांतून येतांना आजच त्याचे हेड-मास्तर मला सांगत होते कीं तुमच्या विद्याधराला ( बंड्याचं खरं नांव ! ) या मिडलस्कूल स्कॉलर्शिपच्या परीक्षेला अवश्य
 बसवा...त्याला नक्की मिळेल !...ते सकाळ-संध्याकाळ असे

दोन वर्ग घेणार आहेत शाळेंत! पण ते म्हणाले कीं आतां मीच जर बंड्याकडे लक्ष दिलं तर प्रश्नच रहाणार नाहीं! हें पहा...त्याला तयार करायचं ठरवलंय मी! बंड्याला ही स्कॉलर्शिप मिळाली तर काय बहार येईल...!"

बंड्या मात्र चारपांच दिवसांत या स्कॉलर्शिपच्या अभ्यासाला कंटाळला. त्याचा संध्याकाळचा खेळ बुडूं लागला. शाळा सुटल्यावर शाळेंत अभ्यास आणि घरीं आल्यावर नाना त्याला पुन्हां अभ्यासाला बसवायचे! अर्थात् त्यामुळं नानांच्या हातून मिळणाऱ्या माराचं प्रमाण वाढूं लागलं. बंड्याला तसं येत होतं सगळं. पण एकादेवेळेस खेळाची आठवण होऊन त्याचं लक्ष दुसरीकडे जाई किंवा अभ्यासाचाच कंटाळा येई. त्यामुळं तो चुकीचं उत्तर देई आणि असं कांहीं झालं कीं नाना लगेच भडकावून देत!

त्यादिवशीं संध्याकाळीं बंड्याला अभ्यासाला बसवून नाना वरच्या माडीवर कांहीं कागदपत्र पहायला गेले होते. कंटाळला होता तरी बंड्या निमूटपणानं सांगितलेला धडा वाचीत होता. तेवढ्यांत त्याचा एक विटीदांडू-दोस्त त्याला खेळायला बोलवायला आला. "नकोरे...नाना आहेत घरांत...!" असं बंड्यानं त्याला रडवें तोंड करीत सांगितलं. तो मुलगा परतला तसं त्याच्या सद्यांत लपवलेलं एक चित्र खालीं पडलं. उत्सुकतेनं बंड्यानं म्हटलं—

"पाहूं रे...काय आहे तें!"

तो दाखविना व पळून जाऊं लागला. बंड्या त्याच्यामागें धावला व त्याच्याशीं झोंबी करून त्यानं तें चित्र त्याच्या हातांतून हिसकून घेतलं—हिसकाहिसकींत चित्र जरा फाटलं. त्याकडे पहातांच बंड्या म्हणाला—

"कुठून आणलंस सांग पाहूं हें चित्र...?"

"वा...तुझं नाहीं कीं हें चित्र-! मी आणलं आहे."

त्याची मानगूट पकडीत बंड्या ओरडला—

"चोर! खोटं बोलतोस! मी नव्हतं कां त्या पुस्तकांतून फाडून घेतलं! त्या दिवशीं गल्लींत नव्हतं मी आणून दाखवलं?...चोरलंस तूं माझ्यापासून!" तो मुलगा शिवीगाळ करीत त्याच्याशीं झोंबूं लागला. तेवढ्यांत हातांत कांहीं लांब मुडपलेले कागद घेऊन नाना खालीं आले. त्यांना पहातांच बंड्याचं धाबं दणाणलं. त्याच्या हातांतून सुटतांच तो मुलगा जमीनीवरचं चित्र उचलून धूम पळाला. नानांचा तडाखा बसायच्या आंतच बंड्यानं किंकाळी फोडली होती. पण त्यामुळं नाना मारायचे राहिले नाहींत...! जातांना बंड्याच्या आईला उद्देशून नाना म्हणाले—

"मी थोडा बाहेर जाऊन येतों—याला असा उभ्यानं अभ्यास करूं दे. आठ दिवस उभा करतों त्याला आतां. हरामखोर!"

बंड्याच्या डोळ्याला लागलेली अश्रूंची धार थांबली नव्हती. पण नानांच्या रागानं तो भिंतीशीं उभा राहून घोकीत होता. आई दिसतांच त्यानं कळवळून हांक मारली व रडत रडत तो म्हणाला—

"आई! नाना फार वाईट आहेत ग!"

आई त्याच्या जवळ येऊन प्रेमळपणानं त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाली—

"बंड्या...अशाशिवाय लिहिणं येत कां? तूं मोठ्या परीक्षेला बसणार आहेस ना?"

डोळे पुशीत बंड्या म्हणाला—"पण आई मी बसून अभ्यास करतों...!" त्या माउलीच्या मनांत आलं—आतां येतील ते परत आणि त्यांचा राग गेलेला नसला तर आणखी मारायचे! म्हणून ती म्हणाली—

" ते आतां येतील तोंपर्यंत किनी असाच कर अभ्यास-मग मी त्यांना सांगून तुला बसवीन अं ! "

" मग माझ्यासमोर येऊन बस तूं आतां."

गहिंवरल्या स्वरानं ती म्हणाली—" येत्यें अं. दिवे भरायचे आहेत ते घेऊन येतें."

बंड्यानं डोळे पुसून अभ्यासाला सुरवात केली. पण नानांचा त्याला खूप राग आला होता. त्याचं चित्र चोरून तो मुलगा पळाला होता. त्याला कांहींच नाहीं ! बंड्यानं मनांतून खूप शिव्या दिल्या नानांना !

असं कांहीं झालं म्हणजे बंड्याला झोंपेंत स्वप्नंसुद्धां खूप विचित्र पडत. त्या दिवशीं त्याला असंच वाटलं—नाना खूप दूर आहेत...बहुधा हपीसांतच...ते त्याच्याकडे पाहून हंसत होते...त्यांच्या हातांत एक चित्र होतं आणि त्याचा ते चोळामेळा करीत होते...मग त्यांचे हात हळुहळू लांब होऊं लागले...इतके कीं ते त्याच्याजवळ येऊन पोहोंचले...भीतीनं तो ओरडला...माराल तर पहा अं...! तो दचकून जागा झाला. पहातो तों नाना त्याच्याजवळ बसले होते. व अंगावर हात फिरवून प्रेमळपणानं ते विचारीत होते—

" काय झालं रे बंड्या ? "

" नाना, मला वाटलं तुमचे हात फार फार लांब झाले आहेत...न्...."

नाना हंसत म्हणाले—" गाढव आहेस झालं ! नीज पाहूं मुकाट्यानं आतां ! "

परीक्षेला दोनएक आठवडे राहिले तसं नानांनीं बंड्याला भल्या पहांटे उठवायला सुरवात केली. पहिल्या दिवशीं बंड्याला जरा आनंदच झाला. कारण उठल्याबरोबर नानांनीं त्याला तोंड धुवून यायला सांगितलं. व मग मलईच्या बर्फीची एक 

मोठी वडी त्याला खायला दिली. पण नंतर इतक्या लवकर उठण्याच्या तापापुढं व अनावर झोपेपुढं बंड्याला त्या रोज मिळूं लागलेल्या बर्फीची मातब्बरी वाटेनाशी झाली. कारण बंड्या पेंगायला लागला कीं नाना ओरडत...मारीत! बंड्यानं तेव्हां मनाशीं निश्चय केला कीं नानांना झोंप लागल्यावर त्यांना त्यांची काठी मारायची व लपून बसायचं! पण नाना झोपले असतांना बिचाऱ्याला जागच आली नाहीं कधीं!

बंड्या बर्फीचा खुराक खाऊन अभ्यास करायला बसला होता. व त्याच भपक्याखालीं नाना बैठं टेबल टाकून हपीसांतलं कामकाज पहात बसले होते. अनावर झोपेनं बंड्याचे डोळे धडाधड मिटत होते. मोरीवर जाण्याकरितां म्हणून नाना उठले तेव्हां त्यांच्या लक्षांत आलं. त्यांनीं त्याच्या एक भडकावून दिली व उभं राहून घोकायचा हुकूम फर्मावला.

बंड्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. त्याचे पाय... पाठ खुप दुखत होती. आणि त्याला पुस्तकांतलीं अक्षरं मुळींच दिसेनाशीं होऊं लागलीं होतीं. म्हणून तो 'हवामान कशावर अवलंबून असतें?' हेंच वाक्य रडतरडत घोकीत होता व घोकतां घोकतां रडत होता.

नाना आले व एक धपाटा देऊन ओरडले—

"गाढवा, हें वाक्य काय घोकतो आहेस! कशावर असतं हवामान अवलंबून तें घोक. हं वाच पाहूं! काय लिहलंय्... उंची, समुद्रसान्निध्य...असंच ना?"

बंडया अधिकच रडूं लागला.

नाना जोरानं ओरडून म्हणाले—"रडायला काय झालं? वाच अगोदर...!"

"नाना, पुस्तकांतलं दिसत नाहीं!" त्याला हुंदक्यावर हुंदके येत होते.

 "उजेडांत धर पुस्तक. अंऽ? उजेड तर आहे—"

" उजेडांतसुद्धां दिसत नाहीं—"

नानांनीं त्याला एकदम जवळ घेतलं व ते म्हणाले--

" पाहूं तुझे डोळे—"

नानांनीं पाहिलं तर त्याचे डोळे खूपच लाल झाले होते, व त्यांच्यावर एक पटल आलं होतं. तो आंतल्या आंत हुंदके दाबीत होता. दोन्ही हातांत त्याचं मुख धरून त्याच्याकडे पाहिलं. बंड्या खरंच गोजिरवाणा होता! गोरा पान, धरधरीत नाक, काळे टपोरे डोळे! नानांचा गळा दाटून आला. ते म्हणाले--

" बंड्या, मी उगीच मारतों कारे तुला ? "

नानांचं हें असं करणंच तर नेमकं त्याला कळत नव्हतं! क्षणभर रडूं आवरून तो त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागला. नाना बोलत होते—

" बंड्या, मला वाटतं तूं खूप शिकावंस नी मोठा व्हावंस! मला कांहीं करतां आलं नाहीं. इंग्रजी सहावीतनं शाळा सोडून मास्तर झालों मी. आणि आतां ही खर्डेघाशी करतों आहे...! मला किती वाटत होतं खूप शिकावं म्हणून...पण तूं तरी मोठा हो गाढवा!...तुला बुद्धि आहे...मला किती अभिमान वाटतो तुझा...!"

नाना काय बोलत होते तें बंड्याला कांहीं समजलं नाहीं. ...मात्र शेवटचं वाक्य त्याच्या कानीं पडलं--" आज राहूं दे अभ्यास...झोप तूं!"—तेव्हां उत्सुकतेनं त्यानं विचारलं--

" खरंच...नाना ? "

बंड्याला वाटलं नाना खरंच चांगले आहेत!

नानांनीं त्याला त्याच दिवशीं डॉक्टरकडे नेलं. डॉक्टरनं डोळ्यांत औषध टाकून दिलं व रात्रीं गार दूध प्यायला 

द्या...खूप झोप येऊं द्या...म्हणून सांगितलं. दोन दिवस बंड्या खुशीत होता. अभ्यास नाहीं–मार नाहीं !

पण लगेच परीक्षा आली.

पहिल्याच दिवशीं संध्याकाळीं घरीं आल्यावर नानांनीं त्याला किती गणितं बरोबर आलीं म्हणून विचारलं—

"तीन..."

"पांचांपैकी तीन ?"

बंड्याला धपाटे सुरूं झाले! बंड्या कांहीं सांगणार होता...पण तें तसंच राहिलं. या अनपेक्षित मारानं तो आ वासून त्यांच्याकडे पहात राहिला. आणि मग वेदना सहन होईनात म्हणून रडूं लागला ! रात्रीं निजायच्यावेळीं बंड्याची आई विचारीत होती—

"फार चुकलंय कां त्याचं ?"

नानांच्या चेहऱ्यावरचा चिंतेचा भाव ओसरला नव्हता. उद्विग्नपणं त्यांनीं उत्तर दिलं—"कुणास ठाऊक! तुला ठाऊक नाहीं. ब्राह्मणांच्या मुलांना पहिला नंबर आला तरच स्कॉलरशिप मिळते...! बंडयाला काय कळणार या गोष्टी ? मघा मी मारलं त्याला...पण मी आतां अधिकच खिन्न झालोंय्...किती आशा आहेत माझ्या त्याच्यावर...!"

बंडया जागाच होता. आतां मात्र राहवलं नाहीं. तो एकदम म्हणाला—

"नाना—"

"काय ?" नाना खिन्नपणें त्याच्याकडे वळून म्हणाले,

"नाना, माझीं एकट्याचींच तीन गणितं आहेत."

"अंऽ ?"

"खरंच नाना ! त्यांनीं इंग्रजी बुकांतलीं गणितं घातलीं

 होतीं हो ! कुणालाच आलीं नाहींत. माझींच सर्वांत जास्त

बरोबर आहेत. मला दिपोटींनीं विचारलं कीं तूं कुणाचा मुलगा..."

नाना त्याच्याजवळ येऊन म्हणाले—

"गाढवा, मग हें मघा कां नाहीं सांगितलंस ?"

पण दिपोटींच्या आठवणीनं बंड्याला एकदम हंसूं आलं. तो हंसतच म्हणाला—

"नाना, ते चष्म्यावाले दिपोटी आहेत ना? ते कसं म्हणत होते...अठरा बुशील गव्हाला अडीच शिल्लींग पडतात.... नाना, ते शिल्लींग म्हणतात हो !"

चंद्रात्रे दिपोटींचा तो परिचित उच्चार आठवून नानांना हंसूं आलं. "बरं बरं ! नीज आतां. उद्यां लवकर उठायचं ना ?"

बंड्याची परीक्षा आटोपली. दोनच दिवस तर होती ! नानांची व चंद्रात्रे दिपोटींची पूर्वींची ओळख होती. त्यांच्याकडून त्यांना गुणगुण लागली होती कीं बंड्याला बहुधा स्कॉलर्शिप् मिळेल. पण सगळे निकाल व्हावयाचे होते.

त्यानंतरच्या कांहीं दिवसांची गोष्ट. नानांना त्यांच्या साहेबांनीं बोलावणं पाठवलं म्हणून पोशाख सावरीत नाना त्यांच्यापुढें अदबीनं जाऊन उभे राहिले. साहेबांनीं हंसत इंग्रजींत विचारलं—

"विद्याधर गणेश जोशी तुमचा मुलगा का ?"

"हो..."

"त्याला मिड्ल् स्कूल स्कॉलरशिप् मिळाली आहे मग—"

नानांच्या तोंडून शब्द फुटेना. त्यांचे डोळे भरून आले ! कसंबसं ते म्हणाले—

"अं...साहेब ?"

"अजून निकाल लागले नाहीं...मला समजलं.. अन् 

तुमचा मुलगा असावा म्हणून विचारलं. उगीच वाच्यता करूं नका अं इतक्यांत !"

नानांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागले. साहेबापुढें हा देखावा करतोंय् आपण याचीही त्यांना शुद्ध राहिली नाहीं !

"मी तुमचं आतांच अभिनंदन करतों. मला त्या मुलाला पहायचंय्. तुम्हाला एक गंमत सांगूं ? मी या परीक्षेला बसलों होतों... पण मला ही स्कॉलर्शिप मिळाली नव्हती.

"असं कसं होईल साहेब ?" कांहींतरी बोलायचं म्हणून नाना म्हणाले.

"त्याची आठवण झाली कीं कसंच वाटतं ! म्हणून मी हे निकाल मुद्दाम पहात असतों. मला वाटतं माझ्या वडिलांनीं त्यावेळीं पुरेशी काळजी घेतली नसावी माझी. या यशांत खरा वाटा तुमचाच आहे..." साहेब जरा थांबले व मग पुन्हां म्हणाले—"त्याला खूप शिकवा बरं का ! मीसुद्धां लक्ष देईन आतां...जा तुम्ही ! पण हें पहा...मी सांगेन त्या दिवशीं त्याला माझ्या घरीं घेऊन यायला विसरूं नका अं...!"

नाना उपरण्याला डोळे पुशीत बाहेर पडले. मंडळींना वाटलं - साहेबांनीं तासलेली दिसतेय्...म्हणून हा ब्राह्मण...! मंडळींनीं प्रश्न विचारून चेष्टा करायला सुरवात केली. पण कांहीं बोलायचं नाहीं असा साहेबांचा हुकूम होता. नाना गप्पच राहिले. पण हपीसची वेळ संपून आपण एकदाचे घरीं केव्हां जातों असें त्यांना झालं होतं.

नाना जोरानं पावलं टाकीत येत होते त्याचवेळीं बंड्याचा विटी-दांडू गल्लींत ऐन रंगांत आला होता. त्या दिवशीं ते इंग्रजी डाव खेळत होते. पांचशें झक्कूंची 'कवडी' ठरली होती. बंड्याला फक्त ऐशींच कमी होते. आपल्या शत्रूला 'कवडी कवडी' करीत सर्व गल्लीभर धावावं लागेल याचं विजयी

चित्र मनापुढं उभवून बंड्या पावित्र्यांत उभा राहून टोला मारीत होता. गल्लीच्या दुसऱ्या टोंकाला असलेल्या शत्रूपक्षाच्या मुलाला नाना येतांना दिसले. तो ओरडून म्हणाला—

" बंड्या...नाना आले तुझे ! ",

बंड्याला वाटलं आतां कवडी होणार म्हणून हा खोटं सांगतो आहे. दांत विचकीत तो म्हणाला—

" आतां कशी भागुबाई ! कवडी होणार म्हणून खोटं बोलतोस नाहीं का ? "

पण नानांची आकृति समोर दिसतांच तिथंच दांडू टाकून बंड्या धूम पळाला. नानांची आरोळी त्याच्या पाठीशीं आली. बंड्या जो पळाला तो थेट घरांत येऊन आईच्या मागं दडला. ती भांबावून काय झालं म्हणून विचारते तों नाना येऊन हजर झाले होते ! त्यांना श्वास लागला होता. पण ते तसंच ओरडले— " बंड्या इकडे ये ! सोड ग त्याला ! "

त्यांच्या मुद्रेवरून, आवाजावरून आनंदाचं लक्षण स्पष्ट दिसत होतं ! ती चटकन् बाजूला झाली. नानांनीं बंड्याला उचलून डोक्याभोंवतीं गरगर फिरवलं व त्याचे मुक्यावर मुके घेतले ! नाना हें असं काय करताहेत... याचा कांहींच उमज न पडतां बंड्या बेजार होऊन त्यांच्याकडे पहातच राहिला !

" गाढवा ! आहेस कुठं तूं ? तुला स्कॉलरशिप मिळाली ना ! "

बंड्याला कांऽहीं समजलं नाहीं ! पण थोडीशी कल्पना येऊन तो म्हणाला—

" पहिला नंबर आला—? "

" हो ना...गाढवा ! "

नानांना झालं तरी काय आज...बंड्याला कळेचना. पण नाना रागावले नव्हते याबद्दल त्याची खात्री झाली ! 

आणि मग मधाची अपुरी राहिलेली 'कवडी' त्याला आठवली. त्यानं धीर करून विचारलं—

"नाना...मग मी खेळायला जाऊं?"

पण नाना आईला सांगत होते—"अग, आमचे रानडे साहेब आहेत ना? कलेक्टर ग...? त्यांनींच तर सांगितलं! निकालाला अजून अवकाश आहे. पण आपल्याला समजलं अगोदर! आणि ते म्हणत होते कीं बंड्याला घेऊन एकदां—"

नानांच्या डोळ्यांतून घळघळा पाणी वहात होतं. बंड्यानं पाहिलं तर आईचेही डोळे भरून आले होते. नाना कोणत्या-वेळीं कसं काय करतील या विषयींचे त्याचे तर्क कधींच जमीनदोस्त झाले होते! परवानगीची वाट न पहातांच तो तेथून सटकला.

'समीक्षक'
दिवाळी अंक १९४१

## यथापूर्वम्....

समुद्रावरच्या रेंवेंत ते येऊन बसत.

आजुबाजूला बहुधा शांतता असे. कुठें तुरळक कांहीं लोक दिसत. पण प्रत्येकजण आपापल्याच नादांत. एखादे वेळेस मोठ्यानें उच्चारलेले कांहीं शब्द किंवा एखादी गाण्याची लहर ऐकूं यावयाची.

पाठीमागचीं माडाचीं झाडं मात्र नेहमींच डौलदार दिसत. वारा नसला कीं चित्रांतल्यासारखीं निश्चल. पण वारा वहात असला कीं आपल्या झावळ्या तीं हलवीत. आणि मग मजेदार सळळ् असा ध्वनि येई.

एखादे वेळेस सभोवार काळोखच असे. आणि रुसलेल्या मुलाप्रमाणें समुद्र दूर हटून बसलेला असे. पण एखादे वेळेस पांढऱ्या ढगावर बसलेली चंद्राची स्वारी डुलत असायची. आणि समुद्र उचंबळून किनाऱ्याकडे धाव घ्यायचा.

त्यांच्यापासून दहा-बारा हातांच्या अंतरावर समुद्राच्या लाटा फेसाळून फुटत.

दोघेहि त्या दृश्याकडे पहात रहायचे. मग नजर चंद्राकडे जायची. मग पाठीमागच्या ताल वृक्षांकडे जायची. आणि मग ते एकमेकांकडे पहात. त्याला टेनिसनच्या ओळी आठवण व्हायची—

I would that my tongue utter
The thoughts that arise in me

तिलाही जणूं काय हें न प्रकट केलेले विचार समजायचे. दोघेही हळुच हंसत. आणि गार वारा वहात नसला तरी त्यांच्या अंगावर शहारे येत आणि ते एकमेकांच्या अधिक जवळ येत. परतणाऱ्या लाटेकडे पहात ते स्वतःशीं म्हणत—

" किती सुखी आपण ! "

त्यांचा विवाह होऊन फारसे दिवस झाले नव्हते. अगदींच प्रेमविवाह नाहीं म्हणतां येणार, पण तसंच कांहींसं. तो बी. ए.चा अभ्यास करीत असे त्या वेळीं. एकट्या आईशिवाय त्याला घरचं कुणींच नव्हतं राहिलं. आणि पैशाचं पाठबळ फारसं नसल्यानं तो शिकवण्यासारखे उद्योग करून आपला अभ्यास करी. एकंदरींत त्रासच. पण त्याची उमेद मोठी असे. इतर गांवीं त्याचे नातलग असे कुणी नव्हते–एक दूरची मावशी होती. तिच्याकडे तो एखाद्या सुटींत मुद्दाम जात असे. मावशी आणि तिचा नवरा मोकळेपणानें बोलणारे असल्यामुळं त्याला तिथं बरं वाटे. गेल्या वर्षी तो असाच तिकडे गेला होता आणि मग प्रत्येक सुटी न चुकतां तिथं जायला लागली त्याची—

त्याच्या मावशीच्या शेजारीं एक गृहस्थ रहायला आले होते. त्यांची एक मुलगी होती. नुकतीच ती कॉलेजांत गेली होती. मावशीच्या वडील मुलींकडे ती बरेच वेळां यायची. यानें तिला पाहिलें. तिनेंहि याला पाहिलें. ती काय म्हणाली असेल

कुणास ठाऊक. पण हा स्वतःशीं म्हणाला–" छान आहे मुलगी, नाहीं ? "

त्यांची थोडीशी ओळख झाली होती. घरीं आल्यावर तो तिचाच विचार करीत होता. पुढची सुटी फार लांबली असं त्याला वाटलं. सुटी पडल्याबरोबर तो मावशीकडे जायला निघाला. ती कदाचित् तिथं नसेल, असा विचार त्याच्या मनांत आला. आणि ती दिसली तेव्हां त्यानें सुटकेचा निश्वास टाकला. आणि त्याच्या ध्यानांत आलं—' हिच्या वडलांची इथंच तर बदली झालीय, चारपांच वर्षं तरी ते इथून जात नाहींत. आपण विसरलों कसं हें अगदीं ? '

मावशीच्या घरीं त्यांच्या पूर्वीपेक्षां मोकळेपणानं गप्पा चालत. मावशीची मुलगी, ती आणि तो, संध्याकाळच्या वेळीं नदीच्या बाजूला फिरायलाही जात. तिथं एकदां मावशीची मुलगी त्याला म्हणाली—' हिला गाणीं येतात बरं रे म्हणायला. ' तो मनांत म्हणाला—' असं नुसतं सांगायचं असतं वाटतं ? ' पण त्याच्या तोंडांतून कांहींच शब्द बाहेर पडले नाहींत. आणि मग मावशीची मुलगी तिच्याकडे वळून म्हणाली–' अन् हा कविता करतो बरं ग ! ' ती मनांत म्हणाली—' अय्या ! मग आम्हांला नाहीं दाखवायच्या वाटतं ? ' पण तिच्या तोंडांतून कांहींच शब्द बाहेर पडले नाहींत. त्यांनी एकमेकांच्याकडे पाहिलें. त्याला वाटलें, ती हळूंच हंसली. आणि तिला वाटलें तो हळूंच हंसला.

त्याची बी. ए. ची परीक्षा झाली आणि त्याला शिक्षकाची नोकरी लागली. तीहि पास झाली होती. पुढच्या सुटींत तो मावशीच्याकडे आला. एका रात्रीं त्यानं पाहिलं तर मावशीच्या दिवाणखान्यांत मावशी, तिचा नवरा, तिची मुलगी, ती, तिची आई ( बहुतेक ). आणि तो स्वतः—- एवढेजण बसलेले. मजेनं गप्पा चालल्या होत्या. तो तिच्या- 

कडे पाहायचं नाहीं असा निश्चय करीत होता. मावशी आपल्या मुलीला म्हणाली–'ए गाणं म्हणना एकादं–' मावशीच्या मुलीनं एकदम म्हणायला सुरवात केली. तो पहातच्च राहिला. त्याची एक कविता ती म्हणत होती! म्हणून संपल्यावर मावशीची मुलगी हंसली. आणि मावशी तिच्या आईकडे वळून म्हणाली–' यानं केली आहे ही कविता–' आणि त्यालां कळून आलं कीं पुरुषही लाजूं शकतात.

मावशी म्हणाली—'तूं म्हण ना रे आणखी एक—' त्याला म्हणायचं होतं–'चालवलं आहेस काय हें तूं मावशी? मला म्हणायला लावून इथं बसलेल्या लोकांना घालवून द्यायचं आहे वाटतं?' पण तो म्हणाला–'मी म्हणतो का कधींतरी?' आणि त्यानें तिच्याकडे चोरून पाहिलें.

मावशीची मुलगी तिला म्हणाली–'ए, जाऊं दे–तूं म्हण–' ती लाजली. तिनं आपल्या आईकडे वळून पाहिलं...आणि थोड्या वेळानं तिनं कापऱ्या आवाजांत म्हणायला सुरवात केली. त्यानं तिच्याकडं आश्चर्यानं पाहिलं. पुनः त्याचीच कविता!

म्हणून संपल्यावर मावशी त्याला हंसत म्हणाली—'तुझीच ना रे ही कविता? केव्हां दिलीस हिला—?'

आणि सगळेच हंसूं लागले. तीसुद्धां. तो मनांत म्हणाला—'सगळ्या मावश्या अशाच खट्याळ असतात कीं काय?'

आणि मग त्यांचा विवाह झाला.

कॉलेजच्या शेवटच्या वर्षासाठीं ती त्याच्याकडे आली होती. मध्यंतरी त्याची आई वारली होती. ती घरचं सर्व करी. कॉलेजांत जाई. आणि अभ्यासही करी. तो शाळेंतून  लवकर परत येई. तिला खूप मदत करी घरकामांत. ती

म्हणे--'मी करतें कीं-' तो म्हणे-' चल, अभ्यास नाहीं वाटतं तुला?' आणि तिच्या मनांत विचार येई-' किती सुखी आपण!' आणि त्याचा प्रतिध्वनि त्याच्या अंतःकरणांत उमटे.

तिला पहांटे लवकर उठणें शक्य होत नसे. म्हणून अभ्यासासाठीं ती सारं आटोपून रात्रीं बसायची. तोही जागायचा. ती म्हणायची-- 'हें काय? तुम्ही कशाला जाग्रण करतां?' तो हंसत म्हणायचा—' वाः शाळेंतलं काम नसतं वाटतं आम्हाला---?' आणि तो शाळेंतल्या वह्या तपासण्याचं काम मुद्दाम घरीं घेऊन येई आणि तिच्याबरोबर जागत बसे. एकादे वेळेस तिला समजावून देई किंवा इतर मदत करी अभ्यासांत. एकदां तो म्हणाला---' चहा करूं कां तुला?' ती हंसत म्हणाली-' इश्श, मी करतें कीं--' आणि ती खुर्चीतून उठली. पण त्याच्या आंत त्यानं स्टोव्ह पेटवायला सुरवात केली होती. ती त्याच्या हातांतलं भांडं घ्यायला लागली... पण त्यानं नाहीं घेऊं दिलं. स्वयंपाकघराचाच ताबा घेतला त्यानं—! आणि तो खोट्या रागानं म्हणाला—' जातेस का नाहीं इथून?' स्टोव्हवर चहा होत होता. ती तिथंच उभी होती. तो पुन्हां म्हणाला—' अभ्यास नाहीं करायचा वाटतं आज?' आणि तो एकदम उठला. तिला कांहीं कल्पना यायच्या आंत त्यानं तिला दोन्हीं हातांनीं उचललं...आणि आराम खुर्चीवर नेऊन बसवलं! ती म्हणाली—' इश्श! हें काय?' तो हंसत म्हणाला—' धर पाहूं हें पुस्तक. नाहींतर मारीन अं—' आणि त्यानं चहाकडे मोर्चा वळवला.

बिछान्यावर बसून दोघेजण चहा प्यायले. आणि मग तिनं त्याच्या गळ्याभोंवतीं हात टाकले. त्यानं तिला आपल्याजवळ ओढून घेतलं! दोघेही मनांत म्हणत होते—' किती सुखी आपण!'

तिची परीक्षा झाली. मग ती म्हणाली—' मी नोकरी करूं का ? ' मला कांहीं कामही नाहीं. अन् मदत होईल नाहीं तेवढीच आपल्याला ? '

तो म्हणाला—' हो—आहे कुठं एकादी ? "

ती म्हणाली—' पलीकडे तें गर्लस स्कूल आहे ना ? तिथल्या एक बाई जायच्या आहेत मॅटर्निटी लीव्हवर...सध्यां घ्यावी ती, दुसरी चांगली मिळेपर्यंत ? '

तो म्हणाला—' जरा अवकाश आहे ना अजून ? '

ती म्हणाली—' हो—'

उन्हाळ्याची सुटी लागायच्या अगोदरचे कांहीं महिने होते ते. त्यामुळं महिना दीड महिनाच काम मिळालं तिला. आणि एक दिवस तो म्हणाला—' मी बी. टी. ला जायचा विचार करतोंय. नोकरी कायम होईल आणि पगारही वाढेल तेवढंच बरं, नाहीं ? '

ती म्हणाली ' हो—'

आणि याचा बी. टी. चा अभ्यास सुरू झाला, आणि सहकार्याची परतफेड सुरू झाली. तिला जवळच्याजवळ नोकरी मिळाली नाहीं. परगांवची एक चांगली नोकरी आली होती. पण ती म्हणाली–' अशी नोकरी काय करायची आपल्याला ? आणि आतां मी तुमच्याजवळ राह्यलाच पाहिजे नाहीं का ? तुमचा अभ्यास. '

तो हंसत म्हणाला–' हो–'

त्याची बी. टी. झाली. आणि तिच्या प्रथमच लक्षांत आलं कीं आपल्याला दिवस गेले असावेत...ती त्यांच्याशीं बोलली नव्हती अजून...पण अननुभूत गोड लहरींनी तिचं सारं शरीर रोमांचित झालं होतं.

आणि बऱ्याच दिवसांनंतर एक दिवस तो तिला म्हणाला–
 ' चल, भटकायला जाऊं आपण---'

रात्रीचे नऊ वाजून गेले होते. त्यानं नुसतां शर्ट घातला होता आणि धोतराचा सोगा खांद्यावर टाकला होता. ती ग्रे रंगाचं पांचवारी नेसली होती आणि अंगांत काळा उघड्या बाह्यांचा ब्लाऊज होता.

हातात हात घालून ते चालले होते. रस्त्यावर दिव्यांचा अंधुक प्रकाश मात्र होता. रस्त्यावर फारसें कुणी दिसत नव्हतं. कांहीं बंगल्यांत अजून विजेचा उजेड होता आणि उघड्या खिडकींतून रेडिओवरचे गाण्याचे स्वर तरंगत येत होते. तिचा हात दाबीत तो म्हणाला— ' किती तरी दिवसांत आपण गेलों नव्हतों, नाहीं ? ' ती हंसत म्हणाली– ' खरंच, नाहीं ? '

रस्त्याच्या बाजूला नारळींची नाहींतर ताडाचीं झाडं हारीनं लागलीं होतीं. आणि त्यांच्या मांडवाखालून तीं जात होतीं. समोरचा रस्ता नागमोडी वळणं घेत खूप लांब गेलेला होता. पलीकडच्या वाडींतून वाऱ्याची एक झुळुक आली. आणि दोघांना स्पर्शून गेली. त्या गारठ्यानं ते किंचित् शहारले. आणि एकमेकांच्या आधेकच जवळ आले. त्या जवळपणाची ऊब त्यांना सुखकारक वाटली. त्यांच्या मनांत विचार सुरूं झाले. त्यांचीं पावलं न कळत जरा वेगानं पडूं लागलीं. तिनं त्याच्याकडे पाहिलं. त्याची दृष्टि रस्त्याच्या शेवटच्या टोकाकडे होती. तिनंहि आपला वेग वाढवला. ते चालतच होते !

तो अर्धवट स्वतःशीं पण जरा मोठ्यानं एकदम उद्गारला—

' कुठें चालली पायवाट ही...... '

तिनं त्याच्याकडे पाहिलं. तो हंसत म्हणाला—' कवितेची कल्पना सुचलीय......पण पुढच्या ओळी कांहीं जमत 

नाहींत—' आणि थोड्या वेळानं—' कितीतरी दिवसांत एकही कविता केली नाहीं मी...नाहीं ?'

' खरंच, करा मग आतां—'

त्याच्या नेत्रापुढं गोड गोड दृश्यं तरळायला लागलीं. अस्फुट ध्वनि ऐकल्याचा भास होऊं लागला–! त्याला कवितेंत लिहायचं होतं–कुठं चालली आहे ही वाट ? कुणास ठाऊक...! पण बाजूच्या या नारळी...हे ताड...ही शांत रात्र... ही निर्जनता. ( अरेच्या ! आपण कुठल्या कुठं भटकत गेलों आहोंत कीं ! )...रातकिड्यांचे ऐकूं येणारे हे स्वर... मधूनच अंगाला स्पर्शिणारी ही शीतळ वाऱ्याची झुळूक...आणि माझ्याजवळ...अगदीं जवळ...तूं ! गाणं म्हणत असंच चालत रहावं...अगदीं जगाच्या अन्तापर्यंत...... ! !

पण कवितेच्या ओळी कांहीं जुळत नव्हत्या...तिच्या जवळपणाची ऊब मात्र सुखकारक होती.

तो म्हणाला—' कांहीं जुळत नाहीं आतां—पण तूं म्हण ना एकादं गाणं—'

ती म्हणाली—' अय्या–मी किती दिवसांत म्हटलं नाहीं कांहीं ! '

पण तिनं त्याची कविता म्हणायला सुरवात केली...तिचा आवाज गोड होता पण त्याच्यावर संस्कार झाले नव्हते... त्याला वळण नव्हतं...गाणं शिकायचा तिचा विचार होता... पण अजून राहिला होता तो तसाच. त्याला वाटलं तिनं चांगलं म्हटलं. पण ती म्हणाली—' संवय नसली म्हणजे कांहींतरीच येतं, नाहीं—? '

आणि ते तसेंच चालत राहिले. रस्त्याला नवें वळण लाग-
 ल्यावर त्यांनीं तिथली पाटी पाहिली–तो म्हणाला—' बापरे,

आपण दोनतीन मैल चाललोंत कीं चांगले—!' ती हंसून म्हणाली-'अय्या, खरंच!'

कोपऱ्याला एक इराण्याचें दुकान होतं. तो म्हणाला---'चहा घेऊं या का आपण?' ती किंचित् घुटमळत म्हणाली...' अं...'

पण तो म्हणाला---' मी पैशाचं पाकीट कुठं आणलंय?'

ती म्हणाली—' माझी पर्स आहे कीं...पण आपण आतां बसनं परतूं या गडे...! चहा पाहिजे तर घरीं करूं...'

तो हंसत म्हणाला...' दमलीस वाटतं?'

तीही हंसत म्हणाली-' जराशीक-

तो म्हणाला -' का ग?'

पण तेवढ्यांत कोपऱ्याकडे बस येतांना दिसली. दोघेंही धांवत निघाले. बसच्या वरच्या मजल्यावर बसल्यावर त्यांच्या ध्यानीं आलं कीं...तिचा श्वास जरा जोरानं चालला आहे...! वर अगदीं पुढें एक मनुष्य बसला होता. त्याची त्यांच्याकडे पाठ होती. बाकी कुणीच नव्हतं बसमध्यें. तो तिच्याजवळ वाकून हळूंच म्हणाला—' फारच दमलेली दिसतेयस!'

तिच्या मनांत खूप तरंग निर्माण झाले...आणि त्याच्या साऱ्या छटा तिच्या मुखावर उमटल्या. तिनं ओठ अलग केले...पण त्याच्या दृष्टीला दृष्टि मिळतांच ती लाजली. तो म्हणाला—' काय ग?'

आणि खूप धीर करून त्याच्या कानांत ती हळूंच पुटपुटली!

आणि त्याला वाटलें आपण खूप बोलावे...पण ' ऑ...? अन् तूं...' असल्या निरर्थक उद्गाराशिवाय त्याच्या तोंडांतून कांहींच बाहेर पडलें नाहीं. पण त्यांनं आपला हात तिच्या कमरेभोंवतीं टाकला. तिनं त्याच्याकडे तिरप्या नजरेनं पाहिलं 

आणि गोडपणें हंसत तिनं आपलं मुख खालीं वळवलं. त्यानं पाहिलं. त्या गोल नेसलेल्या ग्रे साडींत आणि उघड्या बाह्यांचा ब्लाउजमध्ये ती किती सुंदर दिसत होती. तिच्या जवळपणाची ऊब त्याला सुखकारक वाटली...आणि त्याच्या अंगावर किंचित् रेलून बसतांना तिला एकदम फुलासारखं हलकं वाटूं लागलं...!

घरीं आल्यावर तो म्हणाला—'बस मी आतां ओव्हलटीन् करणार—'

ती हंसत म्हणाली—'बरं---'

ओव्हलटीन् पितांना तो म्हणाला---' ए, गाणं म्हण तूं आतां---'

ती हंसत म्हणाली--'तुम्ही कविता करा अगोदर-तीच म्हणेन मग–'

अन् दोघेही मग हंसले.

अन् शेजारी बसतांना त्यांना वाटलं– ' किती सुखी आपण !

पण त्यानं कविता केली नाहीं...आणि तिनं गाणं म्हटलं नाहीं !

आणि मग त्यांचा बाळ आला —

आणि एक दिवस ती म्हणाली—' मला नोकरी आलीय. पण आतां बाळाचं नको कां करायला ? '

तो म्हणाला—' खरंच ! नको आतां आपल्याला—'

आणि एक दिवस तो म्हणाला—' ए, मला जरा उशीर होत जाईल अं ! एक शिकवणी आली आहे...अन् दुसरीही मिळेल बहुधा---'

ती म्हणाली—' खरंच ? '

 मग त्याला शाळेंतून यायला उशीर व्हायला लागला.

आणि घरचं अन् बाळाचं करतांना तिला वेळ पुरेनासा झाला.

तरी ती त्याला शाळेच्या कामांत मदत करी आणि तो तिला घरकामांत मदत करी. आणि दोघे बाळाचें कौतुक करीत...!

एक दिवस तो घरीं आला तर ती बाळाला त्याच्या कवितेचे शब्द सांगत होती. आणि बाळ हवेंत हात उचलीत कांहींतरी आवाज करीत होता.

तिच्याजवळ जाऊन तो म्हणाला–'खरंच माझ्या मनांत किती कविता करायच्या होत्या...! कॉलेजांत असतांना... माझी इच्छा होती ... आपण खूप मोठं व्हावं...खूप कविता कराव्या अन् भारतीय कवी व्हावं—'

आणि ती म्हणाली...'खरंच अन् मला वाटत होतं... आपण खूप गाणं शिकावं...आणि मजा करावी...नाहींतर शाळेंत जावं आणि मुलींना फुलासारखं उमलायला शिकवावं...'

आणि हवेंत हात उचलीत बाळ म्हणाला–'आं ऽ आँ ऽ'

आणि नंतर दोघे म्हणाले, 'बाळाला शिकवूं या अं सारं आपण...'

आणि नंतरही...एखादे वेळेस सभोंवार काळोखच असे. आणि रुसलेल्या मुलाप्रमाणें समुद्र दूर हटून बसलेला असे. पण एखादे वेळेस पांढऱ्या ढगावर बसलेली चंद्राची स्वारी डुलत असायची आणि समुद्र उचंबळून किनाऱ्याकडे धांव घ्यायचा.

आणि तो उशीरा परत यायचा आणि तिनं घातलेल्या बिछान्यावर अंग टाकायचा.

आणि ती बाळाच्या नव्या मैत्रिणीला पाळण्यांत झोंपवून, निजलेल्या बाळाच्या अंगावरचे पांघरूण नीट करून, त्याच्या शेजारच्या बिछान्यावर पडायची.

बाहेरच्या काळोखाचा फायदा घेऊन वारा उघड्या खिडकीवाटे आंत शिरायचा. तो अंधारांतच तिचा हात शोधून आपल्या हातीं घ्यायचा. आणि ती त्याच्याजवळ सरकायची...

डोळे मिटतां मिटता दोघांच्या मनांत विचार यायचे— ' किती सुखी आपण ! '

८।२।५४

# मोरया

आपलं बोलणं ऐकायला जवळपास कुणीही नाहीं ही खात्री असतांना, आपल्या प्रश्नांचीं उत्तरं मिळतील अशी अपेक्षा किंवा इच्छाही नसतांना, मनुष्य स्वतःशींच कां बोलत रहातो ?

जुन्या नाटकांतल्या स्वगतांविषयीं नाहीं म्हणत मी. त्यांतली कृत्रिमता नि नाट्यहेतू मला जाणवतात. खऱ्याखुऱ्या जीवनांतल्या जिवंत व्यक्तींविषयीं मला विचारायचं आहे.

विष्णुपंतांना पाहीपर्यंत मला याचा पत्ता लागला नव्हता. आणि त्यांना पाहिल्यानंतर त्यांच्या जीवनाचे मी कांहीं कयास बांधले तरीहि निश्चित उत्तर मिळालें आहे असं मला वाटत नाहीं. माझं समाधान होत नाहीं. म्हणून मी तुम्हाला विचारलं आहे !

आमच्या घरापुढचा बोळ ओलांडून डाव्या हाताच्या रुंदट गल्लीनं कडेपर्यंत गेलं कीं एक छोटंसं गणपतीचं देऊळ लागतं. त्याच्यासमोर माझ्या एका नातेवाईकाचा प्रचंड जुना वाडा 

आहे. तिथं माझे एक मित्रही रहात आहेत म्हणून माझं तिकडे जाणं येणं वारंवार घडतं.

असंच एकदां सकाळचा मी तिकडे गेलों होतों. त्या ल्हानशा सज्जांत बसून सकाळचं ऊन अंगावर घेत मी व माझा मित्र चहा पीत होतों. बोलतां बोलतां माझ्या मित्राचं लक्ष खालीं गेलं. व हंसून त्यानं मोठ्यानं हाक मारली—

" काय...मोरया; काय चाललंय ? "

मीही सहजच सज्जाच्या लोखंडी गजांतून पाहूं लागलों. खालचा प्रशस्त चौक स्पष्ट दिसत होता. तेथें एक वयस्कर व्यक्ति धोतर धूत होती. थोडीशी सुरकतलेली तिची उघडी पाठ मला दिसत होती. धोतराचे सोगे वर खोवले होते. एका हातानं आडावर बसवलेल्या पंपानं खालच्या बादलींत पाणी उपसीत व दुसऱ्या हातानं खांद्यावरून घरंगळलेलं जानवं सावरीत ती व्यक्ति ओणवी उभी होती.

माझ्या मित्राच्या हाकेनं त्यांनी मान वळवून वर पाहिलं.

माझा मित्र हंसत म्हणाला—" काय, धोतर धुणं चाललंय का ? "

त्या गृहस्थानं कुठल्याही तऱ्हेचा आविर्भाव चेहऱ्यावर न दाखवतां होकारार्थी मान हलविली व पुन्हां आपल्या कामास सुरवात केली. साहजिकच मीं विचारलं—" कोण रे ? "

माझा मित्र म्हणाला—" वरच्या मजल्यावर नुकतेच रहायला आले आहेत. गेल्या आठवड्यांत तूं आला नाहींस इकडे. नाहीं तर तुला समजलं असतं. "

" कांहीं विशेष ? "

" छे तसं कांहीं नाहीं. आहे आपला एक पेन्शनर म्हातारा. कुठं तरी मामलेदार कचेरींत होता. ना बायको ना पोर! एकटा रहातोय अगदीं ! मला एकाच गोष्टीची गंमत वाटली.

 परवां सहजच मी वर गेलों होतों. म्हटलं यांच्या खोलींतही

डोकवावं. मी दाराजवळ गेलों तर हे कुणाशीं बोलत आहेत असं वाटलं. कारण माझ्या कानीं शब्द पडले. 'मोरया...हं आतां करा स्वैंपाकाला सुरवात! पण मोरया, आज भाजी काय करायची?...' मी जरा थबकलों...पण जरा वेळानं पाहिलं तर ते एकटेच होते व स्वतःशीं मोठ्यानं बोलत बोलत त्यांचं काम चालू होतं!"

"त्यांचं नांव मोरया आहे कीं काय?" गमतीनं मनुष्य स्वतःला नांवानं हाक मारून काम करतो एकादे वेळीं, ही कल्पना येऊन मीं विचारलं.

"अंऽहं. त्यांचं नांव आहे विष्णुपंत!"

"मग मोरया कोण?"

"त्यांचं कुलदैवत आहे तें!" माझा मित्र हंसत म्हणाला. "त्यांच्या देवघरांत एक मोठी पितळेची सुरेख मूर्ति आहे, त्याला साक्षी ठेवून सारे व्यवहार चालले असतात त्यांचे!"

"अरे वा, विचित्रच आहे!"

"हं...घरांत असले कीं, सदा मोरयाच्या नांवानं बोलत असतात. वाड्यांत आतां साऱ्यांना ठाऊक झालं आहे तें. मी त्यांचं नांव म्हणूनच मोरया ठेऊन दिलंय...! आणि आतां सारेच त्यांना या नांवानं हाका मारतात!

माझा मित्र मजेनं हंसूं लागला.

मी खालीं वाकून त्या गृहस्थाकडे पाहूं लागलों.

विष्णुपंताकडे त्यावेळीं पाहतांना, किंवा मागाहून मी त्यांना बरेच वेळां पाहिलं तेव्हांही, कुतुहल उत्पन्न करण्यासारखं त्यांच्यांत कांहीं आहे, असं मला मुळींच वाटलं नाहीं. जुन्या पिढींतले गबाळपणानं राहणारे, कारकुनींत आयुष्य गेलेले जे शेकडों शे लोक असतील त्यांच्यापेक्षां वेगळं असं कांहीं विष्णुपंतांत नव्हतंच. किंबहुना, हें मोरया प्रकरण नसतं, तर परिचयापोटीं वृद्धत्वाविषयीं औपचारिक आदर 

दाखविण्यापलिकडे त्यांची दखल घ्यायची जरुरीही कुणाला वाटली नसती! आणि तसं करण्यांत त्यांना कांहीं अन्याय होतो आहे असंसुद्धां नव्हतं. कारण शिक्षण, लग्न, नोकरी, धडपड, मुलंबाळं, लग्नमुंज्या, मृत्यू...इत्यादि गोष्टींपलीकडे त्यांच्या आयुष्याचे रंग विशेषपणानं उजळविणारं कांहीं घडलेलंही नसतं बहुधा.

मात्र, मोरयाला हाकारीत, स्वतःशीं मोठ्यानं बोलत. नि त्याचे तेच ते उद्योग एकटेपणानं करीत रहाण्याची विष्णुपंताची संवय थोडी कुतूहल वाटण्याजोगी होती, यांत शंका नाहीं.

त्यांच्याशीं माझी ओळख ताजी असतांना असा एक दुष्ट विचार माझ्या मनांत येऊन गेला कीं, या गृहस्थाचां एकादा 'स्क्रू' तर ढिला नाहीं? कारण वेडसर लोकाशिवाय अशी कृति कुणांत आढळते?

पण माझी खात्री झाली कीं हा माझा कयास नुसता चुकीचाच नाहीं तर दुष्टपणाचा आहे. कारण विष्णुपंताबद्दल एक प्रकारें कीव वाटावी असं कांहीं त्यांच्यांत होतं खरं.

त्यांच्याशी बोलतांना मी एकदां विचारून घेतलं होतं. त्यावरून त्यांच्या जीवनांत जो शोकान्त भरलेला होता त्याची चांगलीच कल्पना मला आली होती. दिवसभर कष्ट उपसीत खर्डेघाशी करणाऱ्या मनुष्याच्या आयुष्यांत सुखाचे क्षण ते काय असणार? अशा माणसाचं आयुष्य म्हणजे सदा काळ्या ढगांनीं भरलेलं आकाश! दैवाच्या कृपण हातानं त्या मेघडंबरीचं झांकण एकादे वेळीं उघडलं तर क्षणभर लखकन् होईल तेवढंच!

पुन्हां अंधार आहेच आपला!

 नित्याच्या संवयीनं अडीअडचणींचा बोंचरेपणा कमी होतो,

तसं विष्णुपंताचं झालं असेल असं मला वाटतं. पण त्यांच्या कुटुंबाची जी वाताहात झाली त्याचं शल्य मात्र त्याच्या मनांत घर करून बसलं होतं. एकाद्या कथेंत ही हकीकत सांगितली तरी खरीसुद्धां वाटायची नाहीं. विष्णुपंतांना एक मुलगा व एक मुलगी होती. मुलाचं लग्न जुन्या पद्धतीनं झालं होतं. कांहीं वर्षे सारं ठीक होतं. पण एक दिवस अशी बातमी आली कीं ती मुलगी आडांत पडून मरण पावली! विष्णुपंत म्हणतात, हा साधा अपघात नाहीं! त्यांचा मुलगा मात्र मोटारखालीं सांपडला होता. व आठ दिवस हॉस्पिटलमध्यें विव्हळत पडून वेदनांनीं त्यानं प्राण सोडला.

दीर्घकालपर्यंत नवराबायको एकमेकांच्या सुखदुःखाला जपत–सांभाळीत दिवस कंठीत होते. अगदीं उतार वयांत पुन्हा त्यांना मूल होण्याची आशा उत्पन्न झाली. पण आडवं येऊन मूल आणि त्याची आई दोन्हीही कामास आली!

विष्णुपंत तेव्हांपासून एकटेच आहेत!

ही सारी हकिकत अंगावर शहारे आणणारी होती! पण त्यांतही मला आश्चर्य वाटलं तें याचं कीं, मी अगदीं सहानुभूतीनं विचारीत असतां विष्णुपंतांनीं मला उघड उघड नाखुषीनं सारं सांगितलं होतं. पण मला त्याचं वाटलं नाहीं फार. स्वतःच्या जखमा पुन्हां पुन्हां उघड्या करणें कुणालाही प्रिय नसतें. त्यांतून विशेष संवेदनाशील माणसांला त्याचा उच्चार देखील अतितापदायक होतो. विष्णुपंतांच्या नाखुषीचें कारण दुसरें काय असूं शकणार?

पण काळ दुःख विसरावयाला लावतो म्हणतात ना? मग विष्णुपंतांच्या बाबतींतच या काळ्या स्मृतींच्या घोर छाया अजून कशा रेंगाळत राहिल्या होत्या? का, विष्णुपंताकडे किलकिल्या डोळ्यांनीही पहायचं काळ विसरून गेला होता?

"मोरया! उठा...उजाडलं!

मोरया! चला चहा करायचा ना?

मोरया! आतां स्नान करून येऊं...नि मग देवपूजा.. जेवण.

मोरया! पण भाजी काय करायची आज?.... "

केवढा उदासपणा भरलेला होता या साऱ्या गोष्टींत!

किती निर्विकारपणानं विष्णुपंत सारे व्यवहार त्याच त्या क्रमानं सारखे करीत!

मला वाईट वाटे कीं, विष्णुपंत आमच्यासारख्या पोरांत नाहीं तरी त्यांच्या वयाच्या माणसांत कां मिसळत नाहींत? अशा आपत्तींतून होरपळलेले कांहीं कमी लोक मला ठाऊक नाहींत. पण ते सुद्धां संध्याकाळीं काळ्या रामाच्या दर्शनाला जाऊन, तेथल्या सभामंडपाच्या ओट्यावर चकाट्या पिटीत बसतात. नाहींतर सायंसंध्येसाठीं रामगईच्या पात्रावर बसतांना हिंदुमहासभेच्या राजकारणापासून तों आजच्या पोरांचे लेहेंगे नि पोरींचे शेपटे यांवर चर्चा करीत असतात! विष्णुपंत असं कां करीत नाहींत?

त्यांच्या मोरयावरून वाटेल हा गृहस्थ धर्मनिष्ठ असावा. पण नित्याची स्नानसंध्या, पूजा यांखेरीज ते कांहींच करीत नाहींत. रामदर्शनालासुद्धां जातील ते एकादशीसारख्या दिवशीं!

विष्णुपंतांना वाचण्याचा, गप्पांचा, फिरण्याचा किंवा करमणुकीचाही कांहीं शोक नाहीं. तपकीरीशिवाय दुसरं व्यसन त्यांना ठाऊक नाहीं.

कुणी बोललं कीं ते बोलतातही. आणि त्यांच्या बोलण्यांत उदासपणा किंवा जीवनाची दुःखपूर्णता असते असं मुळींच नाहीं. कांहीं वेळेस ते थट्टा करून मजेनं बोलतात देखील! पण कां कुणास ठाऊक, ही त्यांची प्रकृति वाटत नाहीं.

 म्हणूनच त्यांच्याकडे पहातांना पाण्यानें लवलेल्या गडद

काळ्या मेघाची मला आठवण होते. ज्याची जाणीव कुठल्याही तऱ्हेच्या आवाजानं नव्हे तर नुसत्या अस्तित्वानं होईल असा मूर्त अंधार पुढं आहेसा वाटतं, आणि भीति वाटते कीं जरा चुकून कुठं बोचलं गेलं कीं हा भळभळा वहायला लागेल ! !

या कारुण्याचे हेलकावे मला बसतात म्हणून तर त्यांच्या ' मोरया 'ला वेडसरपणा किंवा मनोविकृति म्हणयण्चा मला धीर होत नाहीं.

आणि मला वाटतं कीं विष्णुपंतासारख्या माणसांना जीवनाची खोली कळलेली असते, पण जीवनाचा विस्तार त्यांना जाणवलेला नसतो.

स्वतःच्या सुखदुःखांत खोल गढलेलं त्यांचं मन उसळी मारून वर यायला व आपला एकांगीपणा अफाट विविधतेंत विरवून टाकायला असमर्थच झालेलं असतं.

म्हणून त्यांच्या सुखाचा एकदां अस्त झाला कीं अमावास्येची अंधारी रात्र जी सुरू होते, तिचा अंतच होत नाहीं. दुबळेपणानं ते त्या अंधारांतच धडपडत रहातात. अंधाराच्या पलीकडचं अरुण जग त्यांना काळोखामुळं दिसत नाहीं, मनाच्या डोळ्यांनीं पहातां येत नाहीं.

आम्ही तरुण मुलं नाहीं का प्रेमभंग झाला म्हणजे एकलेपणाच्या आगींत होरपळत जळतो...आणि मग जळत चाललेल्या काळ्या अग्निशिखा आमच्याभोंवती अंधार उभा करतात ? पण...पण...आमचें मन मात्र आंतून ' जोडीस शोधिते उदास आपुल्यावाणी ' विष्णुपंतांच्या बाबतींत या इंद्रजालांना थाराच नाहीं.

ते अंतर्यामींही एकटे आहेत !

म्हणूनच ते स्वतःशीं मोठ्यानें बोलून दुकटेपणाचा आभास करीत असावेत.

एरव्ही काय सांगू मी ?

कल्पनेनंही माझे डोळे भरून येतात...वाटतं कीं एकाद्या दिवशीं बेसुमार तापानं फणफणत विष्णुपंत अंथरुणावर तळमळत पडतील...आणि भरलेल्या जगाची बेहद्द गजबज भोंवतीं चालू असतांनाही....

त्या निर्जीव पितळी मूर्तिकडे ओढलेले डोळे फिरवीत स्वत:शीं बडबडतील—

" मोरया...संपली बरं कां आपली संगत ! "

' उन्मेष '

# मी स्त्री आहे

नित्याच्या संवयीनं ज्याच्या अस्तित्वाचीसुद्धां एकादेवेळेस आठवण रहात नाहीं अशा प्रकारांत जवळ जवळ विनायकची व माझी मैत्री गेली होती. म्हणून आम्ही मोकळेपणानं केव्हां बोलायला लागलों हें मला यत्न करूनहि नीट आठवत नाहीं. गेल्या वर्षापर्यंत आम्ही समोरासमोर रहात होतों. आतां तो जरा दूर रहायला गेला होता. तरी आमचं जाणंयेणं कायम होतं. बहुधा तोच आमच्याकडे यावयाचा. त्याच्या वडलांची व बाबांची ओळख होती. विनायकसुद्धां आमच्याकडे आला कीं सर्वांशीं मनमोकळेपणानं बोलून जावयाचा.

त्याच्या वागण्या-बोलण्यांत असं विशेष कांहीं नव्हतं कीं ज्यामुळं त्यांच्या-आमच्या घरांतील हालचालीवर आईनं किंवा बाबांनीं मुद्दाम लक्ष ठेवावं. अगदीं सहज तो येई. घरांत आईशीं जरा वेळ कांहींतरी बोलत राही. बाबा असले नि त्यांच्या तो दृष्टीस पडला कीं ते कांहीं चौकशी करीत. सहजपणें तो उत्तरं देई. आणि या सहजपणानंच तो माझ्या खोलींत येई. अर्धा

पाऊणतास किरकोळ गप्पा मारीत बसे. आणि तितक्याच सहजपणानं निघून जाई.

यावर्षी मात्र मी मुद्दाम कांहीं वेळेस त्याच्याकडे गेलें होतें. पण बहुधा त्यालाच ये म्हणून सांगितलं होतं. कारण गणिताचं व माझं पल्यिापासून फार प्रेम होतं! यंदाच्या परीक्षेच्या दडपणानं मी इतकी चिरडून गेलें होतें कीं मी नापास होण्याचं चित्र भडकपणं माझ्यापुढं रंगून येई. आणि भीतीनं खूप धसका बसे. या स्थितींत अगदीं सहजपणानं मी विनायकचा आसरा शोधला होता. तो सायन्स कॉलेजांत शेवटच्या वर्षाला होता. आणि माझ्या अडचणी सहज सोडविण्याइतकी बुद्धीची मातबरी त्याच्याजवळ खास होती.

एकांदेवेळेस तासन् तास गणितांतल्या अडचणी मला समजावून देत तो माझ्या खोलींत बसे. एकदां बाबा खोलींत आले असतां म्हणाले—

" विनायक, कर बुवा हिला जरा मदत! मला काळजीच वाटते आहे यंदां हिच्या पास होण्याची. तुझंही शेवटचं वर्ष आहे नाहीं का पण ? "

नेहमींच्याच सहजपणानं तो म्हणाला—

" हो...पण हिला मधून मधून सांगण्यानं माझ्या अभ्यासांत कांहीं फारसा व्यत्यय यायचा नाहीं. "

" असं ना ? मग दे लक्ष जरा हिच्याकडे. "

आणि एकदां आई म्हणाली होती—

" विनायक, पास होईल का रे गोदू यंदां ? तूं सांगत जा कीं मधून मधून तिला कांहीं. "

" सांगेन कीं...... "

जितक्या सहजपणानं या गोष्टी घडल्या तितक्याच सहजपणानं त्या चालूं राहिल्या होत्या. आणि प्रत्यक्ष मला

 समजावून देत असतांनासुद्धां विनायकचा सहजपणा सुटला

नव्हता. वर्गातले एखादे शिक्षक जितक्या निर्विकार शांतपणें एखादी अडचण समजावून सांगत, तसंच त्याचं सांगणं चालत असे! एखादेवेळेस त्यानं बराच वेळ सांगूनहि माझ्या डोक्यांत प्रकाश पडत नसे आणि मी समजलं नाहीं म्हणून शेवटीं म्हटलं कीं तो जरासा चिडून जायचा. पण लगेच अगदीं सूक्ष्मपणें हंसून तो पुन्हां स्पष्टीकरणाला सुरवात करायचा.

आमचं हें एकत्र बसणं आतां सर्वांच्या इतकं परिचयाचं झालं होतं कीं कुणालाच त्याबद्दल मुद्दाम कांहीं वाटण्याची जरूरी राहिली नव्हती.

सध्यां जरी आमचं बोलणं अभ्यासाभोंवतीं घुटमळत असे, तरी पूर्वीसुद्धां मुद्दाम लक्षांत राहण्यासारखे संभषणाचे प्रसंग आमच्यांत झाले नव्हते. विनायक किंवा मी अबोल होतों असं मुळींच नव्हतं. पण आमचं बोलणं इतक्या किरकोळ गोष्टीविषयीं होत असे कीं दुसऱ्या दिवशीं येवढें तास दोन तास काय बोलत होतों, हें प्रयत्न करूनसुद्धां चांगलं आठवत नसे. विनायकाला काव्यवाङ्मयावर बोलण्याची फारशी आवड नव्हती आणि मासिकांतल्या गोष्टी किंवा कांहीं कादंबऱ्या वाचण्यापलीकडे मलाही त्यांची चर्चा करण्याची इच्छा कधीं होत नसे.

मात्र या ठराविक चक्रांतून फिरत असतांना विनायकचा एक स्वभावविशेष माझ्या ध्यानीं अभावितपणें आला होता. बोलतां बोलतां अगदीं अचानकपणें तो कांहीं विचारी किंवा सांगे. त्याच्या वर्गातल्या एकां पारशी मुलीची हकिकत त्यानं अशीच अकारण मला सांगितली होती. तो सांगत असतांना कुठल्या तरी कुतुहलानं मी अगदीं लक्षपूर्वक ऐकत होतें. पण ती हकिकत सांगून संपल्यावर तो म्हणाला—

" सहज आठवलं हें सारं ! "

आणि अगदीं सूक्ष्मपणानं हंसून त्यानं आमच्या त्या नित्याच्या किरकोळ गप्पांचा तुटलेला धागा पुन्हां उचलला होता. नंतर त्या पारशी मुलीविषयीं एक अक्षरही तो माझ्याशीं बोलला नव्हता.

आणि परवां बीज गणितांतला एक 'फॉर्म्युला' मला समजावून देऊन त्यानं तें मला लगेच लिहून काढायला सांगितलं होतं. मी माझ्या डोक्यांतला गोंधळ पुढ्यांतल्या कागदावर उतरविण्यांत गुंतलें होतें. आणि मला वाटतं, विनायक खिडकींतून बाहेर रस्त्याकडे पहात होता. अगदीं अचानकपणें तो मला म्हणाला—

"गोदू, वेणीचा शेपटा कां नाहींस सोडीत तूं?"

त्या अर्थहीन एक्स्-वाय-झेड्-मधून बाहेर येऊन त्याचा प्रश्न समजावून घ्यायला मला चांगलाच वेळ लागला. मी त्याला 'काय' म्हणून विचारलं आणि अगदीं सहजपणानं त्यानं तो प्रश्न पुन्हां केला. मला त्या अनपेक्षितपणाचं नि असंबद्धपणाचं हंसू आलं. मी हंसतच विचारलं—

"कां रे?"

"अंबाड्यापेक्षां चांगला दिसतो शेपटा!"

आणि मी कांहीं बोलायच्या आंतच तो त्या अर्थहीन एक्स्-वाय्-झेड्कडे वळलादेखील!

नकळत शेपटा सोडायला मी सुरवात केली होती त्यानंतर! विनायक त्यावर पुन्हां कांहीं बोलला नाहीं कधीं.

विनायकचा हा अचानकपणा माझ्या जाणिवेंत चांगलाच भिनला होता. आणि त्याची असं कांहीं सांगण्याची किंवा विचारण्याची पद्धतही जरा स्मरणीयच होती. अगदीं क्षुल्लक गोष्टी आपण जशा सांगूं तशा भावनारहिततेनं तो सारं विचारी किंवा सांगे!

त्या दिवशीं संध्याकाळीं विनायक जरा लवकरच आला होता. त्यानं म्हटलं म्हणून आईला सांगून मी त्याच्याबरोबर फिरायला बाहेर पडलें होतें.

नेहमींचा जवळचा रस्ता टाकून आम्ही लांबच्या रस्त्यानं चालत होतों. मला ही बाजू फार आवडत असे. पण इकडे थोडेजणच जात असल्यानं, सोबतीला असल्याशिवाय, इच्छा असूनही जाण्याचं धैर्य मला होत नसे.

नागमोडी वळणानं हा रस्ता खूप दूरवर गेलेला होता. आणि तीन चार वळणं संपलीं कीं, कडेच्या गर्द झाडांच्या वाकलेल्या कमानींतून पलीकडची टेकडी हळुहळू दिसावयास लागे. टेकडी कांहीं फार उंच नव्हती. तिच्या माथ्यावर चढून जाणं मुळींच कष्टाचं नव्हतं. माथ्यावरच्या हिरवळीवर उभं राहिलं म्हणजे मात्र फार मजा वाटत असे. कारण प्रदेशाच्या एकंदर खोलगटपणामुळं, पाठीमागं वळून पाहिलं कीं वृक्षांच्या राईतून आळसटपणानं बेफिकीर पसरलेलं शहर दिसे. आणि समोर विजेच्या तारांच्या जाळ्यांतून दूरच्या स्टेशनाचे भाग दिसत. नेमक्या वेळीं आलं तर तर धूर सोडीत स्टेशनांत येऊन थबकणारी किंवा स्टेशन सोडून निघणारी आगगाडी दृष्टिपंथांत येई. आणि तिथंच क्षितिजाची रेषा येऊन मिळाल्यासारखी वाटे.

टेकडीच्या माथ्यावर येऊन बसल्यावर, तारांच्या जाळ्यावरून आकाशाकडे दृष्टि फेकीत विनायक म्हणाला—

“तुला इकडे यायला आवडतं का?”

“हो. पण एकटं यायचा धीर होत नाहीं मला. कुणी येतच नाहीं फारसं या बाजूला!”

“म्हणूनच मला आवडते ही जागा! मी इथं येऊन खूप वेळां बसतों. आणि मला नेहमीं आश्चर्य वाटतं. आमच्या

आणि अगदीं सूक्ष्मपणानं हंसून त्यानं आमच्या त्या नित्याच्या किरकोळ गप्पांचा तुटलेला धागा पुन्हां उचलला होता. नंतर त्या पारशी मुलीविषयीं एक अक्षरही तो माझ्याशीं बोलला नव्हता.

आणि परवां बीज गणितांतला एक ' फॉर्म्युला ' मला समजावून देऊन त्यानं तें मला लगेच लिहून काढायला सांगितलं होतं. मी माझ्या डोक्यांतला गोंधळ पुढ्यांतल्या कागदावर उतरविण्यांत गुंतलें होतें. आणि मला वाटतं, विनायक खिडकींतून बाहेर रस्त्याकडे पहात होता. अगदीं अचानकपणें तो मला म्हणाला—

" गोदू, वेणीचा शेपटा कां नाहींस सोडीत तूं ? "

त्या अर्थहीन एक्स्-वाय-झेड्-मधून बाहेर येऊन त्याचा प्रश्न समजावून घ्यायला मला चांगलाच वेळ लागला. मी त्याला 'काय' म्हणून विचारलं आणि अगदीं सहजपणानं त्यानं तो प्रश्न पुन्हां केला. मला त्या अनपेक्षितपणाचं नि असंबद्धपणाचं हंसू आलं. मी हंसतच विचारलं—

" कां रे ? "

" अंबाड्यापेक्षां चांगला दिसतो शेपटा ! "

आणि मी कांहीं बोलायच्या आंतच तो त्या अर्थहीन एक्स्-वाय्-झेड्कडे वळलादेखील !

नकळत शेपटा सोडायला मी सुरवात केली होती त्यानंतर। विनायक त्यावर पुन्हां कांहीं बोलला नाहीं कधीं.

विनायकचा हा अचानकपणा माझ्या जाणिवेंत चांगलाच भिनला होता. आणि त्याची असं कांहीं सांगण्याची किंवा विचारण्याची पद्धतही जरा स्मरणीयच होती. अगदीं क्षुल्लक गोष्टी आपण जशा सांगूं तशा भावनारहिततेनं तो सारं विचारी किंवा सांगे !



● ●

त्या दिवशीं संध्याकाळीं विनायक जरा लवकरच आला होता. त्यानं म्हटलं म्हणून आईला सांगून मी त्याच्याबरोबर फिरायला बाहेर पडलें होतें.

नेहमींचा जवळचा रस्ता टाकून आम्ही लांबच्या रस्त्यानं चालत होतों. मला ही बाजू फार आवडत असे. पण इकडे थोडेजणच जात असल्यानं, सोबतीला असल्याशिवाय, इच्छा असूनही जाण्याचं धैर्य मला होत नसे.

नागमोडी वळणानं हा रस्ता खूप दूरवर गेलेला होता. आणि तीन चार वळणं संपलीं कीं, कडेच्या गर्द झाडांच्या वाकलेल्या कमानींतून पलीकडची टेकडी हळुहळू दिसावयास लागे. टेकडी कांहीं फार उंच नव्हती. तिच्या माथ्यावर चढून जाणं मुळींच कष्टाचं नव्हतं. माथ्यावरच्या हिरवळीवर उभं राहिलं म्हणजे मात्र फार मजा वाटत असे. कारण प्रदेशाच्या एकंदर खोलगटपणामुळं, पाठीमागं वळून पाहिलं कीं वृक्षांच्या राईतून आळसटपणानं बेफिकीर पसरलेलं शहर दिसे. आणि समोर विजेच्या तारांच्या जाळ्यांतून दूरच्या स्टेशनाचे भाग दिसत. नेमक्या वेळीं आलं तर तर धूर सोडीत स्टेशनांत येऊन थबकणारी किंवा स्टेशन सोडून निघणारी आगगाडी दृष्टिपंथांत येई. आणि तिथंच क्षितिजाची रेषा येऊन मिळाल्यासारखी वाटे.

टेकडीच्या माथ्यावर येऊन बसल्यावर, तारांच्या जाळ्या-वरून आकाशाकडे दृष्टि फेकीत विनायक म्हणाला—

" तुला इकडे यायला आवडतं का ? "

" हो. पण एकटं यायचा धीर होत नाहीं मला. कुणी येतच नाहीं फारसं या बाजूला ! "

" म्हणूनच मला आवडते ही जागा ! मी इथं येऊन खूप वेळां बसतों. आणि मला नेहमीं आश्चर्य वाटतं. आमच्या

सायन्सप्रमाणं पाहिलं तर इथल्या कुठल्याच गोष्टींत विस्मयकारक असं कांहीं नाहीं. झाडं म्हणजे झाडं...टेकडी म्हणजे माती... आकाश म्हणजे पोकळी...आणि या समोरच्या तारा म्हणजे मनुष्यानं कोंडून ठेवलेली वीज! हे आकाशांतले चित्र-विचित्र रंगसुद्धां धुळीच्या कणांच्या अस्तित्वामुळं प्रकाश-किरणांनीं घेतलेलीं रूपं आहेत, असं आम्ही सांगू शकतों! पण हें सारं समजत असतांना सुद्धां इथं ज्या विस्तृतपणा-च्या संवेदना मनांत उत्पन्न होतात त्यांचं कारण मात्र कळत नाहीं! तरीसुद्धां इथं येऊन एकटंच बसण्यांत मला नेहमींच आनंद वाटतो.'!

विनायक काय सांगत होता तें माझ्या जाणीवेचीं दारं उघडून आंत शिरणं जरा कठीणच होतं! पण त्याचं शेवटचं वाक्य पकडून मी म्हटलें—

"एकटं येऊन बसण्यांत तुला आनंद वाटेल तर काय झालं! किती केलं तरी पुरुष आहेस तूं."

तो माझ्याकडे वळला आणि सूक्ष्मपणं हंसून एकदम इंग्रजींत म्हणाला—

"या संवेदनांचा स्त्रीपुरुषांचा अनुभव जरी कदाचित् भिन्न असला तरी एकत्रपणाची संवेदना दोघांची सारखीच असते, नाहीं?"

विनायकच्या अचानचपणाची मला चांगलीच जाणीव होती. पण आतांच्या प्रश्नाचा रोंख मला समजला नाहीं. मात्र मला अकारण बावरल्यासारखं झालं. मी विचारलं—
"म्हणजे काय?"

विनायक मोठ्यानं हंसला! असा तो क्वचित्च हंसतो हें मला ठाऊक होतं, म्हणून मला अधिकच बावरल्या-गत झालं.

 पण माझ्याकडे पहात तरलपणानं तो म्हणाला—

" अगदींच बावळटासारखं काय करतेस असं? तरुण स्त्री-पुरुषांना एकांतांत बसलं म्हणजे ज्या शारिरीक संवेदना अनुभवाला येतात, त्या ठाऊक नाहींत तुला?"

काय उत्तर द्यावं तेंच सुचेना मला. विनायक बोलायला लागला कीं सहजपणें वाटेल तें बोलून जातो! पण आतां माझ्या मनांत, कुठून कुणास ठाऊक, भीति शिरली. आणि तिची प्रतिक्रिया म्हणून माझं सारं शरीर थरारून गेलं!

डोळे माझ्याकडे, पण कुठें तरी पहात विनायक मात्र बोलत होता—

" निसर्गाचं हें आकर्षण किती प्रभावी असतं नाहीं? पण याचा शेवट जिथं इष्ट तोंच व्हायचा असतांना सुद्धां कसल्या मर्यादशीलपणानं आपण त्याला बांध घालतों, कुणास ठाऊक! मला समजत नाहीं...आणि मग मला खूप चीड-सुद्धां येते!"

ज्या टेकडीवर आम्ही बसलों होतों तिच्यासारखं मलाही भुसभुशीत होत असल्यासारखं वाटूं लागलं! स्थिरता कणा-कणांनीं उडूं लागली...तसं मी धीर करून म्हटलं—

" ए...अंधार पडूं लागलाय्. आपल्याला उशीर होईल. चल ना आतां!" आणि मी उठून टेकडी उतरूंही लागलें... सूक्ष्मपणें हंसत विनायक उठला. व जरा धांवत माझ्यामागं येत म्हणाला—

" थांब...मला येऊं देशील कीं नाहीं?"

क्षणांतच तो माझ्याजवळ आला, आणि अचानकपणं त्यानं माझा हात आपल्या हातीं घेतला. कराग्रापासून कसली तरी ऊष्ण संवेदना माझ्या जाणीवेपर्यंत जाऊन पोहोंचली. आणि साऱ्या शरीरभर तिचे कण फुलून आले!

टेकडीच्या पायथ्याशीं चार दोन क्षणांतच आम्ही पोहों- 

चलों. आणि अगदीं नकळत, पण प्रयत्नानं, मी माझा हात सोडवून घेतला !

विनायकनं माझा हात पुन्हां धरला नाहीं. पण तो माझ्या-जवळून चालत असतांना त्याच्या सांन्निध्याच्या केवळ उष्णतेनं त्या संवेदनेचे कण माझ्या शरिरांत वहरत होते. मला इतकं कांहीं विचित्र वाटत होतं कीं काय करावं तेंच सुचेना ! दाटलेले भाव ओठांच्या बांधावर आपटून आंतल्या आंत परतत होते आणि विनायककडे डोळे उचलून पहाण्याचा मला धीरच होत नव्हता !

विनायक मात्र, शरीरशास्त्र...जीवनशास्त्र...असं कांहीं तरी सारखं बोलत होता. त्यांतलं एक अक्षरही मला कळत नव्हतं ! पण त्याच्या बोलण्याचे नाद माझ्याभोंवतीं पसरत नसते तर, त्या विलक्षण शांततेंत मला गुदमरल्यासारखं होऊन गेलं असतं, असं मला नक्की वाटलं. त्या नादानंच माझ्या पायाची शक्ति कायम राहिली होती !

हा नागमोडी रस्ता संपून जिथं नेहमींचा सरळ रस्ता सुरू होतो, तिथल्या कोपऱ्यावर डाव्या हाताला एक मोठं चिंचेचं झाड होतं. तिथं पोहोंचतांच विनायक थांबला. मी चालतच राहिलें असतें...पण त्यानं माझ्या बाहूला धरून मला थांबवलं...आणि नेहमींच्या सहज अचानकपणें तो म्हणाला—

" गोदू, आपण दोघं लग्न करूं या का ? "

अभावितपणं माझे डोळे वर उचलले गेले...निमिषमात्रच त्याच्या डोळ्यांत खिळले. आणि पुन्हां अभावितपणं खालीं वळले !

विनायक मला धक्क्यावर धक्के देत होता !

 त्याच्या वाक्याचा संकलित अर्थ ज्यावेळीं मला उमजला

त्यावेळीं मी कमालीची लाजून गेलें! मला तिथं त्याच्या इतकं जवळ उभं राहणं अशक्य झालं!

माझ्या बाहूवरच्या त्याच्या बोटांची पकड अधिक घट्ट झाली. तसें माझ्या मुखांतून आपोआप शब्द बाहेर पडले—

" आतां नको ना रे...? "

तो काय करणार होता याची मला मुळींच कल्पना नव्हती...आणि कुठल्या जाणीवेनं मी ते शब्द उच्चारले होते याचा मला अजूनपर्यंत पत्ता लागला नाहीं.

पण त्यानं माझा बाहू सोडून दिला, आणि माझ्याबरोबर तोही झरझर चालूं लागला, हें मला आठवतं.

आमच्या दाराशीं मी येऊन पोहोंचलें तसं हंसत उच्चारलेलं त्याचं वाक्य माझ्या पाठीशीं आलं—

" मी उद्यां येईन बरं का ! "

वेगानें जिना चढून मी वरच्या उंबरठयापाशीं आलें आणि दाराच्या चौकटीला धरून क्षणभर उभी राहिलें.

आणि क्षणांतच मला कमालीच्या गोंधळांत टाकणाऱ्या त्या साऱ्या संवेदनांची संकलित जाणीव मला झाली! तिथं मी तशी एकटी उभी असतांना, आतांपर्यंत अनुभवाला आलेला तो शरिराचा कंप, मनाची ती अस्थिरता, आणि भावनांचा तो आवेग चटकन् विलीन झाला. सारा गोंधळ एका मुर्शीतून रसरसून निघाला. माझं सारं शरीर आनंदानं फुलून आलं !

धांवतच मी स्वैंपाकघराकडे वळलें. माझ्या अधीर हांकेनं चुलीकडची दृष्टि आईनं दाराकडे वळविली होती.

दारांतच उभी राहून मी बोलूं लागलें—

" आई, विनायकनं मला आतां विचारलं कीं आपण दोघं... "

भरभर मी सारं बोलून टाकलं! आणि मग मला इतकं 

लाजल्यासारखं झालं कीं, ज्या आवेगानें मी आलें त्या आवेगांत मी माझ्या खोलीकडे धांवत गेलें आणि घाईनं दार आंतून लावून घेतलं !

● ●

मला वाटलं विनायक लवकर येईल. पण तो नेहमींच्या वेळेलाच संध्याकाळीं आला. आईला समजतांच तिनं त्याला बोलावून घेतलं. तिकडे जाऊन त्यांचं काय बोलणं चाललं आहे तें ऐकावं असं मला सारखं वाटत होतं. पण विनायक केव्हां येतो म्हणून अधीर झालेली माझी वृत्ति तो प्रत्यक्ष येतांच जड झाली. खुर्चींतून मला उठवेनासुद्धां ! जणूं साऱ्या शक्तींच्या अंधारांत फक्त जाणीवेची ज्योतच काय ती लकाकत होती !

विनायक आला तो जरा हंसतच आला. व माझ्या समोरच्या नेहमींच्या खुर्चीवर बसत म्हणाला—

" आईजवळ बोललीस वाटतं तूं ? "

मी त्याच्याकडे पाहिलं आणि कां कुणास ठाऊक, त्याच्या नजरेला नजर द्यावी असं मला वाटेना. अभावितपणं माझे डोळे दुसरीकडे वळले.

एरव्ही विचित्र शांततेचे क्षण माझ्या कधीं अनुभवाला आले नव्हते. मला वाटलं, नेहमींप्रमाणें कांहीं तरी बोलायला मला आज सुचत नव्हतं तरी, विनायक सहजपणें कांहीं तरी बोलूं शकेल. पण ती शांतता पळापळानं वाढूं लागली तसं मी तिरप्या नजरेनं त्याच्याकडे पाहिलं. तो खिडकीवाटे बाहेर रस्त्याकडे पहात होता आणि नेमकी ही संधि साधून माझी दृष्टि त्याच्यावर खिळली.

विनायकला मी कितीदां पाहिलं होतं ! पण त्याच्या आकृतीचे विशेष यापूर्वी माझ्या जाणिवेच्या कक्षेंत आले नव्हते. पण आतां मात्र—

 विनायक अगदीं सडपातळ होता. माझ्यापेक्षां तो खूपच

गोरा होता. त्याचं कपाळ जरा रुंद होतं. चेहरा किंचित् निमुळता होता. कपाळावर उजव्या बाजूला केसांच्या कुरळ्या बटा नेहमीं पुढं येऊन लोंबत असत. गाल फार खोलगट नव्हते. पण गालावरचं कातडं ताणून बसल्यासारखं वाटे. आणि त्यामुळें नाकाला जरा अधिकच उठाव आला होता. उघड्या कॉलरमधून गळ्याचीं हाडं दिसत. पण त्याचे डोळे इतके विलक्षण पाणीदार होते कीं, त्यामुळं त्याच्याकडे पहातांना शेलाटेपणाचा प्रत्यय आला तरी निरोगीपणाची खात्री लगेच पटत असे!

ज्या बारकाईनं मी त्याच्या अवयवांची पहाणी चालवली होती तिची जाणीव मला व्हायला आणि बाहेरची दृष्टि त्यानं आंत वळवायला एकच गांठ पडली. मी त्याच्याकडे सारखी पहात होतें हें त्याच्या ध्यानांत नक्कीच आलं असेल. ही कल्पना येतांच मला एकदम लाजल्यासारखं झालं. टेबलावरल्या उघड्या पुस्तकाकडे दृष्टि वळवून तो काय बोलेल याची मी वाट पाहूं लागलें.

तो माझ्याकडे पहात आहे हें माझी दृष्टि खालीं असूनही मला समजत होतं. आणि त्याबरोबरच क्षणाक्षणाला मला थरारल्यासारखं वाटत होतं.

क्षणभरानं तो म्हणाला—

"हं...काय पाहिजेय् तुला आज? काढ पाहूं..."

मी पुस्तक पुढं सरसाविण्याकरितां हातांची हालचाल केली. त्याच्या हाताचा मला स्पर्श झाला. यापूर्वी असा स्पर्श कितीतरी वेळां अभावितपणं झाला असेल. पण आतां मात्र माझ्या सर्व शरिरावर रोमांचाच्या लहरी उठल्या! त्यानं आज कांहीं समजावून सांगू नये असं मला वाटलं. काय विचारायचं आहे म्हणून त्यानं विचारलं असतं तर मला सांगायला कांहीं सुचलं नसतं.

आई त्यावेळीं अचानक आली नसती तर मी काय केलं असतं कुणास ठाऊक. ती कशाकरितां आली होती याच्याशीं मला कांहींच करावयाचं नव्हतं. पण ती खोलींत असल्यानं मला काय विचारायचं होतं हें मला सांगतां आलं. आणि मग नेहमींच्या सहजपणानं विनायक मला सांगूं लागला...

आई गेली तें मला समजलं नसतं. पण विनायकची दृष्टि दाराकडे वळली त्याबरोबर मीही तिकडे पाहूं लागलें. कारण तो सांगत असतांना माझं सारं लक्ष त्याच्या चेहऱ्याकडे होतं.

आम्ही खोलींत असतांना दाराच्या फळ्या किती लावलेल्या असत किंवा किती उघड्या असत हा विचार माझ्या मनांत कधींच आला नव्हता. पण आतां दार नीट उघडं ठेऊन आई गेली होती हें माझ्याही ध्यानीं आलं.

विनायकच्या कपाळावर एक बारीकशी आठी उमटून नाहींशी झाल्याचं मी पाहिलं.

क्षणांत तो पूर्वीप्रमाणं सांगूं लागला.

मधेंच त्यानं मला विचारलं..." समजलं का ? "

मी नुसती मान हालविली.

त्याबरोबर खुर्चीतून उठत तो म्हणाला—

" मग आज राहूं दे आतां. आणखी कांहीं असलं तर उद्या सांगेन. "

आणि तो निघूनही गेला

एरव्हीं मी जिन्यापर्यंत तरी त्याच्याबरोबर जात असें. पण आज मला सुचलंच नाहीं कांहीं.

मात्र खोलींत मी एकटीच आहे याची मला कल्पना आल्याबरोबर अभावितपणं मी माझे गाल तळहातांनीं दाबून धरले...आणि तोंडानं पुटपुटलें—

" विनायक...विनायक ! "

मला स्वतःला कळून चुकलं होतं कीं विनायकच्या आगमना-साठीं माझ्या साऱ्या वृत्ती अधीर बनून जात आणि तो आला कीं आनंदानं माझ्या शरीराचा कणन् कण फुलून जाई. बाबांशीं मी कांहीं बोलणं शक्यच नव्हतं. पण आईजवळही कांहीं बोला-यचा मला धीर झाला नाहीं. मात्र दोघांच्या एकंदर वागण्या-वरून आमच्या लग्नाला त्यांची संमति असल्याचं मला उघड दिसत होतं. आणि त्यामुळं माझा आनंद अधिकच फुलला होता.

पण विनायकच्या प्रत्यक्ष सानिध्यांत मला अजून कससंच वाटत होतं. पूर्वींचा तो विचित्र संकोच...तो थरकांप... चारदोन दिवसांतच ओसरला होता. पण मला जें भय वाटत होतं तें मात्र कमी झालं नव्हतं. त्यांत दुःखाची भावना नव्हती याबद्दल मुळींच संशय नव्हता...पण तें गोड भय माझी पाठ सोडीना हेंही तितकंच खरं.

म्हणून परतायच्या वेळेस खोलीच्या दारापाशीं थबकून दाराची एक फळी लोटीत विनायक जेव्हां हलक्या आवाजांत मला म्हणाला—

" इकडे ये पाहूं..."

तेव्हां मी स्तिमितपणं विचारलं..." कशाला ? "

त्यानं क्षणभर विचित्र नजरेनं माझ्याकडे पाहिलं आणि लगेच सूक्ष्मपणं हंसून तो म्हणाला—

" इकडे तर ये म्हणजे सांगतों. "

मी खुर्चींतून उठलें व हळुंहळूं त्याच्याजवळ जाऊं लागलें पण त्याच्याजवळ जातांच माझा श्वास एकदम खूप जोरानं चालला आहे याची मला जाणीव झाली. आणि त्यामुळं मला अधिकच दचकल्यासारखं झालं. मी कातरदृष्टीनें त्याच्याकडे पाहिलं. २९८

त्यानं दारांतून पलीकडे नजर टाकली आणि मग माझ्या-जवळ येऊन खांद्याला स्पर्श करीत तो इंग्रजींत म्हणाला—

" मला चुंबन घ्यायचंय तुझं..."

मला कळलं नाहीं मी एवढी कां दचकलें ती. विनायकाच्या तें लक्षांत येणं अगदीं सहज होतं. त्यामुळं मला खूप शरमल्या-सारखं झालं. मनाचा हा गोंधळ लपविण्याकारितां मी कसंबसं म्हणालें—

" आई पाहील ना ! "

विनायकनं माझ्या खांद्यावर ठेवलेलीं बोटं अधिक जोरानं दाबलीं. आणि त्याबरोबर कसली तरी उष्ण संवेदना माझ्या शरीरभर पसरली.

पण विनायकनं क्षणभरच तसा हात ठेवला. लगेच त्यानं तो काढून घेतला. मात्र तसं करतांना त्याच्या कराग्रांचा माझ्या गालाला ओझरता स्पर्श होऊन गेला. आणि पुन्हां त्या उष्ण संवेदनेनं मी रोमांचित झालें.

विनायक वळून निघून गेला.

तो गेल्याची जाणीव होतांच मी खिडकीजवळ धावत गेलें. व रस्त्यावरून संथ चाललेल्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहूं लागलें. मला वाटलं तो वळून पाहिलं...

● ●

सकाळपासून मला खूप खूप आनंदित वाटत होतं. आणि दुपारीं जेव्हां विनायक मला म्हणाला—" आपण सिनेमाला जाऊं या आज..." तेव्हां, या अकारण आनंदाचं जणुं कारण कळल्यासारखं मला वाटलं. आणि त्यामुळं मी अधि-कच आनंदीत झालें.

हर्षभरानं मी त्याला विचारलं—

" पण वेळ आहे ना अजून ? "

हंसत तो म्हणाला "हो...पण अर्ध्या तासांत आटोप सारं !"

मी धांवतच गेलें.

माझी गुलाबी साडी नेसून आणि त्याला आवडणारा शेपटा सोडून मी आलें तर आई माझ्या खोलींत येऊन विनायकशीं बोलत बसलेली मला दिसली. पोशाख करतां करतां मी आईशीं सिनेमाचं बोललें होतें. ती त्याला विचारीत होती—

"कसचा आहे सिनेमा ?"

"इंग्रजी." नेहमींच्या सहजपणानं त्यानं उत्तर दिलं.

"दुसरा नाहीं का कांहीं ?"

"नाहीं."

"आज शनवार आहे तेव्हां चारचा असेलच. चारच्या शोलाच जाऊं आपण."

मी जरा आश्चर्यानं विचारलं—

"तूं येणार आहेस आई ?"

माझ्याकडे वळून हंसत आई म्हणाली—

"हो. समजलं नाहीं तर तुम्हीं दोघं आहांतच कीं सांगायला ! मी लुगडं बदलतें तंवर थांबा."

मी विनायककडे पाहिलं. तो किंचित् चिडला आहे असं मला वाटलं. पण आईकडे वळून तो नेहमींच्या पद्धतीनं बोलला—

"येवढे पैसे मी आणले नाहींत."

"बरं...! मजजवळ आहेत पण..." आईनं हंसत उत्तर दिलं आणि ती निघून गेली.

तिकीटं वरच्या वर्गाचीं काढलीं होतीं. आंत शिरतांना आईनं मला पुढं व्हायला सांगितलं, आणि माझ्या शेजारच्या खुर्चीवर ती बसली. आपल्या शेजारच्या खुर्चीकडे पहात ती विनायला म्हणाली—

" इथं बैस ना. "

विनायकनं आईकडे न पाहिल्यासारखं करीत म्हटलं—

" नको. ती जागा चांगली आहे. "

आणि आमच्या पुढ्यांतून सरकून तो पलीकडे माझ्या शेजारच्या खुर्चीवर येऊन बसला.

सिनेमाकडे माझं म्हणावं तसं लक्ष नव्हतंच मुळीं. कारण विनायकच्या खांद्याचा माझ्या खांद्याला आणि त्याच्या गुडघ्याचा माझ्या पायाला जो सारखा स्पर्श होत होता त्यानं माझं भान गेल्यासारखं झालं होतं.

आणि पडद्यावरच्या नायकानं नायिकेला घट्ट मिठी मारून तिचं चुंबन घेतलं तसं विनायकानं माझा हात पकडून जोरानं दाबला. सुखाच्या ऊर्मि माझ्या शरीरभर पसरल्या. पण त्याच वेळीं आजुबाजूचे सारे लोक माझ्याकडे पहात आहेत असं मला वाटलं. क्षणभर पडलेला आईचा विसर नाहींसा झाला. मी चोरून तिच्याकडे पाहिलं. त्या अंधारांतही ती माझ्याकडे पहात आहे असा मला भास झाला. वेगानं मी माझा हात सोडवून घेतला.

सर्व गृहांत हंशा पिकला !

आईनं विचारलं—" काय म्हणाला ग तो ? "

दचकून मी म्हटलं–" कुठं कोण काय म्हणालं ? "

आणि लगेच माझी चूक माझ्या ध्यानांत आली ! असहायपणें मी विनायककडे वळलें आणि त्याला विचारून तें वाक्य आईला सांगितलं.

सिनेमांतून बाहेर पडल्यावर आई म्हणाली--

" कांही तरीच बाई हे सिनेमे ! "

विनायक हंसत म्हणाला—" मी आग्रह केला नव्हता तुम्हांला येण्याचा ! "

" हो...हो..." आई मिष्कीलपणानं म्हणाली, " ठाऊक आहे मला!"

आम्हांला सर्वांनाच हंसू आलं.

विनायकचं घर आलं तसं आई म्हणाली—

" उद्यां जेवायला येशील का आमच्याकडे?"

मी हर्षभरानं त्याच्याकडे पाहिलं. विनायक विचारांत असल्यासारखा दिसला. क्षणभरानं तो म्हणाला—

" मी कळवतों मग तुम्हाला."

" बरं! पण ये कीं. उद्यां रविवार तर आहे."

मी त्याच्याकडेच पहात होतें. पण आईच्या वाक्यानं एकदम भानावर आलें--

" चल गोदू—"

नाईलाजानं...नाखुषीनं...मी आईबरोबर चालूं लागलें. विनायक जिना चढून घरांत निघून गेला होता!

नंतर आई मला म्हणाली—

" गोदु, अगदी खुळ्चटासारखं करूं नकोस असं! विनायक इथं येऊन तुझ्याशीं बोलत बसला किंवा संध्याकाळचे तुम्ही थोडेसे फिरायला गेलांत तर माझी हरकत नाहीं कांहीं. पण सिनेमाफिनीमाचे बेत असे तडकाफडकीं करूं नकोस बाई! शनवार होता-चारांचा खेळ होता म्हणून मला येतां तरी आलं. नाहीं तर मी इकडे सैंपाकांत गुंतलेली आणि तुमचे मात्र सिनेमाचे बेत चाललेले! काय म्हणतें मी?"

मी खेळकरपणानं म्हटलं--" काय केलं ग आम्ही?"

आई मान हालवीत म्हणाली--" हो...हो...मला समजतं बरं सारं! ध्यानांत ठेव मी काय म्हणतें तें."

● ●

बाबांनीं नि आईनं केलेले माझ्या अभ्याससंबंधीचे प्रश्नच माझ्या मनांतून फिरत होते.

बाबांनीं सहज विचारलं होतं—"बरा चाललाय ना ग आतां अभ्यास ?"

मी बावरून उत्तर दिलं होतं—"हो. बरा चाललाय्."

आईनं मात्र जरा खडसावूनच म्हटलं होतं—

"गोदू, मी पहातें आहे हे सात आठ दिवस. तुझं लक्ष उडालं आहे अभ्यासावरचं. इतकं कांहीं हुरळून जायला नको आहे. मुहूर्तांना चांगला चार पांच महिने वेळ आहे. तंवर तुझा अभ्यास होऊन परीक्षा झाली पाहिजे...!"

आई म्हणत होती तें खरं होतं. मग मी उत्तर देण्याचा प्रयत्न करूनही काय उपयोग होता ?

ती आणखी म्हणाली होती—

"मी त्यांना या पहिल्या तारखेपासून मास्तरच ठेवायला सांगतें. म्हणजे नेमानं अभ्यास तरी होईल तुझा."

मी अचानकपणें म्हणालें होतें—

"पण विनायक सांगतो आहे कीं अडेल तें !"

मला वाटतं आई जरा हंसली असावी. पण पूर्वींच्याच स्वरांत तिचे शब्द आले होते—

"पण त्याला त्याची परीक्षा...अभ्यास...वगैरे आहे कीं नाहीं कांहीं ? उगीचच त्याच्यावर हक्क कशाला गाजवायचा ? झालं गेलं सारं म्हणजे आहेच कीं...!"

आईला काय सुचवायचं होतं याचा मला नीटसा अंदाज लागला नव्हता. पण माझ्या अभ्यासाच्या चौकशीमागं निदान आई तरी सूक्ष्मपणं माझ्या मनाचीं आंदोलनं निहाळीत होती हें उघड होतं.

 पण विनायकची आठवण होतांच बाकीचीं अभ्रं लगेच

विरलीं. या आठवणींच्या मागोमाग येणारा आनंदाचा प्रवाह मला आतां चांगला ठाऊक झाला होता. मात्र अजूनही विनायकच्या प्रत्यक्ष सहवासाला मी आतुर असूनही मला त्याच्या जवळपणाची कां भीति वाटत होती, याचा उलगडा मला होत नव्हता! किती विचित्र होता हा अनुभव!

"असं गुंगल्यासारखं रस्त्यानं चालत राहिलं तर अपघात होत असतो बरं का!"

मी माझ्या विचारांत असतांना हें वाक्य माझ्या कानीं आलं. आणि मी कमालीची दचकलें. पण मी पहातें तर विनायक माझ्याशेजारीं चालत होता! हंसत हंसत तो म्हणाला—"काय चालला होता एवढा विचार?"

त्याच्या त्या अचानक भेटीनं मी अगोदरच गोंधळलें होतें. आणि त्यानं तो प्रश्न विचारून माझ्या मनांतल्या गोंधळावरच बोट ठेवल्यासारखं केलं होतं. हंसण्याचा प्रयत्न करून, मी "कांहीं नाहीं..." असं उत्तर कसंबसं दिलं.

"मग चल आतां माझ्याबरोबर..."

आश्चर्यभरानं मी विचारलं—"कुठं?"

मला आश्चर्य कां वाटावं याचं विनायकला आश्चर्य वाटल्याचं त्याच्या मुद्रेवरून माझ्या ध्यानांत आलं. म्हणून मी घाईघाईनं म्हणालें—

"मी अजून घरींसुद्धां गेलें नाहीं. हीं पहा ना सारीं पुस्तकं आहेत कीं मजजवळ! उशीर झाला तर आई काय म्हणेल?"

विचित्रपणं माझ्याकडे पहात, उघडउघड त्रासिक स्वरांत तो म्हणाला—

"काय चमत्कारिक आहेस ग? इतकी साधी गोष्ट तुला सांगतां येत नाहीं?...कुणाचं तरी व्याख्यान होतं...किंवा 

काव्यगायन होतं...अगदीं वेळेवरच ठरलं. कांहीं तरी!... हजारों गोष्टी आहेत सांगायला!"

त्यानं चटकन् माझा बाहू धरला आणि तो म्हणाला—

"चल पाहूं..." त्याच्या त्या किंचित् हुकुमी स्वरापेक्षां रस्त्यावरचे लोक माझ्याकडे पाहून काय म्हणतील या विचारानंच मी त्याच्यापासून दूर झालें आणि मुकाट्यानं बरोबर चालूं लागलें!

विनायकाच्या खोलींत येतांच मी जवळचीं पुस्तकं कोपऱ्यांतल्या बिछान्यावर ठेवलीं. कारण त्याच्या टेबलावर नुसता बाजार भरला होता! इकडे तिकडे पहातें तों विनायक आला.

खोलींत शिरतांनाच मला कससंच वाटलं होतं. आणि आतां विनायकनं येतांना संथपणानं दार बंद केलेलं पाहून मला भीति वाटूं लागली.

विनायकच्या प्रत्यक्ष सहवासांत असतांना वाटणाऱ्या त्या भीतीचा पुन्हां प्रत्यय येतां मला आश्चर्य वाटलं. माझ्या मनाचा उडालेला गोंधळ लपविण्याकरतां मी त्याला म्हटलं—

"खालीं काय करीत होतास?"

"कुठं काय?"

"नाहीं...मला वर जाऊन बस म्हणून म्हणालास आणि तूं आतां आलास...म्हणून विचारलं...!"

"कांहीं नाहीं...खालीं कोण आहे तें पाहिलं...",

हें वाक्य बोलत असतांना त्याची दृष्टि सहज दाराकडे वळली, त्याच्याकडे असलेले माझे डोळेही त्या दिशेकडे वळले. 'दार कशाला लावलंस?' म्हणून त्याला विचारावं असं मला वाटलं. पण विनायक खोलींत उगीच येरझारा घालीत होता म्हणून मी गप बसलें.

त्याची माझी दृष्टादृष्ट झाली तसं तो जरा हंसला व मला म्हणाला—

" अग बस ना. उभी कां राहिलीस ?"

बिछान्याच्या कडेवर...पुस्तकांच्या शेजारींच मी बसलें व त्याला विचारलं—

" तूं काय असं करतो आहेस ?"

मी कांहींतरीच विचारींत होतें हें त्या चमत्कारिक मनःस्थितींतही मला कळत होतं. पण माझ्या प्रश्नाचं उत्तर न देतां विनायक टेबलाला टेकून उभा राहिला होता !

मी विनायककडे पाहिलं. त्याचीं बोटं कापरेपणानं टेबलावर कांहीं तरी चाळा करीत होतीं. दृष्टि भिरभिरत होती.

क्षणांतच तो आला व माझ्यासमोर येऊन उभा राहिला. त्याचा श्वासोच्छ्वास मला ऐकूं आला. आणि न कळत माझा श्वास जोरानं चालूं झाला. मी आपोआप म्हणालें— " काय ?"

माझी पृच्छा निरर्थक होती ! पण विनायकनं मला उत्तर न देतां अचानकपणं माझे दोन्ही बाहू पकडले व खालीं वाकून तो म्हणाला—

" मी चुंबन घेणार आहे तुझं... !"

माझ्या पाठींतून गार शिरशिरी आली व मस्तकापर्यंत जाऊन भिडली. मी कांहीं बोलायच्या आंतच विनायकनं मला उठवून आपल्या हाताचा विळखा माझ्याभोंवतीं टाकला होता...माझे डोळे मी त्याच्याकडे वळवले. इतका जवळ असतांही तो माझ्या दृष्टीस दृष्टि लावीत नव्हता. मला एकदम थरकांप सुटला. मी मान वळवली. त्याच्या ओठांचा माझ्या गालाला स्पर्श झाला.

आणि धडधडणाऱ्या माझ्या शरिरावर रोमांच उठले !

माझ्या तोंडांतून शब्द बाहेर पडले—" नको ना रे....!"

पण विनायकनं मला इतक्या जोरानं आवळून धरलं होतं कीं केवळ शारिरीक वेदनेनं माझा तोल सुटला व मी 

तें बरं का! कारण मागून ती म्हणाली कीं मला विचारल्या-शिवाय असे सिनेमाचे बेत ठरवूं नका!...आणि मी म्हटलं मग, कीं..."

मी कांहीं तरी बडबडत होतें. कसं कुणास ठाऊक... माझ्या लक्ष्यांत आलं कीं माझा स्वर अकारण चढला आहे! मला एकदम शरमल्यासारखं झालं...आणि मी थांबलें.

मी शेवटचं वाक्य काय बोललें होतें कुणास ठाऊक! विनायक म्हणाला--

"घरीं जा तूं..."

अगदीं यांत्रिक गतीनं मी पुस्तकं उचललीं....केसांवरून हात फिरवला...पदर सारखा केला...आणि निघालें.

दाराजवळ गेल्यावर मी वळून विचारलं...

"तूं येशीलना जरा वेळानं...?"

माझ्याकडे न पाहतांच तो पुटपुटला—"हंऽ..."

तो खालपर्यंत येईल असं वाटेना. म्हणून मी 'जातें हं' म्हणून निघालें.

● ●

विनायक उशीराच आला. त्यानं म्हटलं म्हणून आम्ही फिरायला निघालों. रस्त्यानं चालतांना कुणीच बोलत नव्हतं. मी विनायककडे पाहिलं. अजूनही तो भाराक्रान्त दिसत होता.

नेहमींचा सरळ रस्ता संपून नागमोडी वळण लागलं. आम्हीं त्या डाव्या कोपऱ्यावरच्या चिंचेच्या झाडाजवळ आलों तसं विनायक एकदम थांबला. अर्थात् मीहि थांबलें आणि त्याच्याकडे पाहूं लागलें...

अचानकपणें त्यानं मला जवळ ओढलं...

मी दचकून ओरडलें—"विनायक...!"

एक क्षणभर विनायक तसाच उभा राहिला. मग हात सोडून

 देत तो खालच्या आवाजांत म्हणाला—

"मला तुझ्याशीं बोलायचं आहे कांहीं..."

त्याच्या मनांत काय होतं याची कल्पना येणं मला शक्य नव्हतं. पण बाहेर अंधार वाढत असल्याचं पाहून मी म्हटलं—

"आपण घराकडे परततांना बोलूं. पुढं गेलों तर फार उशीर होईल."

विनायक अनपेक्षितपणें पुटपुटला—

"नको..."

पण तो पुढं बोलेना. जरा थांबून मी विचारलं—

"काय सांगणार होतास तूं?"

तरी विनायक स्तब्धच होता. मला वाटलं बराच वेळ तो बोलण्याचा प्रयत्न करीत असावा...

मग एकदम तो म्हणाला—

"मी पत्र लिहून सांगणार होतों तुला...पण मला सुचेचना कांहीं...मी कांहीं लेखक नाहीं..."

तो पुन्हां क्षणभर थांबला आणि आवेगानं म्हणाला—

"हें पहा गोदू, मी काय म्हणतों तें नीट समजून घे. तुझ्याशीं लग्न करतां येईल असं वाटत नाहीं मला..."

अनपेक्षित धक्के द्यायची विनायकची संवय मला अपरिचित नव्हती. पण तें वाक्य ऐकल्यावर क्षणभर मला मर्मान्तिक वेदना झाल्या...मला कळेचना...

मी माझे हात छातीवर घट्ट दाबून धरले...मला एकदम हुंदका फुटला...पण तो तसाच दाबीत रडव्या सुरांत मी म्हणालें—"कां?"

विनायक कांहीं बोलला नाहीं. मी त्याच्याकडे टक लावून पाहात होतें.

माझ्या दुःखावेगानं मला जणूं विलक्षण समज दिली! विनायकची मुद्रा आतां मला समजली...मघाचं भयंकर 

वाक्य बोलतांना झालेला त्याचा रडवा स्वर आतां माझ्या लक्षांत आला...

विनायक माझ्याकडे पाहात नव्हता...बोटाच्या नखांनीं झाडाचा बुंधा तो अकारण ओरबाडीत होता!

मी पुन्हां विचारलं—" काय झालं रे विनायक ? "

" कांहीं नाहीं..." तो पुटपुटला.

त्याच्या स्वरांत अजूनहि रडवेपणा होता. कांहीं कल्पना येऊन मी म्हटलं—

" तुझे वडील नाहीं म्हणाले ? "

' नाहीं..."

क्षणभर माझा धीर सुटून मी विचारलें—

" मग...दुसऱ्या मुलीशीं लग्न करणार आहेस तूं?..."

विनायक चमत्कारिक सुरांत म्हणाला—

" वेडयासारखं कांहीं विचारूं नकोस! मी एकदा सांगितलं तुला..."

" पण कां तें सांगशील कीं नाहीं ? "

विनायक माझ्याकडे वळला. मी पाहिलं तर त्याचा स्वरच नव्हे त्याचे डोळेहि अश्रूंनी भरले होते! तो कसाबसा म्हणाला—

" हं पहा गोदू, मला विसरूं नकोस कांहीं!...मला काय होतं तें मला कळत नाहीं......अन् तूं असं कां करतेस तेंहि कळत नाहीं?..." क्षणभर तो थांबला आणि एकदम आवेगानं म्हणाला—" मला नाहीं सांगतां येत. तुला शिव्या द्यायच्या असल्या तर खुशाल दे...."

तो मजजवळून एकदम दूर झाला...

क्षणभर...माझी स्मरणशक्ती नाहींशीं झाली असं मला वाटलं. एकच क्षण...पण नंतर...नवी जाणीव व्हावी...

 प्रकाशाचा झोत यावा...तसं झालं. कांहींतरी वाटून मी एक-

दम त्याच्याजवळ गेलें आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणालें--" विनायक—"

मी न्याहाळून पाहिलं...विनायकच्या चेहऱ्यावर भावनांची गर्दी उसळली होती...कोणत्याहि क्षणाला त्याला रडूं फुटेल असं मला वाटलं!...

दोन्ही खांद्यांना धरून मी त्याचा चेहरा माझ्याकडे वळवला. आणि हळव्या स्वरानं म्हटलं...

" विनायक, असं काय करतोस? बोल ना...मी नाहीं म्हटलं म्हणून का तुला राग आला?..."

मी त्याला पुन्हां पुन्हां विचारींत होते--

त्याला अचानक हुंदका फुटला!...आवेगानं त्यानं आपलं तोंड दोन्ही हातांनीं झाकून घेतलं...आणि झाडाच्या बुंध्याला डोकं टेकून तो एकाद्या लहान मुलासारखा ओक्साबोक्शीं रडूं लागला!....

मी चटकन् त्याच्याजवळ गेलें...त्याच्या पाठीवर हात ठेवला आणि म्हणालें—

" विनायक इकडे पहा पाहूं, मी काय म्हणतें..."

विनायकनं माझा हात दूर सारला आणि तो तशाच स्थितींत आवेगानं निघून गेला!....

मी कितीतरी वेळ त्याच्या दिसेनाशा होणाऱ्या आकृतीकडे आणि मग झाडाच्या बुंध्याकडे पहात होतें!...

माझं लक्ष सहज खालीं गेलं... चोळामोळ झालेला एक कागद खालीं पडला होता. सहजीं मी तो उचलला. आणि भारावलेल्या पावलांनीं एकटीच घराकडे वळलें.

● ●

खोलींत येऊन मी टेबलापाशीं बसलें. दिवा लावून उजेड करण्याची मला इच्छाच झाली नाहीं. कांहीं वेळ तरी कां 

होईना, माझ्या मनांत अंधार आणि गोंधळ झेपावत होता. मी सुन्नपणानें बसून होतें....

आणि मग मला एकदम आठवण झाली...तो चोळा-मोळा केलेला कागद माझ्या हातांत अजून तसाच होता. अधीरपणानं मी टेबलावरचा दिवा लावला. खूप खाडाखोड केलेल्या त्या कागदावरचीं वाक्यं माझ्या डोळ्यांपुढं चमकलीं—

"...प्रथम मला वाटलं तुझी आईच मुद्दाम असं करते. तिला काय वाटत होतं कोण जाणे! पण मी तुझ्याकडे आलों असतांना मुद्दाम खोलींत येऊन दार नीट उघडं करून जायचं नेहमीं नेहमीं काय कारण होतं?...

"...आणि सिनेमाला यायचं काय नडलं होतं तिचं? मी तुझ्या शेजारीं येऊन बसलों तेव्हां तिनं माझ्याकडे कसं पाहिलं तें माझ्या चांगलं लक्षांत आहे...

"....आणि थोड्या वेळापूर्वी तूंहि सांगितलंस..आईनं काय काय सूचना दिल्या आहेत तुला तें...

"...मला कळत नाहीं...तरुण मुलांच्याविषयीं इतका उघड अविश्वास वडील माणसांनी कां दाखवावा?... स्वतःच संशयित वातावरण त्यांनीं कां उत्पन्न करावं?...यामुळंच आमच्या मनांत नको ते विचार येतात...नको ती जाणीव होते...नको ती जागरूकता जरूर वाटते...

"पण तुझ्या बाबतींतहि मला आश्चर्य वाटतंय्...मला वाटलं लाजेमुळं हें असेल!...त्या दिवशीं तुझ्या खोलींत... तुला एकदम चकित करण्याऐवजीं मी सरळपणानं विचारलं.... माझ्याप्रमाणं तुलाही ठाऊक होतं की तुझी आई तिकडे सैंपाकघरांत होती...तरी—

 "......आणि सिनेमाच्या तिथं तूं कांहीं तरी इसल्या-

सारखा हात सोडवून घेतलास !...पण...आतांच्या अनुभवानं मी सर्द झालों आहें...तुझ्या रडण्याचा अर्थ मला तरी कळत नाहीं !...मी कवि नाहीं...अशा गोष्टींचे काव्यमय अर्थ मला लावतां येत नाहींत...त्यावेळेला कोणी आलं नसतं हें खरं... पण..मी काय तुला चावणार होतों...कां चिरडणार होतों ?...

" ...गोदू...अंग दुखत असलं आणि दाबलं म्हणजे बरं वाटतं...माझ्या शरिराचा कण न् कण...किती दिवस झाले ...दुखतो आहे...मला तें सहन होत नाहीं...तूं मला हवी-हवीशी वाटलीस तर चूक आहे कां माझी ?...

" ...आणि सांग...नुसत्या शब्दानं तरी कधीं मी ओळ-खीचा किंवा एकांताचा फायदा घेतला आहे का ?...मी प्रामा-णिकपणानं तुला लग्नाचं विचारलं ..आणि त्याला घरच्या सर्वांची संमति आहे हें कळल्यावरच...

" तुला कल्पना आहे गोदू ?...तूं गेल्यावर दार लावून मी कितीतरी वेळ रडलों !...मला आवरेचना...पण नंतर मला माझाच संताप आला...लाज वाटली!...असं कधींहि रड-ल्याचं मला आठवत नाहीं...!...मी स्वतःला असं दुबळं कां करून घेऊं ?...माझा मान मीच असा कां दुखवूं ? ..मला हें सहन करतां येणंच शक्य नाहीं...

" म्हणूनच मला आतां वाटतंय...माझी चूकच झाली. तुझ्याबद्दल मला जेवढं वाटतं...त्याच्या अल्पांशानंसुद्धां तुला माझ्याबद्दल वाटत नाहीं...तुझ्या आणि माझ्या संवेदनामध्यें दोन टोकांचा फरक आहे !...तुला माझीच भीति वाटते !...आणि जिथं ही भावना आहे...जिथं जुळणी नाहीं...तिथं लग्न म्हणजे कुणाला तरी जुलूमच व्हायचा !...

"...आपलं लग्न सुखाचं झालं नसतं...हें उघड आहे... 

बरं झालं...मुहूर्त खूप दूर होते....एक अपघात टळला...

" माझ्यावाचून तुझं कांहींच अडणार नाहीं...तात्पुरतां सुद्धां!...कारण तूंच सांगितलंस कीं तुला मास्तर ठेवणार आहेत...... "

मी किती वेळां ह्या ओळी वाचल्या असतील कुणास ठाऊक! आणि त्यामुळं माझ्या मनावरचं अकारण भीतीचं अनोळखी दडपण एकदम दूर झालं!.. सुटका झाली असं वाटलं...भीति...संशय...तर्ककुतर्क...पार नाहींसे झाले...

मला अगदीं हलकं वाटूं लागलं आणि खरं म्हणजे मला हंसूं यायला लागलं....पण...त्या ओळींतून डोकाव- णारं विनायकचं मन मला जसजसं स्पष्ट दिसूं लागलं तसं मला रडूं यायला लागलं...

मी टेबलावर डोकं टेकलं...आणि मुकाट्यानं अश्रूंना वाट करून दिली.

● ●

आई खोलींत केव्हां आली हें मला कळलं नाहीं. दिवा पाहून ती आली असावी.

डोळे पुसण्याचें निमित्त करून मी तो कागद घाईघाईनं पोलक्यांत लपवला आणि रुमाल काढला.

" काय झालं ग गोदू? " आई मला विचारीत होती.

डोळे पुसून मी उत्तर दिलं—" कांहीं नाहीं... "

" मग रडतेस ती? "

" अं...उगीचच! "

" विनायकचं न् तुझं कांहीं झालं का? "

आईच्या त्या प्रश्नानं मी जितकी चमकलें तितकं मला हंसूंहि आलं...आणि तिला पटेल असं उत्तर दिल्याखेरीज तिची सरबत्ती थांबणार नाहीं याचीहि मला खात्री वाटली!... मी हंसून म्हटलं—

" नाहीं ग! परीक्षेच्या विचारानं मला रडूं आलं...माझा नीट अभ्यास झाला नाहीं...कसं होणार याची भीति वाटते!..."

माझ्या पाठीवर हात ठेवून आई म्हणाली—

" असं होय?...मला दुसरंच वाटलं...!...मग वेडे, असं रडून अन् हातपाय गाळून अभ्यास होतो वाटतं?...हे मला सांगत होते मघाशीं कीं तुझ्या बर्वे मास्तरांनीं पहिल्या तारखेपासून यायचं कबूल केलंय्...पाहिजे तर आपण उद्यांपासून यायला सांगूं!...ऊठ आतां...जेवायचं झालं आहे..."

मी उठलें. आणि आंतल्या खोलींत कपडे बदलण्यासाठीं निघालें. जातां जातां आई थांबून म्हणाली—

" अन् हें पहा गोदू, मी सांगतें हें ध्यानांत ठेव...परीक्षा-होईपर्यंत विनायककडे जाणंयेणं बंद...त्याचं कांहीं अभ्यासाचं लक्षण दिसत नाहीं मला...पण तो आहे हुशार! उद्यां आला तर मीच त्याला सांगणार आहे कीं आतां परीक्षा होई-पर्यंत जरा कमी कर येणं..."

विनायक!...

खोलींत जाऊन कपडे बदलतांना माझ्या मनांत विचारांची गर्दी उसळली होती—

...विनायक...! तुला वाटतं तुझंच माझ्यावर प्रेम आहे... आणि माझं नाहीं? ...स्त्री किती मनोभावानं प्रेम करते याची तुला कल्पना नाहीं रे! पण मी काय करूं...मला भीति वाटते...मनानं मी कधींच तुझी झाली आहे...दुसऱ्याची मी होऊंच शकणार नाहीं!..पण आम्हांला इच्छा असली तरी...तुमच्यासारखं अधीर होऊन चालत नाहीं रे!... अविश्वास नाहीं...भीति म्हण..संस्कार म्हण...! मी स्त्री आहे, विनायक!...

'तुझं प्रेम मला दिसत होतं...पण तुझ्या यातना तुला सहन होत नाहींत हें मला कळलं नाहीं रे !... स्त्रींत आणि पुरुषांत हाच फरक असतो का ?...

पण विनायक...मी तुझी समजूत काढीन... अगदीं पांच मिनिटांत... तुझं समाधान करायला मला किती वेळ लागणार आहे ?...

मी स्त्री आहे... !

'समीक्षक'
ऑगस्ट १९४२

मराठी ... * क्र. २१५९ * ...

# तुळशीचें लग्न

समोरच्या मोठ्या फाटकाच्या दिशेनं येणाऱ्या मोटारवर मुकुंदाचे टपोरे डोळे खिळले, तसा तो वरच्या गॅलरीपाशींच थबकला. आपल्या तोकड्या तुमानीच्या ब्रेसेस गुंड्यांत नीट अडकावयाचंही त्याला भान उरलं नाहीं! जागींच पाय उंचावून कोण येतंय तें तो कठड्यावरून पाहूं लागला.

त्याच्या आईसाहेबांचं आणि त्यांच्या घरीं पुजेला येणाऱ्या नारोअप्पांचं त्यानं जें बोलणं ऐकलं होतं त्यानं त्याला इतकं आश्चर्य वाटलं होतं कीं, तें सारं विचारण्यासाठीं तो नेहमींप्रमाणं तुळशीकडे धांवतच निघाला होता. पण मोटारचा हॉर्न् ऐकल्यावर दादासाहेब आले कीं काय, अशी शंका त्याला आली. आणि म्हणून कांहीं आश्चर्यानं आणि कांहीं भीतीनं त्याचे पाय जागींच स्थिरावले.

पण ती मोटार फाटकांतून आंत न शिरतां कावा घेऊन पुढें वळली. आणि शिवाय दादासाहेबांचा लाल डगलेवाला अर्जुन शिपाईसुद्धां त्याला दिसला नाहीं.

लगेच निर्धास्तपणं मुकुंदानं ब्रेसेसचं एक टोक एका गुंडींत कसंबसं अडकावलं. आणि दादरावरून बूट वाजवीत उतरण्यापेक्षां लवकरचा रस्ता म्हणून तो कठड्यावरून घसंगळतच खालीं उतरला !

एका हातानं तुमान सावरीत पळत पळत त्यानं सारं अंगण ओलांडलं. आणि त्या मोठ्या बंगल्याच्या मागल्या बाजूला असलेल्या माळी दादाच्या झोंपडीकडे तो वळला. दारापाशीं उभं राहून त्यानं हांक घातली—

" तुळशी...ए तुळशी...! "

आंतून कांहींच उत्तर आलं नाहीं. म्हणून त्यानं पुन्हां मोठ्यानं हांक मारली, लांबून कुठून तरी आवाज आला--

" इकडे आहे रे मी...? "

मुकुंद झोंपडीला वळसा घालून मागल्या पाटाकडे निघाला. जवळ येतांच, पाटाच्या बांधावर बसून आंतल्या पाण्यानं झग्याला पडलेला मातीचा डाग धूत असलेली तुळशी त्याला दिसली. तिच्याकडे पहात, रागानं डोळे मोठे करीत मुकुंद म्हणाला,

" पुन्हां झगा घाण केलास ना ? मारूं का एक धपका ?"

त्याच्या आविर्भावानंच तुळशी घाबरून दूर सरकली. व ओल्या हातानं झग्याची कडा चोळीत केविलवाण्या सुरानं म्हणाली--

" मुद्दाम नाहीं कांहीं मी डाग पाडला, आम्हीं पडलो. मग काय करावं ? "

" त्या फुलाजवळच्या मातींत पडलीस ना ? "

" हो ... "

तिथंच पडतेस तूं नेहमीं... " तिच्यापुढं बोटं नाचवीत मुकुंद म्हणाला.

 " पण...पुन्हां पडूं नकोस आतां ! तूं लवकर लवकर झगा

खराब केलास तर देणार नाहींत आईसाहेब दुसरा झगा तुला ! ” मुकुंद बांधावर उभं राहून तिच्याकडे पहात बोलत होता. आणि त्याच्या वाक्यांना मान हलवून उत्तरें देत असतांना, एकीकडे घाईघाईनं झग्याची कडा पाण्यानं चोळण्याचं तुळशीचं काम चाललंच होतं. तिनं झग्याचं टोक झटकलं तसं तो म्हणाला—

“ आतां मी बसणार नाहीं तुझ्याजवळ जा ! सगळे कपडे घाण झालेत तुझे...माझे पहा कसे स्वच्छ स्वच्छ आहेत ! ”

“ आतां कध्धीं नाहीं करणार घाण... ”

तुळशीनं त्याला आर्जवून सांगितलं. पण त्या आश्वासनावर न विसंबतां मुकुंद तिच्यासमोरच बांधावर बसला. मात्र तेवढ्यांत तुळशीनं पाटाच्या पाण्यांत पाय सोडलेले पाहून तो जोरानं म्हणाला—

“ एऽ पाय वर घे ! आमच्या पायांत बूट आहेत...मग आम्ही कसे पाय सोडावे ? ”

तुळशीनं मुकाट्यानं पाय वर घेतले. व आपल्या हनुवटीवर एक बोट रेंखून ती मुकुंदाकडे पाहूं लागली.

बाजूची हिरवळीची एक काडी तोडून, आंतल्या पाण्यावर तिनं वर्तुळं काढीत, मुकुंद कांहींशा गंभीरपणानं म्हणाला–

“ तुळशी, तुझं लग्न आहे आज ? ”

तुळशीच्या भुंवया उंचावल्या...डोळे मोठे झाले. हाताचीं चिमुकलीं बोटं ओठांवर दाबीत ती म्हणाली—

“ नाहीं बा ! तुला कोणी सांगितलं.....? माझ्या बाबानं.....? ”

“ अंऽहंऽ ! अग ते नारोअण्पा येतात ना आमच्याकडे ? त्यांच्याशी आईसाहेब बोलत होत्या आत्तां ! ”

“ काय . माझं लगीन आहे....? ”

“ माझं नाहीं.. ! तुळशीचं लग्न आहे आज म्हणून...!” 

तुळशीनं गुडघ्यांची अढी केली व उजव्या हाताच्या पंजावर हनुवटी टेकीत ती विचारी डोळे करून मुकुंदाकडे पाहूं लागली! लगेच तिच्या डोक्यांत कांहीं कल्पना आली. त्यासरशीं एकदम टाळ्या वाजवीत ती म्हणाली—

"हो रे हो! आज तुळशीचं लगीन आहे ... !"

"खरं...? मग नवरा कोणता तुझा?"

"अरे माझं नाहीं...तुळशीचं लगीन! ती आपली तुळस नसते का...तिचं! माझ्या बाबानं सकाळीं सांगितलंय् मला. पण मी विसरूनच गेलें. आमच्या घरींसुद्धां आम्ही लगीन लावणार आहों... "

मुकुंदाला एकदम समज पडल्यासारखी झाली. आणि त्यासरशीं खूप मोठ्यानं हंसून तो म्हणाला—

"हात्तिच्या! त्या तुळशीचं...होय? मला वाटलं तुझं लग्न......!"

मुकुंदाच्या हंसण्यांत तीहि सामील होऊन हंसूं लागली.

मुकुंद उत्साहानं सांगूं लागला—

"अग...आम्ही एकदां कलकत्त्याला होतों ना...तेव्हां आम्हीं तुळशीचं लग्न केलं होतं. तेव्हां एक भटजी आले होते...त्यांनीं एक शाल धरली होती अशी...आणि ते कसं म्हणत होते...साऽवधाऽन-...! मग लग्न लागलं...आम्ही टाळ्या वाजवल्या...आणि मग खूप फटाकडे उडवले...! कनी एक मोठा फटाकडा उडाला तर आमची सुमाताई आहेना ती घाबरून अश्शी पळाली!"

मुकुंद हंसतां हंसतां एकदम थांबला. त्याच्या डोक्यांत एक कल्पना आली. तो तुळशीच्या जवळ येऊन बसला व एकादी गुप्त गोष्ट सांगतात तशा हलक्या आवाजांत म्हणाला—

 "एऽ...आपणसुद्धां लग्न लावूं तुळशीचं अं?"

त्या कल्पनेनं तुळशी एकदम आनंदली. पण लगेच तिच्या मनांत एक विचार आला. आणि ती म्हणाली—

" पण आपण कसं लगीन लावणार ? "

" लावूं तर काय झालं ! मला ठाऊक आहे कसं लावा-यचं तें...सांगूं का ? अशी तुळस ठेवायची या बाजूला... न् इथं लंगडा बाळकृष्ण ठेवायचा...मधें शाल धरायची अशी...आणि साऽवधान असं म्हणायचं !...झांऽलं ! "

त्याला मधेंच थांबवून तुळशी म्हणाली—

" पण आपल्याजवळ सगळं सामान कुठं आहे...? ऊंस नाहीं...न्..."

" आपण आणूं सारं."

मुकुंदानं तुमानीच्या खिशांतला रुमाल काढला व तो तिला दाखवीत म्हणाला—

" हें पहा हा माझा रुमाल आहे ना...? ही कशी कांहीं शाल...अं ? अन् गवताचा ऊंस करूं ! आणखी काय पाहिजे...? "

" तुळस—"

" तुळस तूं आण..."

" पण ती तर माझ्या बाबाची तुळस आहे ! "

" अग चल...तुझ्या बाबाची तुळस आलीय् ! आम-चीच आहे...! "

" वा रे वा ! माझ्या बाबाची आहे ती तुळस ! "

तिच्या हटवादीपणाचा मुकुंदाला एकदम राग आला. तिच्या पाठींत एक धपाटा देत तो म्हणाला—

" नाहीं...नाहीं ! ही सगळी बाग तर आमची आहे. मग कुठली आली ग तुझ्या बाबाची तुळस ? "

तुळशीनं रडायला सुरवात केली.

त्याच्यापासून दूर सरकून ती फुरगटून म्हणाली—

" आम्हीं तुझ्यांत खेळणारच नाहीं जा आतां. वाईट आहेस तूं...! "

" बऽरं...आतां नाहीं...आपल्याला लग्न करायचं ना ? "

" मग मारलंस कां आम्हांला ? नेहमीं नेहमीं मारतोस तूं .! "

" आतां नाहीं मारणार...! " मुकुंदानं जवळ सरकून तिच्या पाठीवर हात ठेवला व तिचं तोंड वर उचलीत तो म्हणाला—

" आणशील ना तुळस ? मी आमच्या देवघरांतला बाळकृष्ण आणतों. अन् मग आपण खूप मजा करूं... मी फटाकडे देईन तुला ! "

तुळशी खुदकन् हंसली !

" मग जा...आण तुळस ! मी आत्तां पळत पळत जाऊन बाळकृष्ण आणतों... "

" आत्तां करायचं लगीन...? " तोंडावर आलेल्या बटा कानामागं करीत तुळशीनं विचारलं.

" हो...हो ! सर्वांच्या आधीं करूं आपण. म्हणजे खूप मजा येईल...अं ? "

मुकुंद धांवतच सुटला. तसं तुळशीही उठून झोंपडीकडे निघाली.

व्हरांड्याच्या पायऱ्या चढत असतांना तिथें उभा असलेला माळीदादा मुकुंदाला दिसला. मुकुंदाला पाहून तो म्हणाला—

" छोटं सरकार...! हीं फुलं द्या आईसायबांस्नी... "

मुकुंदानं घाईतच त्याच्याजवळचीं फुलं घेतलीं. जोरांत जिना चढत असतांना त्याच्या मनांत कांहीं तरी विचार  येऊन त्यानं त्यांतलीं एक दोन फुलं तुमानीच्या खिशांत

कोंबलीं, व तो आंतल्या देवघराच्या दाराजवळ देऊन थबकला.

मात्र परत येत असतांना मुकुंदाचे दोन्ही हात तुमानीच्या खिशांत होते. चेहरा विचारी होता आणि पावलं जरा हळू पडत होतीं.

झोंपडीच्या समोर कांहीं अंतरावर तुळशी उभी होती. तिनं आपला झगा झोळीसारखा करून दोन्ही हातांनीं पोटाशीं धरून ठेवला होता. मुकुंदाला येतांना पाहून, घट्ट दाबून धरलेले ओंठ मोकळे सोडून ती त्याच्याजवळ येत म्हणाली—

"आणलंस रे सारं?"

मुकुंदानं तिच्याकडे पाहून मान हालविली. व तो म्हणाला—

"तूं आणलीस तुळस...?"

तुळशीनं एकवार आपल्या उचलून धरलेल्या झग्याकडे दृष्टि टाकली व ती पुटपुटली—

"ही पहा..."

"पाहूं दाखव मला..."

"अऽहंऽ...अगोदर दाखवायची नसते...लगीन लागल्यावर मग...!!"

"मग मीहि बाळकृष्ण दाखवणार नाहीं तुला अगोदर..."

"नकोच दाखवूं! हां, पण आपण जरा लांब जाऊं. अं...लावायला?"

"कां?"

"माझा बाबा बसलाय ना घरांत येऊन ..चिलीम पीत?"

"मग तो काय करतोय...? हीं पहा फुलं घेतलीं मी त्याच्याजवळून..."

"पण आपण तिकडे जाऊं ना..."

१५४२८
८।२५५४

" बऽरं...चल! "

दोघेही झोंपडीच्या मागून बांधावरून पुढं निघाले. बागेच्या दुसऱ्या टोकाला एक मोठं चिंचेचं झाड होतं. त्याच्याजवळ येऊन मुक्काम ठोकतांच मुकुंदाला एक कल्पना सुचली. तो तिला म्हणाला—

" तुळशे...तूं बस झाडाच्या मागं. मी बसेन इथं... "

" कां ? "

" अग, नवरा बायको अगोदर दाखवावयाचे नाहींत ना ?...मग ? "

" हो रे हो ! "

" तुझी तुळस तूं झाडाच्या मागं ठेव. माझा बाळकृष्ण मी इथं ठेवीन. मग आपली शाल धरून मी म्हणेन–साऽवधान ! मग हीं फुलं अशीं टाकायचीं न् टाळ्या वाजवायच्या...अं ?"

सारी सिद्धता केल्यावर मुकुंदानं खिशांतला रुमाल बाहेर काढला व झाडाच्या मागं बसलेल्या तुळशीला तो म्हणाला–

" हं...बाहेर ये आतां शाल धरायला ! पाह्यचं नाहीं अं मात्र खालीं .." तुळशीनं मान हलवून संमति दिली व त्याच्याकडेच पहात रुमालाचा एक कोपरा धरला.

मुकुंदानं लगेच एक हात कमरेवर ठेवला व वर पहात तो म्हणूं लागला––

" साऽवधाऽन... "

त्याचं तें अवसान पाहून तुळशीला एकदम हंसण्याची उकळी फुटली ! मुकुंद एकदम थांबला. रागानं तिच्यावर डोळे वटारीत तो म्हणाला––

" हंसायला काय झालं ? आपलं लग्न मोडतं ना ? "

" मग तूं असं काय म्हणतोस ? " तुळशीनं एक हात कमरेवर ठेवला व वर पहात त्याच्याप्रमाणं सूर काढीत ती म्हणाली––" साऽ व धाऽ न ! "

आणि ती पुन्हां हंसायला लागली.

मुकुंद किंचित् वरमल्यासारखा झाला. व जणूं स्वतःचं समर्थन करण्याच्या उद्देशानं म्हणाला—

" हो...असंच म्हणतात, मला ठाऊक आहे ! आतां हंसलीस मध्यें तर मारीन पाठींत एक...!"

तुळशीनं भिरभिरत्या नजरेनं ' आतां नाहीं ' म्हणून म्हटलं. मुकुंद वर पहात पुन्हां म्हणूं लागला. तुळशीनं त्याच्याकडे चोरून पाहिलं व आपण हंसलों तर हा खरंच मारील ही कल्पना येतांच तिनं आपले ओंठ घट्ट दाबून धरले व मान दुसरीकडे वळवली.

मुकुंदाला ' सावधान 'च्या पुढं कांहीं सुचेना ! मधेंच थांबून त्यानं विचारलं—" आणखी काय म्हणायचं ग ? "

तिरप्या नजरेनं त्याच्याकडे पहात तुळशी म्हणाली—

" तुला तर येतं ना सारं ? मग मला कशाला विचारतोस ? " मुकुंदानं तिच्याकडे एक दृष्टिपात केला. सारं अंग घुसळून त्यानं मानेला एक झटका दिला. व पुन्हां वर पहात, तोच शब्द निरनिराळ्या सुरांत म्हणायला सुरवात केली !

" अजून नाहीं झालं रे ? "

मुकुंद कंटाळल्यासारखा झाला होता. तुळशीच्या प्रश्नाचा फायदा घेऊन त्यानं रुमालाचं टोंक सोडून दिलं व तो म्हणाला—

" हो...वाजव टाळ्या आतां... लागलं लग्न ! "

टाळ्या वाजवतांनाच त्याच्याकडे पहात तुळशीनं विचारलं--

" आतां काय करायचं ? "

" आतां तुळस दाखव तुझी..."

तुळशी किंचित् दचकली. पण लगेच मान वेळावीत ती म्हणाली—

“ अंऽ हंऽ. अगोदर बाळकृष्ण दाखव तुझा.”

“ नाहीं...अगोदर तुळस दाखवायची!”

“ नाहीं...अगोदर—”

मुकुंदानं एकदम तिची मानगूट पकडली. व तोंडानं पुटपुटत तिला त्यानें दम भरला.

तुळशी रडूं लागली.

“ एऽ रडूं नकोस अं! मी मारलं नाहीं अजून तुला...! दाखव तुझी तुळस...”

पण तुळशीला अधिकच रडूं येऊं लागलं! मुकुंदानं दोन्ही हातांनीं तिचं तोंड वर उचललं व तो म्हणाला—

“ काय झालं ग रडायला?”

“ तूं मारणार नाहींस तर सांगीन...” हुंदके देतच तुळशी म्हणाली.

“ नाहीं मरणार...सांग पाहूं!”

तुळशीनं एकदम झग्याच्या टोकाला डोळे पुसले व ती सांगू लागली—

“ कनी माझा बाबा बसला आंत येऊन चिलीम पीत—”

“ मग!”

“ त्याच्या देखत मी तुळस तोडायला लागलें तर तो म्हणाला, आज तुळस तोडूं नये...!”

“ कां बरं?”

“ आज लगीन नाहीं कां तुळशीचं?”

“ हो...मग?”

“ म्हणून मग मी तुळस आणलीच नाहीं!”

तुळशी त्याला खेटून बसली होती...ती, तो मारील कीं काय या भीतीनं दूर सरकून त्याच्याकडे भेदरल्या

 नजरेनं पाहूं लागली. पण मुकुंद स्वतःच्या विचारांत होता.

ती दूर सरकून बसल्याचं त्याला समजलं नाहीं. समोर कुठंतरी पहात तो म्हणाला—

" अन् मीसुद्धां बाळकृष्ण आणला नाहीं ! "

तुळशी एकदम त्याच्यासमोर आली...व त्याच्या खांद्याला स्पर्श करीत तिनं मोठ्यानं विचारलं—

" तूंसुद्धां आणला नाहींस बाळकृष्ण ? "

" मग ?...तिथं आईसाहेब बसून राहिल्या होत्या. उठल्याच नाहींत त्या. मग आम्हीं काय करावं ? "

स्वतःशीच चिडल्याप्रमाणं मुकुंद बोलला व तिच्यावरची दृष्टि टाळून दुसरीकडे पाहूं लागला.

पण तुळशीला अचानक कांहींतरी आठवलं. त्यासरशी तिच्या चेहऱ्याचा नूर एकदम पालटला. तिचे डोळे मोठे झाले. जिवणी आक्रसली. मुकुंदाला हनुवटीला धरून त्याचं तोंड आपल्याकडे वळवीत, ती उघड उघड भेदरलेल्या स्वरानं म्हणाली—

" मुकुंदा..."

" काय ? "

" आतां कसं करायचं रे ? "

मुकुंदाला तिच्या अविर्भावाचा कांहींच बोध झाला नाहीं. पण त्या अकारण भीतीचा स्पर्श होऊन तोही म्हणाला—

" काय झालं ग ? "

" अरे आपलं लगीन लागलं ना ! "

" चल...आपलं कसं लागेल ? "

" अरे हो ! मी तुळस आणली नाहीं...तूं बाळकृष्ण आणला नाहीं...न् आपण लगीन तर लावलं ! "

" म्हणून काय झालं...? कोणी सांगितलं तुला ? "

" माझ्या बाबानं ! मी माझ्या बाबाला विचारलं होतं कीं खरं खरं असतं का हें लगीन ? तर तो म्हणाला हो...अन् 

मी विचारलं कीं माणसं अशीं उभीं राहिलीं तर त्यांचंसुद्धां असं लगीन लागतं...तरी तो म्हणाला हो...!"

मुकुंदानं एकदम आश्चर्यचकित होऊन म्हटलं—

"म्हणजे...मी नवरा न् तूं बायको?"

"हो नं! आतां कसं करायचं रे?"

मुकुंदानं पायाची अढी केली. व दोन्ही पंजांवर गाल दाबून धरीत तो कमालीच्या गंभीरपणानं तुळशीकडे पाहूं लागला! त्याचं पाहून तुळशीही त्याच्यासारखी बसली व तितक्याच गंभीरपणानं त्याच्याकडे पाहूं लागली.

"मी आईसाहेबांना सांगूं का?" मुकुंदानं विचारलं.

तुळशीनं लगबगीनं त्याच्या तोंडावर हात ठेवला. व ती किंचित् रडव्या सुरांत म्हणाली—

"नको सांगूं रे कोणाला! तूं माझ्यांत खेळलास कीं मग सारे रागावतात तुला...अन् मग माझा बाबा म्हणतो कीं छोट्या सरकारशीं आपण खेळायला जाऊं नये...!"

मुकुंदानं तिच्या रडव्या डोळ्यांकडे पाहिलं. व तो अभावितपणं तिच्याजवळ सरकला. तिच्या वेणीशीं चाळवाचाळव करीत तो म्हणाला—

"बरं...नाहीं सांगणार...रडूं नकोस तूं! पण आतां कसं करायचं ग?"

कुणालाच कांहीं सुचेना.

म्हणून दोघेही पुन्हां एकमेकांकडे भिरभिरत्या डोळ्यांनीं पाहूं लागले!

न सुटणारा प्रश्न......

'समीक्षक'
फेब्रुवारी १९४२

## ते मुंबईला येतात

संध्याकाळीं साताच्या सुमाराला मिस्टर मंगलम् जेव्हां हपीसांतून बाहेर पडला, तेव्हां तो चिंतेनं भारावून गेल्यासारखा दिसत होता.

हपीसांत हल्लीं रात्रीलाहि काम पडत असे, आणि मॅनेजरचा खास कारकून म्हणून, मंगलमूला बाकीचे लोक निघून गेल्यानंतर कधीं कधीं खूप वेळ थांबून रहावें लागे, या गोष्टी खऱ्या; पण त्याला ह्याची चिंता नव्हती. सव्वीस वर्षं वयाचा, अविवाहित, चतुर आणि कामसू असा मंगलमूसारखा तरुण कामानं डगमगला नसता. किंबहुना, असं निष्ठेनं खूप काम करूनच त्यानं सध्याचं, इतरांना हेवा वाटावं असं, स्थान मिळविलं होतं. कामाचा चुकारपणा केला तर आपली जागा पटकावयाला शेंकडों लोक गोंडा घोळीत पुढं येतील हें तो समजून होता; पण त्याहीपेक्षां सध्याचे दिवस किती बिकट आले आहेत याची स्पष्ट जाणीव त्याला होती. मालकाचं उखळ अधिकाधिक पांढरं होत होतं, त्यामुळं जरी नव्हे तरी,

धंद्यांतलीं अनुभवीं माणसं या दिवसांत हातून गमावणं हा शुद्ध वेडेपणा होता म्हणून कां होईना, मालकानं सरांस सर्वांना महागाई भत्ता दिला होता. आणि तरीहि जीवन किती मुष्कील झालं होतं, याचा अनुभव तो रोजच घेत होता. जग युद्धाच्या खाईंत असतांना रात्रबेरात्र काम करावं लागतं म्हणून हळहळणारा मंगलम् खचित नव्हता.

कांहीं दिवसांपूर्वीं केरळ प्रांतांतल्या त्याच्या गांवाहून पत्र आलं होतं. तें त्याच्या ओळखीच्या दूरच्या नात्यांतल्या एकानं लिहिलं होतं. त्यांत भयंकर परिस्थिति वर्णिली होती. बाजारांत कुठं धान्याचा दाणा दिसत नव्हता; धान्य असलं तर कदाचित् तें काळ्या बाजारांत गुप्त झालं होतं; लोक धडपडत होते, रडत होते, ओरडत होते, पण त्याचा कांहीं उपयोग होत नव्हता; गरीब आणि दलित यांची दैना उडाली होती, कोंडयाचा मांडा करण्याचीहि त्यांची आशा उडाली होती; आणि शेवटीं त्यांनीं रस्त्यावरचं गवत उपटून पोटांत भरायला सुरवात केली होती. गवत !... विश्वास बसणार नाहीं, पण,अशी ही प्रत्यक्ष परिस्थिती असल्याचं मिस्टर सुब्बा यांनीं मंगलम्ला लिहिलं होतं, आणि आपण सहकुटुंब-सहपरिवार मुंबईला यावं कीं काय, अशी दीन पृच्छा केली होती ! त्यांनीं आपल्या पत्रांत पुढं लिहिलं होतं–" माझ्या-सारख्या मोठ्या माणसानं तुझ्यासारख्या एका मुलावर आपला भार टाकावा ही अगदीं शरमेची गोष्ट आहे; पण करणार काय ? तरीसुद्धां मी तुझ्यावर संकट घालणार नाहीं. मुंबईंत चटकन् काम मिळेल. कदाचित् तूंसुद्धां कांहीं शोधून देशील. तूं आपल्या धन्याचा फार लाडका आहेस असं ऐकतों. तसं असलं तर प्रश्नच मिटला. मुख्य अडचण जी येईल ती

 राहण्याची. कुठं कांहीं जमेपर्यंत तुझ्या घरांत आमची सोय

नाहीं कां होणार? शक्य तितक्या लवकर आम्ही तिथून हलूं असं मी वचन देतों ..."

मंगलम् या पत्राचा सारखा विचार करीत होता. त्याला अतिशय वाईट वाटलं. अशा परिस्थितींत आपल्या घराचा आसरा नाकारायचा कसा? पण माटुंग्याला त्याचा दोन खोल्यांचा एक लहानसाच ब्लॉक होता. तोहि ताब्यांत ठेवतांना त्याला मालकाशी भांडावं लागलं होतं. तें असो, पण ब्लॉकमधली एक खोली सैंपाकघर म्हणून गेल्यानंतर उरलेल्या एकुलत्या एका खोलींत सर्वांचा समावेश होणार तरी कसा?—आणि सुब्बा कुटुंबांत सहा तरी माणसं आहेत असं मंगलमूला आठवतं होतं. या प्रश्नानं त्याला हैराण केलं होतं. पण त्या पत्रांतल्या 'गवत' या शब्दानं मंगलम्चा निश्चय झाला. माणसं गवत खाण्याच्या अवस्थेपर्यंत आलीं असतांना आपण पशूसारखं वागून डोळयावर कातडं ओढायचं? मंगलम्नं एका क्षणांत लिहून टाकलं, " सामान बांधा आणि सारे निघून या. पुढचं पुढं. "

आणि ती मंडळी आज मुंबईला येऊन पोहोंचायची होती !

मग मंगलमूला वाटायला लागलं कीं, सुब्बांना इकडे या म्हणून सांगण्यांत आपण चूक तर नाहीं केली? एका लहानशा खोलींत आणि तिच्या लगतच्या, पावसाळयांत निरुपयोगी असणाऱ्या, गॅलरीच्या चिंधींत सुब्बा कुटुंब थाटल्यानंतर आपण काय करायचं?

गेले दोन दिवस झाले हा प्रश्न त्याच्या डोक्यांतून जात नव्हता. आपण भावनेच्या आहारीं जाऊन अव्यवहारीपणाचा कळस केला असं त्याला सारखं वाटूं लागलं. सहानुभूति, माणुसकी या थोर गोष्टी आहेत; पण स्वतःच्याच घरांत नकोशा पाहुण्या-सारखी अवस्था आपणच ओढून घ्यायची? मालकानं खुबींत

वाढवलेलं भाडं आतां विभागून घेतां येईल, या विचारानं समाधान वाटण्याजोगा हा प्रसंग नव्हता. आपल्याच खोलींत लवकरच माजणाऱ्या पसाऱ्यांत वाट काढीत, अंग चोरीत, आपल्याला कसं वावरावं लागेल याचं चित्र मंगलमूच्या डोळ्यांपुढं उभं राहिलं. प्रायव्हसीचं तर नांवच काढायला नको! पण सर्व व्यापून दहा अंगुलं उरलेल्या जागेंत आपण आपलं हपीसचं काम तरी कसं करायचं? मंगलमूच्या अंगावर कांटा उभा राहिला. त्याच्या मनांत विचारहि येउन गेला, "कांहींतरी घडलं आणि सुब्बा लोक मुंबईला पोंहोचूंच शकले नाहींत तर...!"

पण ते आज मुंबईला येत होते! भेटीचा प्रसंग जितका दूर ढकलेल तेवढा बरा अशा विचारानं हपीसांतून स्टेशनाकडे सरळ न जातां मंगलमूनं 'मद्रासी कॉफी हाऊस'कडे आपला मोर्चा वळवला. एक भांडंभर गरम कॉफी प्यायल्यानं कांहीं तरी होईल असं त्याला वाटलं.

पण माणूस हॉटेलमध्यें किती वेळ बसेल किंवा रस्त्यावर उगीचच किती वेळ भटकेल? घरीं कोणी वाट पाहणारं नसलं तरी केव्हां तरी घरीं हें जायलाच पाहिजे ना!

खरं म्हणजे, मनांतून कितीहि धवशा वाटत असला तरी सकाळीं हपीसांत येण्यापूर्वी मंगलमूनं आपल्या घराची चावी शेजारीं देऊन ठेवली होती! आपल्याला यायला उशीर लागला आणि, न जाणों, तेवढ्यांत 'ते' येऊन ठेपले तर...?

● ●

मनाचा हिय्या करून मंगलम् घरीं आला. आणि त्याच्या अपेक्षेप्रमाणं अगदीं उल्हसित मुखानं सुब्बांनीं हंसून त्याचं स्वागत केलं.

इतकंच नव्हे तर, त्यांनीं तोंड भरून बोलायला सुरुवात केली—"ठीक...ठीक..! प्रवास?...प्रवास कसा झाला

तें मुळींसुद्धां विचारूं नकोस! हजार वेळां जागींच मरून जावं असं वाटलं! पण एकदांचे मुंबईला येऊन पोंचलों हें भाग्य म्हणायचं. बेटा मंगलम्, तुझे मात्र उपकार कधीं फिटायचे नाहींत. तुझ्या आईवडिलांना मी भेटून आलों ना! आणि त्यांना सांगितलं कीं, मंगलम्सारखा मुलगा दुनियेंत आढळायचा नाहीं..."

मंगलम्नं कांहीं तरी पुटपुटत स्वैंपाकघराकडे चोरटी नजर टाकिली. सौ. सुब्बा भाताचं भांडं उकडण्यांत अगोदरच गढून गेल्या आहेत असं त्याला दिसून आलं. त्याच्या नजरेची दिशा न्याहाळीत सुब्बा एकदम हंसून म्हणाले—

"पाहा, सारी तयारी होत आली आहे! तूं आतां यांतच जेव. अरे, तूं न् आम्ही का वेगळे आहोंत? अं?... हो, तांदूळ सांपडले, पण जरा घरांत मिरच्या असत्या तर..."

आणि अशा रीतीनं सुब्बा कुटुंब मुंबईत स्थायिक झालं. या कुटुंबाच्या विस्ताराचा मंगलम्नं केलेला अंदाज फारसा चुकीचा नव्हता. प्रथम दोन मोठाले मुलगे, नंतर दोन मुली, त्यांच्या पाठीवर एक मुलगा, आणि सर्वांत लहान एक तान्ही मुलगी. सुब्बांनीं त्याला समजून सांगितलं कीं, मोठा मुलगा मॅट्रिकच्या वर्गांत आणि पाठचा इंग्रजी पांचवींत होता. ते पुढं म्हणाले—"मी ऐकलं कीं इथं राशन-ऑफिसांत कोणालाही नोकरी देतात, आणि अर्जांत लिहिलेल्या क्वालिफिकेशनचा कांहीं पुरावा मागतहि नाहींत म्हणे! दे चिटकवून झालं या दोघांनाहि. काय?"

मंगलम् न बोलतां गोंधळून त्यांच्याकडे पाहूं लागला. हा प्रश्न आहे का उत्तर आहे हें त्याला कळेना. सुब्बा लगेच म्हणाले—"अस पहा बेटा! मी या साऱ्यांना नोकऱ्या करायला लावणार आहे. या मुलींनासुद्धां! करायचं काय? हे युद्धाचे दिवस आहेत. युद्ध संपलं कीं जातील पुन्हां 

आपापल्या शाळांत परत. तोंपर्यंत संसाराला कांहीं मदत तर खरी. काय ?"

मंगलम्‌नं हसण्याचा प्रयत्न केला. दुसरं काय करणार? वस्तुस्थिती अशी होती कीं, मंगलम् मोठा नीटनेटका आणि टापटिपीचा मुलगा होता. आणि जेव्हां त्यानं आपली खोली ट्रंका, बिछाने, कपडे, पादत्राणं आणि इतर हजारों वस्तू यांनीं फुललेली पाहिली तेव्हां त्याच्या हृदयाचे ठोके जोरानं पडूं लागले. सुब्बानीं मंगलम्‌च्या मुखावरून त्याचे विचार चट्‌दिशी ओळखले. तोंडभर हंसून ते म्हणाले–"तुला संसार म्हणजे काय तें ठाऊक नाहीं, बेटा! घरांत पोरं बागडायला लागलीं म्हणजे शिस्त आणि व्यवस्था याचं नांव कशाला काढतोस! अरे, मी काय कमी व्यवस्थेशीर होतों! पण बाबा, हें चालायचंच. आणि तुलाहि कळेल अनुभवान्ती लौकरच! काय ?"

सुब्बा पुन्हां हंसले. आणि त्या गर्जनेच्या भरांत घरांतल्या दाटीवाटीसंबंधीं बोलायचं राहूनच गेलं. मंगलम् इतका भिडस्त होता कीं त्याच्या तोंडून शब्दहि फुटला नाहीं.

तेव्हां सुब्बा कुटुंब स्थायिक झालं, लौकरच सांपडल्या त्या नोकऱ्या धरल्या गेल्या, रेशनकार्ड काढलीं गेलीं, आणि मंगलम्‌च्या घरांत जीवनाची प्रचंड गजबज सुरू झाली. सुब्बा घरच्यासारखे स्थिरावले. एकदां मंगलम्‌चे खांदे धरून ते हंसत हंसत म्हणाले,–'बेटा मंगलम्, तूं असा लाजल्यासारखा आणि बावरल्यासारखा नको करूंस बुवा! अगदीं निःसंकोच पणानं तूं आमच्यांत रहा. आपलं नातंच आहे. आणि मी तर तुला माझ्या मुलासारखाच समजतों. काय ?"

परंतु, सुब्बांच्या तोंडभर पसरलेल्या हास्यानें आणि लाघवी आश्वासनांनींहि मंगलम्‌ची अस्वस्थता नाहींशी झाली नाहीं. उलट, संध्याकाळीं हपीस सुटलं

आणि घरीं यायची वेळ झाली कीं, त्याच्या उरांत धडकी भरे. आपण घाबरट आहोंत? आपल्यांत धैर्य नाहीं? मंगलमूला स्वतःशीं अशी कबुली देववेना. तो मनाशीं चिडला आणि मालकाच्या धंद्यासारखी त्याची चीड ही रोज वाढतच चालली. सौ. सुब्बा व त्यांच्या मुली यांनीं सैंपाकघराचा कायमचा कबजा घेतल्यापासून मंगलमूला आपल्या सर्व हालचाली उरलेल्या एका खोलींतच मर्यादित कराव्या लागल्या हें उघडच होतें. परंतु तिथंहि वावरतांना आपले पाय कपड्यांवर, पांघरुणावर, आणि वाटेंत लोळत असलेल्या इतर शेंकडों वस्तूंवर पडत नाहींत याची मंगलमूला डोळ्यांत तेल घालून काळजी घ्यावी लागत होती. निर्जीव वस्तूंचं एक असो, पण हटकून पायांत घुटमळत येणाऱ्या मुलाचं काय करायचं? एकदां तर, मंगलमूनं मोठ्या कौशल्यानं आपला तोल सांभाळला नसता तर त्याचा पाय तान्ह्या मुलीवरच पडत होता! अशा गोष्टींनीं चीड येणार नाहीं काय? परंतु याहिपेक्षां संतापजनक गोष्ट अशी ़़ी कीं अत्यंत टापटीपीनं ठेवलेल्या स्वतःच्या वस्तूहि मंगलमूला आतां सापडेनाशा झाल्या होत्या. घरांत सामावलेल्या महासमुद्रांत त्याचा टूथब्रश, दाढीचं सामान, कपडे, जोडे इत्यादि वस्तू गडप झाल्या होत्या. एखाद्या दिवशीं कांहीं वस्तु पृष्ठभागावर तरंगतांना दिसून येत, पण एक नवी लाट आली कीं त्या पुन्हां दिसेनाशा होत! प्रौढ भाषेंत सांगायचं म्हणजे, मंगलमूच्या सुप्त मनावर या अनुभवांचा इतका सखोल परिणाम झाला होता कीं, एक दिवस हपीसांतून घरीं आल्यावर त्याला जेव्हां पुढील दृश्य दिसलं, तेव्हां तें त्याच्या जागृत मनापर्यंतहि नीट पोंचलें नाहीं. पोरांनीं घरांतलीं सर्व पादत्राणं गोळा केलीं होतीं. आणि बाहेरच्या जिन्यापासून तों स्वैंपाकघरांतल्या चुलीपर्यंत त्यांची नागमोडी रांग करून त्यांचा आगगाडीचा

खेळ चालू होता. आणि वर आगगाडीची काय बिशाद लागली, एवढा प्रचंड कल्लोळ त्यांनीं अत्यानंदानं मांडला होता !......

मंगलम् न बोलतां आंत आला आणि खोलीच्या मध्यभागीं येऊन स्थिरावलेल्या वळकटीवर तसाच खिन्न मनानं बसला. तो अतिशय उद्विग्न झाला होता. कांहीं पोरांनीं त्याचे हात व पाय ओढून त्याला आगगाडींत बसायचा आग्रह चालवला होता त्याच्याकडे त्याचं लक्षहि नव्हतं, इतका तो आपल्या विचारांत गढून गेला होता. थोड्या वेळानं त्याचा चेहरा उजळला. तो खूप वेळ विचार करीत होता. शेवटीं त्याच्या मनाचा निश्चय झाला. सुब्बांना येऊन दोनचार महिने केव्हांच झाले होते. आतांपर्यंत त्यानं खूप चांगुलपणा दाखविला होता. निःसंकोच मनानं त्यांचं उदार आतिथ्य केलं होतं. सर्व गोष्टींना कांहीं सीमा आहेच कीं ! श्रीयुत सुब्बा आपल्या वडिलांबरोबरचे, दूरचे नातेवाईक, हें खरं, पण हा महिनाअखेर जागा खालीं करायला त्यांना नम्रतेनं सांगायचं, असं त्यानं ठरवलं. आतां-पर्यंत त्यांनीं कुठं तरी जागा शोधून काढायला हवी होती. काढली नसली तर अजूनहि वेळ आहे. एकंदरींत...

● ●

सुब्बांशीं कुठल्या शब्दांत बोलायचं याची आपल्या मनाशीं मंगलमूनं पुनः पुनः उजळणी केली. त्याचा नाईलाज होता. त्याचं कांहीं चुकलं नव्हतं, किंवा सुब्बांना चमत्कारिक वाटावं असं त्याच्या सांगण्यांत कांहीं नव्हतं ! या निश्चित् विचारांनीं त्याचा खिन्नपणा कमी झाला. तो अर्धवट स्वतःशींच हंसला.

त्याच क्षणीं सुब्बा आंत आले. नेहमींप्रमाणंच त्यांच्या तोंडावर हास्य पसरलं होतं. मंगलमूनं मान वर करून

 पाहिलं. सुब्बा एकटे नव्हते. त्यांच्या मागोमाग दोन गृहस्थ

आणि दोन स्त्रिया होत्या. त्यांपैकीं एकीच्या कडेवर एक छोटं मूलहि होतं.

घरांत कोणी भेटायला आले आहेत या जाणिवेनं मंगलम् आपल्या आसनावरून घाईघाईनं उठला, कांहींतरी पुटपुटला, आणि पोरांना खेळ थांबवून सैंपाकघरांत पळण्याविषयीं त्यानं हुकूम सोडला.

सुब्बा एकदम गरजले--"बेटा, एवढा उपचार कशाला हवाय्? आपल्या गांवाकडचेच हे आहेत. तुला आठवत नाहीं?...काय?"

गोंधळून गेल्यामुळं मंगलम्‌ला आठवेना. सुब्बांनीं लगेच हंसतहंसत सर्वांची ओळख करून दिली. सर्वांना बसायला सांगितलं आणि पाहुण्यांना उद्देशून ते म्हणाले--"मंगलम्‌नं तुम्हांला चट्‌दिशीं ओळखलं नाहीं तर त्याचा राग मानूं नका. किती तरी दिवसांनीं ही भेट होते आहे. काय?" आणि मंगलम्‌कडे वळून ते म्हणाले--"असं आहे, मंगलम्! आपल्या गांवाहून हे आजच आले आहेत. आणि त्यांनीं आणलेली बातमी अधिकच भयानक आहे. लोकांना गवतसुद्धां खायला पुरं पडत नाहीं! भुकेमुळें लोक पटापट मरूं लागले आहेत. त्या परिस्थितीचा विचार केला म्हणजे मुंबई स्वर्गासारखी वाटतं. इथं निदान खायला तरी आहे! पैशालाही अडचण नाहीं! मुंबईंत मनुष्याला जिवंत रहायला तरी..."

सुब्बांनीं एक दीर्घ निःश्वास टाकला, त्यांत उरलेले शब्द विरून गेले. मंगलम्‌सुद्धां या भाषणानं विरघळून गेला. सहानुभूतीनं त्यानं सर्वांच्याकडे पाहिलं, आणि नकळत त्यानंहि उसासा टाकला! सुब्बांनीं सुरुवात केली--

"हें पहा, मंगलम्! ह्यांनीं मला पत्र घातलं होतं. तें पाहतांच मी ह्यांना लगेच मुंबईला निघून या असा माझा 

निरोप धाडला. काय कठीण दिवस आले आहेत! आणि अशा वेळीं आपण एकमेकांना गांवकऱ्यांना, नातेवाईकांना मदत करायची नाहीं म्हटलं तर करायची तरी केव्हां ? काय ?..."

सर्वांच्याकडे अर्थपूर्ण नजर टाकून सुब्बा लगेच पुढं म्हणाले—

"आतां जागेची अडचण आहे खरी! मुंबईत तेवढंच दुःख आहे! त्याला काय करायचं? आपलं चाललंच आहे. ...आणखी दोनचार माणसं आलीं म्हणून विशेष असं काय होणार आहे? काय?"

मंगलम्‌नं एकदम दचकून वर पाहिलं. आश्चर्याचा धक्का बसून तो जागींच हादरला. भान गेल्यामुळं, आपण ओरडतों आहोंत याचं अवधान न रहातां तो म्हणाला—

"हे...हे...इथं...या घरांत राहणार आहेत?"

एकच क्षण विचित्र शांततेंत गेला. लगेच दंतास्मित करीत सुब्बा उद्‌गारले—

"अरे हो, बेटा! नाहीं तर हे जाणार कुठं?"

"पण—" मंगलम्‌चं आश्चर्य अजून कायम होतं.

"हें पहा, मंगलम्! " सुब्बा म्हणाले; आपण अशा अडचणीच्या प्रसंगीं एकमेकांना मदत केली पाहिजे, हें तर खरं ना? आणि मी तुला आश्वासन देतों यांच्या-पासून आपल्याला मुळींसुद्धां उपद्रव होणार नाहीं."

"पण –"

"आणि त्यांनीं मला वचन दिलंय् कीं, जागा मिळतां-क्षणीं आपण इथून निघून जाऊं! काय?"

शांतपणं विचार करण्याच्या परिस्थितींत मंगलम् असता तर खुद्द सुब्बांनीं आतापर्यंत लक्ष वेळां दिलेल्या वचनांचं आणि
 आश्वासनांचं काय झालं हें त्याला कळून आलं असतं. परंतु,

तो कमालीचा गोंधळून गेला होता. समोर बसलेल्या स्त्रियांच्याकडे बुजरी नजर टाकीत तो अडखळत म्हणाला—

" पण ह्यांना राह्यला जागा कुठं आहे ? "

सुब्बा हंसले आणि तत्परतेनं उत्तरले-" कां ? सैंपाकघरांत ! ह्या साऱ्या बायका आणि पोरी पाहून घेतील काय करायचं तें. काय ? "

मंगलम्‌च्या मनांत या वेळीं काय विचार आले, त्याला काय वाटलं हें सांगणं कठीण आहे. त्याच्या चेहऱ्यावर यावेळीं जो भाव उमटला होता, त्याचंहि वर्णन करणं अशक्य आहे. त्यानं बावळटासारखी, स्त्रियांच्याकडून पुरुषांच्याकडे आणि पुरुषांच्याकडून स्त्रियांच्याकडे, भावडी दृष्टि टाकली आणि तो पुटपुटला—

" पण— "

त्याला पुढं सुचेना; सुब्बांना मात्र एकदम हास्याचा लोट फुटला. आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, आलेले पुरुषहि हंसायला लागले. आणि स्त्रियासुद्धां तोंडाला पदर लावून स्मित करूं लागल्या ! मंगलम् वेडयासारखा आ करून पाहत होता.

सुब्बांनीं स्वतःला सांवरलं. खुणेनं स्त्रियांना आंत जायला सुचवलं आणि त्या गेल्याबरोबर हंसत हंसत ते म्हणाले—

" बेटा मंगलम् ! तूं बच्चा आहेस अगदीं अजून ! लग्न झाल्याशिवाय माणसाला नीट समज येत नाहीं. कितीहि गर्दी अन् गोंधळ असला तरी विवाहितांना कळतं कसं जमवून घ्यायचं तें..."

त्यांना पुन्हां हास्याची उकळी फुटली. बसलेले पुरुषहि त्यांत सामील झाले. कशीबशी शब्दांना वाट फोडीत सुब्बा बोलले—" त्याची नको तुला काळजी ! "

आणि आपण गाढव आहोंत असं मंगलमूला वाटलं.

परंतु, आपल्या विचारांशीं झुंजलंच पाहिजे असं मंगलमूनं ठरवलं.

● ●

नवीन आलेले पाहुणे घरांत मिसळून गेले होते. जीवनाची यथाक्रम गजबज अधिक जोरदारपणं चालू झाली होती.

यापूर्वी अनेकदां, इकडेतिकडे भटकत राहून वेळ काढून, मंगलमूनं शक्य तितका उशीर करून घरीं यायचा प्रघात पाडला होता. घरांत शक्य तितकं कमी असावं अशा उद्देशानं तो रेस्टारॉंमध्यें अकारण खूप वेळ बसूं लागला होता. असतील नसतील ते सारे मित्र धुंडाळून कंटाळा येईपर्यंत तो त्यांच्या घरीं थांबूं लागला होता. सिनेमाच्या शेवटच्या शोला जायचं-सुद्धां त्यानं शिल्लक ठेवलं नाहीं. पहांटे एक-दोन वाजतां सिनेमाहून घरीं परतल्यावर त्याला दार उघडण्याचा सुब्बांनीं कधीं आळस केला नाहीं किंवा तक्रार केली नाहीं. उलट ते म्हणायचे–" एकट्या माणसाला आयुष्यांत कांहीं गंमत तर हवी ! "

आतां मंगलमूला वाटूं लागलं कीं, आपण पहिल्यापासून भित्रीभागुबाईसारखा वागत आलों. एक तर या सर्व लोकांना 'क्विट्' म्हणून सांगायला पाहिजे नाहीं तर मुकाट्यानं स्वस्थ तरी बसलं पाहिजे ! नामर्दासारखं घरापासून दूर पळून जाण्यांत काय हंशील आहे ?

धिम्या मनानं त्यानं आपला सारा कार्यक्रम बदलून टाकला. हपीस सुटल्याबरोबर लगेच घरीं यायची त्यानं संवय केली. सर्व प्रसंगांना शौर्यानें आणि हंसत मुखानं तोंड देण्याची त्यानं तयारी केली. आपल्या सौजन्याचा काय काळाबाजार या लोकांनीं मांडला आहे, हें आपल्या
 अबोल वागणुकीनं या मठ्ठ लोकांच्या नजरेला आणून

द्यायचं, आणि असे एक दोन आठवडे गेले कीं हात जोडून सान्यांना म्हणायचं, "या आतां आपण!"

मंगलमूचं मन निवळलं होतं; पण त्याला झोंप येईना. त्याच्याभोंवतीं सर्व अंधार होता. त्या अंधारांतून त्याला श्वासोच्छ्वासांचे आणि घोरण्याचे आवाज ऐकूं येत होते. घामामुळं येणारा निद्रिस्त शरीरांचा ओला उग्र दर्प त्याच्या नाकाला झोंबत होता. श्वास कोंडावा इतका उकाडा होत होता. त्याच्या मस्तकांतून कळा येऊं लागल्या; पण सर्व गोष्टींना त्याची तयारी झाली होती. सैंपाकघरांतून मधूनच लहान पोरांचं केंकाटणं कानावर येऊन आदळे; पण ह्याची त्याला संवय झाली होती. कोणाच्या तरी भक्कम तंगड्या अगदीं त्याच्या कानशिलाजवळ होत्या. पण त्याचाहि त्याला विषाद वाटला नाहीं. त्याला झोंप यायची असतीच तर ती अशा कोणत्याहि कारणामुळें थांबली नसती; पण त्याला झोंप येत नव्हती हें खरें!

बाथरूममध्यें एकदां जाऊन यावं असं त्याला वाटलं. तो उठला. आपल्या वाटेंत पसरलेले अनेक देह आणि तंगड्या त्याला जाणवत होत्या. त्यानं काळजीपूर्वक पाऊल टाकलं. पण लगेच त्याला तें उचलावें लागलें. कोणाच्या तरी अंगावर त्याचा पाय पडला होता. मोठ्या शिताफीनं त्यानं एका पायावर स्वतःचा तोल सांभाळला. नाहीं तर तो कोणाच्या तरी अंगावर आदळ-तच होता. हवेंतला पाय त्यानं खालीं घेतला व तो जागींच ताठ उभा राहिला. भोंवतीं इतका अंधार होता कीं, दिवा लाव-ल्याशिवाय एक तसूभरहि पुढं हलणं अशक्य आहे असं त्याला वाटलं. एकाएकीं तो गोंधळून गेला, आणि त्यामुळं त्याचं दिशांचं अवधानच गेलं. कोणीकडच्या भिंतीला दिव्याचा स्विच आहे हेंच त्याला आठवेना. तशा गुडूप अंधा-रांत माणसांच्या डोंगरकपारींत उभं असतांना मंगलमूला अचानक घाम फुटला. पण त्यानं स्वतःला धीर दिला. 

कसून डोकं घासलं आणि कोणती तरी एक दिशा निश्चित् केली. त्याला वाटलं, खालीं वांकून आपण हातानं चांचपडत सरकलों तर तें अधिक बरं होईल. म्हणजे मग कोणाच्या अंगावर पाय तरी पडणार नाहीं. या विचारानं तो खालीं वांकला आणि हातानं तो रस्ता शोधूं लागला. पण, अशा रीतीनं तो चारदोन पावलं पुढं गेला असेल नसेल, तोंच त्याच्या हाताला उष्ण स्पर्श झाला. लोक मध्यें वाटेल तसे झोंपले होते यांत शंकाच नाहीं. एकदम घाबरून मंगलम्‌नं आपला हात मागं घेतला!

आतां मात्र त्याची पांचावर धारण बसली. निराशेनं निकराला येऊन तो एकदम खालीं बसला. आणि तत्क्षणींच त्याच्या ध्यानीं आलं कीं, आपण कोणाच्या तरी पायावर बसलों आहोंत! अंगठ्याचा नखर स्पर्श होतांच त्याला शंकाच राहिली नाहीं......

पण एकादी शिवी हांसडून मंगलम् दूर सरकतो न सरकतो तोंच, ज्याच्या पायावर तो बसला होता त्यानं, कदाचित् स्वप्नांतच, मोठी आरोळी ठोकली. मंगलम् इतका दचकला कीं त्याचा एकदम तोल गेला. कोणाच्या तरी अंगावर तो कोसळला, आणि त्याचे पाय दुसऱ्या कोणाच्या तोंडावर जाऊन आदळले!

आणखी एक किंकाळी फुटली... त्याच्या मागोमाग दुसरी... तिसरी...! क्षणार्धांत त्या खोलींत हलकल्लोळ झाला. आणि त्यांत कोणाची तरी भेदरलेली आरोळी उमटली—
'चोर...धांवा धांवा...खून...!...'

सुदैवानं कोणी तरी बटन ओढलं, आणि खोलींत प्रकाश लोटला. आपल्या अस्ताव्यस्त स्थितींत कसाबसा उठून बसण्याचा प्रयत्न करीत, मंगलम्, शरमेनं आणि अपराधीपणानं पुटपुटला......

" मी...मला...बाथरूम ."

पण त्याला शब्द फुटेना. स्पष्टीकरणाची कांहीं गरज नव्हती.

● ●

दुसऱ्या दिवशीं मंगलम् जेव्हां मॅनेजरच्या पुढं जाऊन उभा राहिला, तेव्हां त्याचे डोळे लाल दिसत होते आणि चेहरा पार उतरून गेला होता.

मॅनेजरनं त्याच्याकडे पाहून म्हटलं—

" आजारी आहेस का रे ? मला माहित आहे तुला फार काम पडतंय. पाहिजे असलं तर —"

" नाहीं सर !" मंगलम् एकदम घाईनं म्हणाला. " मला विचारायचं होतं–" त्यानं एक आवंढा गिळला आणि तो पुढं म्हणाला, " कीं सर, असं एकादं काम नाहीं का..."

मंगलमला आपलं वाक्य एकदम पुरं करवेना. मॅनेजर आश्चर्यानं त्याच्याकडे पाहात होते. शेवटीं त्यांनीं विचारलं–

" अरे, काय ? नीट बोल ना !"

मंगलमनें आपलं धैर्य एकवटलं आणि तो म्हणाला—

" सर, मला एक विनंति करायची आहे. तुम्ही मला असं काम नाहीं का देऊं शकणार, कीं ज्यामुळं मला रात्रभर हपीसांतच रहावं लागेल ?"

मॅनेजरला त्याच्या बोलण्याचा अर्थच कळेना. मग त्यांच्या मुखावर हळुहळू स्मित उतरलं. ते म्हणाले —

" मंगलम्, इतकं जिवाचं रान तुला करायची कांहीं गरज नाहीं ! तुला आणखी जास्त पगार हवा असला तर मी आतां आर्डर देतों."

" तसं नाहीं सर !" मंगलम् स्पष्टपणानं म्हणाला, " हपीसांतच रहायची...कायमचं रहायची माझी इच्छा आहे."

" म्हणजे ? " मॅनेजर बुचकळ्यांत पडून म्हणाले, " सबर्बनमध्यें तुझा स्वतःचा ब्लॉक आहे ना ? "

" हो सर ! पण मला तिथं रहायचं नाहीं यापुढं."

घरमालकांशीं कांहीं तंटा झाला असावा अशा कल्पनेनं, मॅनजरनं मंगलमूकडे न्याहाळून पाहिलं; पण त्याच्या खालीं वळलेल्या नजरेवरून आणि शरमिंदेपणावरून तसं कांहीं नसल्याची मॅनेजरची खात्री झाली, आणि मग त्यांना एकदम हंसूं फुटलं ! हंसतां हंसतांच ते बोलले—

" मंगलम्, तूं फार सेंटिमेंटल आहेस ! खरं म्हणजे तूं यापूर्वीच लग्न करून घ्यायला पाहिजे होतंस ! "

मॅनेजरना पुन्हा हंसूं आलें. मंगलम् बाहेर आला तेव्हां हपीसांतली इतर मंडळीहि खदखद हंसत आहेत असं त्याला आढळून आलं.

आपलं म्हणणं कोणीही-मॅनेजरनीहि–समजून घेतलं नाहीं, याचं त्याला वाईट वाटलं ! पण त्यानं मनाला हुरूप दिला कीं मॅनेजरच्या घरीं जाऊन त्याला नीट सांगितलं म्हणजे मग तरी त्याला समजेल.

'समीक्षक'

## सरदार

गिरगांवांतल्या एका कोंदट वाडींतल्या एका गचाळ चाळींत तळमजल्याला तें हॉटेल होतें. रस्त्याच्या किंचित् आंत असलेल्या दीडखणी जागेंत त्याचा विस्तार आणि वैभव सामावलें होतें. भोवताल जरी अतिशय घाणेरडा होता तरी आंत अतिशय स्वच्छ होतें. कदाचित् या वैभवाला अनुरूप परंतु त्या परिसरांत न शोभणारा असा एक सुंदर मोठा फलक हॉटेलवर लावलेला होता. त्यावर मालकाचें नांव नव्हतें. फक्त एवढींच अक्षरें होतीं—
' सरदारगृह.'

प्रथमतः मला या नांवानें मनस्वीं हंसूंच आलें होतें. या नांवाचें अधिक चांगलें विडंबन करतां आलें नसतें ! इतरांप्रमाणें मींहि या नांवाबद्दल टिंगल केली असती. परंतु हॉटेलांतली स्वच्छता आणि विशेषतः तीं अतिशय सुंदर वळण असलेलीं आणि सुंदर रंगविलेलीं अक्षरें पाहून मला उपहास करण्याचा मोह होईना.

आणि हॉटेलच्या मालकाला मीं जेव्हां पाहिलें तेव्हां माझी उपहास-बुद्धि जवळजवळ नाहींशीच झाली. गृहस्थ उंच नि सडपातळ होता. वर्ण अगदीं गोरा आणि डोळे घारे. थोडीशी भीति वाटावी अशीच त्याची मुद्रा होती. त्यांत त्याच्या करड्या रंगाच्या झुपकेदार मिशांनीं अधिकच उग्र छटा निर्माण केली होती. किंचित् आंखूड असें अगदीं स्वच्छ धोतर आणि अंगांत मलमलीचा स्वच्छ सदरा हा त्याचा नेहमींचा पोषाख असे.

नांवावरून या व्यक्तीची नीटशी कल्पना आली नसती. खरं सांगायचं म्हणजे मला त्याचं खरं नांव ठाऊकच नव्हतं. सर्वजण त्यांना 'सरदार' म्हणत. 'सरदारगृह' या नांवावरून ठेवलेलें तें उपहासगर्भ नांव होतें, यांत कांहींच शंका नव्हती. त्यांना 'सरदार' म्हणून हांक मारतांना सर्वांच्याच ओठांना मुरड पडत असे आणि डोळयांत मिष्कीलपणा चमकून जात असे. पण त्याची या गृहस्थाला दाद नव्हती; असली तरी पर्वा नव्हती. त्याच्या मुद्रेवर करडेपणाशिवाय इतर कुठली छटा मला कधींच दिसली नाहीं. या गृहस्थाला कांहीं भावना असतील कीं नाही याचीसुद्धां मला कांहीं वेळेस शंका यावी इतकी सामान्यतः निर्विकार अशी त्याची मुद्रा असे.

मी या हॉटेलाकडे आकर्षित व्हायला त्याची स्वच्छता आणि ती सुंदर, वळणदार नांवाची पाटी या गोष्टी जशा कारणीभूत होत्या त्याचप्रमाणें माझी सोय हेंहि एक प्रमुख कारण त्यांत होतें. सरदार नांवाप्रमाणेंच लहरी होते. त्यांची लहर असली तर ते खाद्यपदार्थ बनवीत, नाहींतर कांहीं नाहीं. पण त्यांच्या हाताला असा कांहीं गुण होता कीं, ज्या दिवशीं कांहीं पदार्थ बनवले असतील त्या

 दिवशीं ते एक तासपर्यंत कांहीं शिल्लक रहात नसत. चटा-

वलेल्या लोकांची सारखी झुंबड लागत असे आणि चट्दिशीं पातेल्याचा फन्ना उडत असे. त्यांना अशा दिवशीं मिळकतहि अर्थात् चांगली होत असे. ही गोष्ट त्यांच्या हितासाठींच त्यांच्या नजरेला आणून द्यावी म्हणून म्हणा, किंवा स्वतःच्या जिभेचें कौतुक अखंड पुरंविलें जावें म्हणून म्हणा, कुणीतरी त्यांना एक दिवस म्हटलें—

"सरदार, अरे तुम्ही तीं कांदाभजीं आणि साबुदाण्याचं थालिपीठ रोज रोज कां बनवीत नाहीं? गिऱ्हाइकांचा तर नुसता तोबा उडतो. चांगला पैसाहि मिळतो कीं तुम्हांला! मग असा आळस कां करतां पदार्थ बनवायला?"

सरदारांनीं आपले घारे डोळे त्या गृहस्थावर क्षणभर स्थिर केले आणि ते उद्गारले—

"तुमच्या बापाचा कांहीं नोकर नाहीं मी—"

सरदारांची लहर ही अशी होती! त्यांच्याकडे येणाऱ्या सर्व गिऱ्हाइकांना त्यांच्या स्वभावाची पूर्ण ओळख झालेली होती. ते विक्षिप्तपणा म्हणून सारं थट्टेवारी सोडून देत असत. मला मात्र या गृहस्थाविषयीं अखंड कुतूहल आणि आदरसुद्धां वाटायला लागला होता.

खाद्यपदार्थांविषयीं सरदारांची लहर ही अशी असली तरी दोन वेळची 'राइसप्लेट' ते नियमानें बनवीत असत. मला वाटणारं प्रमुख आकर्षण तें हेंच. त्या वेळीं मी—पण त्याची या हकिकतीला कांहीं जरूर नाहीं!

दोन आण्यांत स्वच्छ व चवदार मोजकं जेवण या सरदार-गृहांत मिळण्याची सोय होती! मी नियमानं तिथं जात होतों. आणि जेवणाची चव कधीं बिघडल्याचं मला ठाऊक नव्हतं. मला नेहमीं वाटे कीं या गृहस्थानं मोठ्या प्रमाणावर खाणावळ काढली तर किती छान

चालेल...आणि लोकांवर तरी किती उपकार होतील! परंतु त्या गृहस्थाला तसं सुचवायचा धीर मला कधींच झाला नाहीं. न जाणो, हा एखादं विक्षिप्त उत्तर द्यायचा आणि आपल्यालाच शरमल्यासारखं व्हायचं—

तेंहि कांहीं खोटं नव्हतं. एका रात्रीं एक नियमित येणारं गिऱ्हाईक खूप उशीरा आलं त्या वेळीं जेवण संपून गेलं होतं. तो गृहस्थ जरा चिडूनच म्हणाला—

" सरदार, आम्ही रोजचं गिऱ्हाईक. उशीर झाला आज. माझी प्लेट झांकून कां नाहीं ठेवली ? "

सरदारांनीं अगदीं तिरसटपणानं उत्तर दिलं—

" यायचं असलं तर वेळेवर या. अन्न झांकून ठेवून वाट पाहायला मी कांहीं तुमची बायको नाहीं. "

ही बेपर्वाई! खरं सांगायचं म्हणजे धंदा करून पैसे कमवावे असं सरदारांचं ध्येय नसावंच मुळीं. गृहस्थानं आपल्या हॉटेलांत हाताखालीं एखादा पोऱ्यासुद्धां कधीं ठेवल्याचं मला स्मरत नाहीं. स्वतां सगळं रांधायचा, स्वतांच वाढायचा. फक्त उष्टींखरकटीं उचलायला आणि भांडीं घासायला एक मराठा जातीची बाई होती तेवढीच.

सरदारांच्या या विक्षिप्तपणाचे लोकांनीं वाटेल ते अर्थ लावले होते. बहुतेक लोक त्यांच्यावर रुष्टच असत. म्हणायचे—" काय हलकट आणि शिष्ट गृहस्थ आहे! त्याला माणसांचीसुद्धां पर्वा नाहीं! अशानं कांहीं धंदा होंत नाहीं. म्हणे सरदार! सरदार होते तर अशी खाणावळ काढून बसले तरी कशाला ? आम्हांला जरूर आहे, म्हणून आम्ही येतों. नाहींतर कशाला आलों असतों मरायला ? "

इतर कांहीं लोक सांगत कीं, सरदार मूळचे फार मोठ्या

 घराण्यांतले. सट्टेबाजीचा नाद तरुण वयांत लागला आणि

त्यानं सारी धुळदाण झाली. म्हणून या दशेला आले. तरी मुळचं पाणी जातं का कुठं ?

यावर कुणीतरी हळूंच कुजबुजायचं : खरं आहे. अजून आंकडे लावीत असतो बेटा. आणि ही बाई आहे ना काम करायला ठेवलेली ? तिचा आणि याचा—

मीं अशा बोलण्याकडे कधीं फारसं लक्ष दिलं नाहीं. या गोष्टी खोट्या असतील म्हणून नव्हे, पण त्यांचं मला महत्त्व वाटलं नाहीं. माणूस व्यसनी असला तरी त्याची आंतरिक योग्यता कधीं लुप्त होते का ?

दिवसांमागून दिवस चालले होते. वर्षं गेलीं. माझ्या स्थितींत थोडासा पालट झाला होता. एक तात्पुरती नोकरी लागली होती, म्हणून मी कॉलेज सोडून दिलं होतं. माझी राहण्याची जागा बदलली आणि त्याबरोबर माझं सरदारगृहाचं सभासदत्वहि सुटलं. त्यानंतर मी सरदारांना जवळजवळ वर्ष-दीड वर्षांत पाहिलं नाहीं.

एक दिवस तिसऱ्या प्रहरीं गिरगांव नाक्यावरच्या मोठ्या हॉटेलांत मी गेलों होतों. आंत जाऊन बसतों तर थोडीशी गडबड चाललेली मला दिसली. मोठमोठ्यानं उच्चारलेले शब्दहि ऐकूं आले. भांडण चाललं होतं यांत शंकाच नाहीं. मला वाटलं इथून उठून दुसरीकडे जावं. पण गिऱ्हाइकांची रीघ लागली होती...मालक त्या घोळक्यांतून एकदम बाहेर आले आणि क्षणभरांत सामसूम झालं. नेहमींचेच हे प्रकार असं म्हणून मी तिकडे दुर्लक्ष केलं आणि भिंतीवरील पदार्थों-ची यादी वाचूं लागलों.

कुणीतरी येऊन विचारलं—

" काय आणूं ? "

मीं जरा चमकून पाहिलं तों माझ्यापुढं सरदार उभे ! आश्चर्यानं मी कांहींतरी उद्गारणार तर त्यांच्या चेहऱ्यावरहि 

मला ओळखल्याच्या खुणा पटलेल्या दिसल्या. इच्छा असूनहि मला कांहीं विचारण्याचा धीर होईना. सरदारांच्या स्थितींत खूपच पालट झाला असला पाहिजे, हें उघड होतं. त्याशिवाय का या हॉटेलांत वेटर म्हणून त्यांनी नोकरी धरली होती ? मग आणखी विचारून तरी मी काय करणार होतों ? मीं मुकाट्यानं ऑर्डर दिली आणि वाट पाहात बसलों.

थोड्याच वेळांत बशा घेऊन सरदार आले. आणि माझ्या टेबलापाशीं उभे राहिले. त्यांना माझ्याशीं बोलायचं होतं हें मीं ताडलं. मीं त्यांच्याकडे पाहिलं. त्यांच्या बाह्य स्वरूपांत फारसा बदल झालेला नव्हता. तेंच किंचित् आखूड स्वच्छ धोतर आणि तोच मलमलीचा स्वच्छ सद्रा. मुद्रा मात्र काळवंडली होती. फक्त डोळ्यांतला तो घारा करारीपणा जसाच्या तसा होता.

सरदारांनी सुरुवात केली—

"काय गिऱ्हाइकं असतात तरी !"

मघाच्या भांडणाबद्दल ते सांगताहेत हें ओळखून मीं जरा उत्सुकतेनं विचारलं—

"काय झालं ?"

"अहो, गृहस्थानं आर्डर दिली. पदार्थ गरम यायला कांहीं वेळ तर लागेल कीं नाहीं ? आणि यांची एकट्यांचीच थोडी ऑर्डर आहे ? उशीर झाला तर भडकलं त्यांचं पित्त आणि लागले बोलायला ! मी सरळ सांगितलं कीं तुमची एकट्याची ऑर्डर आधीं आणायला मी कांहीं नोकर नाहीं तुमचा ! आणि हें कांहीं घर नाहीं. घरींसुद्धां मागितल्याबरोबर पदार्थ चालत येतो वाटतं ? इथं निदान मिळतंय तरी सारं कांहीं. घरीं जसा हा रोज श्रीखंड-पुरी आणि वांग्याची भजींच खात असेल, नाहीं ?"

सरदारांच्या चेहऱ्यावर किंचित् स्मिताची चमक उमटली. मलाहि हंसूं आलं.

"असे असतात लोक!" सरदार पुन्हां सांगूं लागले. "कोणाला अक्कल असेल तर शपथ. आमचे मालकहि तसेच. गिऱ्हाईक संतापलं तर हे आले त्याच्या वतीनं माझ्याशीं भांडायला. मी मालकांनाहि सुनावून दिलं: मी स्वतः हॉटेलाचा मालक होतों. मला नाहीं असा मस्तवालपणा खपत. अन् तुम्हांला हें खपत नसलं तर हा चाललों मी."

सरदारांच्या डोळयांत ती करारीपणाची चमक पुन्हां आली. मला वाटलं त्यांची हकिकत पुन्हां विचारावी. पण त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यानंतर मला धीर झाला नाहीं. त्यांनीं सांगितलेल्या हकिकतीवर मीं कांहींतरी उत्तर दिलं आणि समोरच्या बशीकडे लक्ष वळवलं.

जरा थांबून सरदार म्हणाले—

"काय साहेब, सरदारगृहाची ओळख आहे ना?" त्यांच्या हंसण्याला स्मिताचं प्रत्युत्तर देत मी म्हणालों--

"हो हो. त्याचा विसर कसा पडेल?"

सरदार पुन्हा मोकळेपणानं हंसले, आणि म्हणाले—

"आतां बरी दिसतेय् तुमची स्थिती! पहिल्यापेक्षां दिसतांहि बरे!"

मी थोडक्यांत माझी हकिकत सांगितली. ती ऐकल्यावर सरदार म्हणाले—

"आनंद आहे आम्हांला. चालूं द्या. माणसानं खचून जाऊं नये. हेहि दिवस जातील निघून—"

कोणीतरी गिऱ्हाइकानं हांकारा केला म्हणून सरदार दुसऱ्या टेबलाकडे गेले.

पैसे देऊन हॉटेलांतून बाहेर पडतांना माझ्या मनांत सरदारांच्याविषयीं सारखे विचार सुरू झाले होते. गृहस्थ 

आज दुसऱ्याचा नोकर म्हणून हें हलकं काम करतो आहे. पण आपल्या स्थितीचा त्याला विषाद नाहीं कीं गतवैभवाची हुरहूर नाहीं! मनाचा पीळ जशाच्या तसा कायम आहे. तीच बेपर्वाई, तोच आकर्षक मस्तवालपणा! फरक पडला असला तर तो एवढाच कीं जरा अधिक बोलायला लागला आहे. पूर्वी इतकं कधीं बोलल्याचं मला आठवत नव्हतं. अन् आपणहून तर कधींच नाहीं. परिस्थितीच्या कटु फेऱ्यांनी या गृहस्थांत एवढाच बदल घडवून आणला होता! का, त्यांची–माझी पूर्वीची ओळख आणि मी कुठेंहि अधेंमधें न पडणारा आणि अबोल म्हणूनच माझ्याशीं ते एवढं बोलले?

हें मनाचं विक्षिप्त सामर्थ्य आलं तरी कुठून यांच्याकडे? मग आम्हीच कसे अशी कुरकूर करीत बसतों? वास्तविक, आजची माझी स्थिति सरदारांच्यापेक्षां तरी खास चांगली होती. पण उलट त्यांनींच मला धीर दिला कीं जातील हेहि दिवस निघून!

विलक्षणच आहे!

याहि गोष्टीला कांहीं वर्षें होऊन गेलीं.

मला आतां सुस्थिति प्राप्त झाली होती असं म्हणायला कांहीं हरकत नव्हती. कायद्याची परीक्षा देऊन मी वकील झालों होतों. मुंबई सोडून माझ्या गांवीं मी प्रॅक्टीस करीत होतों.

कित्येक वर्षांनीं एका कामासाठीं आलों होतों. लोकलमध्यें बसून मी ग्रँटरोडकडे चाललों होतों. टायची गांठ सावरीत सिगारेटचा धूर सोडीत मी शांतपणें बसलों होतों. गाडींत हिंडणारा एक भिकारी आमच्या बाकाजवळ आला म्हणून मी लक्ष नाहीं असं दाखवून खिडकींतून बाहेर पाहूं लागलों; तोंच माझ्या कानीं किंचित् कठोर असे शब्द आले—

“साहेब, द्यायचं नसलं कांहीं तर देऊं नका. खिडकीच्या बाहेर कशाला पहातां?”

मीं वरमून त्या भिकाऱ्याकडे पाहिलं. फाटके तुटके कपडे, दाढी सपाटून वाढलेली. पण ते घारे डोळे मात्र स्वाभिमानानं, करारीपणानं चमकत होते! एक क्षणभर मी संभ्रमित झालों. पण दुसऱ्याच क्षणीं त्या अतिशय खंगलेल्या स्थितींत मीं सरदारांना ओळखलं! मला इतका मोठा धक्का बसला कीं कांहीं न करतां मी त्यांच्याकडे पाहातच राहिलों. त्यांनींहि मला ओळखलं. कारण ते झटकन् पुढं निघून गेले. मी सारखा पाहातच होतों...

माझ्या शेजारीं बसलेला दुसरा एक गृहस्थ मला इंग्रजींत म्हणत होता—

"असे मस्तवाल असतात हे लोक. म्हणूनच यांना कांहीं देऊं नये असं मला वाटतं. पण हा एकाकाळीं चांगल्या स्थितींत असावा असं याच्या चर्येकडे पाहून वाटतं!"

मी त्या गृहस्थाकडे न पाहतांच उत्तर दिलं—

"खरा आहे तुमचा तर्क. मी ओळखतों याला—"

त्या गृहस्थानं पैशाचं पाकीट काढून सरदारांना हांक मारली. मला वाटलं हे आतां इकडे येतील कीं नाहीं? कांहीं नाहीं तरी मला पाहिल्यानंतर त्यांना शमल्यासारखं नक्कीच झालं होतं.

पण सरदार आले. माझ्याकडे न पाहतां त्यांनीं त्या गृहस्थाच्या पुढं हात पसरला. त्या गृहस्थानं आपल्या पाकिटांतून शोधून शोधून एक नासरी काढली होती ती त्यांच्या हातावर ठेवली!

त्या गृहस्थाच्या दातृत्वानं मीहि थक्क झालों होतों. पण अधिक थक्क झालों सरदारांच्या वागण्यानं. त्यांनीं ती नासरी बोटानं एकदा चाळवली आणि सरळ गाडीच्या बाहेर भिरकावून दिली!

मला जितकं आश्चर्य वाटलं तितका, का कुणास ठाऊक, 

आनंदहि झाला ! तो गृहस्थ, त्याचं कंजुष दातृत्व असं उघडं पडलं होतं म्हणून खूप खजील झाला आणि चिडून अद्वातद्वा बोलूं लागला होता—

पण माझं त्याच्याकडे लक्ष नव्हतं. मी खिशांतून पैशाचं पाकीट काढून त्यांत किती पैसे आहेत तें पाहात होतों. आणि माझं मन विचारांत व्यग्र झालं होतं...

सरदार माझ्याकडून पैसे घेतील का ? त्यांना तो अपमान तर वाटणार नाहीं ?...त्यांचा माझा संबंध वेगळ्या प्रकारचा होता !...पण मी त्यांना दानधर्म थोडाच करीत होतों ?...

स्वतःचं सुखदुःख ज्याच्या कधीं गांवींहि नाहीं आणि दुसऱ्याच्या दुःखानं मात्र ज्याचं मन क्षणांत कळवळून येतं अशी, या जगांत, आपल्या आयुष्यांत, क्वचित्च जी एखादी व्यक्ति भेटते त्यापैकीं सरदार होते...त्या काळीं मला त्यांचा आधार वाटे !...या कृतज्ञतेच्या भावानेंच मी त्यांना पैसे देणार होतों...

निश्चय करून मी पाकीटांतून दहाची नोट काढली आणि जागेवरून उठलों....

गाडी थांबली होती. उतरणारे लोक उतरून गेले होते... सरदारहि डब्यांत नव्हते. माझ्या विचारांत या गोष्टी माझ्या ध्यानीं आल्या नव्हत्या.

नव्या येणाऱ्या गर्दीला चुकवीत, धक्के मारीत मी कसाबसा दरवाजाजवळ जाऊन पोंचलों. फलाटावरील संमर्दात मी भिरभिरत्या डोळ्यांनीं सरदारांना शोधूं लागलों... या गर्दीत ते मला कसे दिसणार ?

माझ्या चिंतेंतहि माझी व्यग्रता, माझ्या हालचाली आणि माझें विचित्र वर्तन यांनीं आजूला कुजबुज सुरू झाली होती हें मला जाणवत होतें...पण माझ्या डोळ्यांना एकच वेध लागला होता.

स्टेशनांतल्या लोखंडी पुलावर सरदार उभे असलेले मला दिसले...मी दरवाजाला धरून खालीं वाकलों आणि शक्य तेवढ्या मोठ्यानें हांका मारायला सुरवात केली—

" सरदाऽर— "

गाडी सुरूं झाल्याचं मला समजलंच नाहीं. माझ्या शेजा-रच्या माणसानं कमरेला मिठी घालून मला मागं खेचून धरलं होतं.. कोणाचे तरी शब्द कानीं आले, 'अहो साहेब, मरायच्चंय् का ? ...' आणखी शब्द.. मिष्कील हास्याचे फवारे...... !

मी मागें वळून अजूनहि पुलाकडे पाहात होतों.. सरदार पुलावरून नाहींसे झाले होते...

पण मला अजूनहि वाटतं कीं, त्यांनीं माझ्या हांका ऐकल्या...ओळखल्या...आमचे डोळे एकमेकांना भेटले. मला आशा आहे कीं सरदारांची माझी पुन्हां गांठ पडेल. कधींतरी...कुठंतरी...

'अभिरुचि'
ऑगस्ट १९४४

# अबोल रहिवासी

गिरगांव कोंपऱ्यावरच्या खटाव बिल्डिंगमध्यें दुसऱ्या मजल्यावरील नळाजवळच्या लहानशा खोलींत एक दिवस एक गृहस्थ रहायला आला.

जवळ जवळ दोन महिने झाले, परंतु त्या अवधींत तो कधीं शेजाऱ्यापाजाऱ्याकडे गेला नाहीं कीं बोलंला नाहीं. इतकंच नव्हे तर त्याच्याकडेहि कधीं कोणी आलं नाहीं.

रोज साडे-दहा अकराच्या सुमाराला हातांत दोन-चार पुस्तकं घेऊन तो बाहेर जातांना दिसे. नेहमीं आजारी आहे असं वाटावं इतकी त्याची शरीरयष्टी किरकोळ होती. गालाला खड्डु पडलेले होते. त्यामुळं त्याचं मोठं नाक खूप वर आल्यासारखं दिसे. चेहऱ्यावर अतिशय फिकट छटा होती. पांढरी पँट आणि अंगांत तपकिरी रंगाचा गरम कोट हा त्याचा पोषाख होता. त्याचे कपडे नेहमींच सैल दिसत. अंगाचा किरकोळ-पणा तेवढा दिसूं नये म्हणून ते तसे असत, का दिवसें-

 दिवस तो खंगत चालल्यासारखा वाटायचा म्हणून ते कपडे

त्याला मोठे दिसत याचा उलगडा करण्याचा प्रयत्न कोणी केला नाहीं. या मूर्तीत लक्ष वेधण्यासारखं कांहींच नव्हतं. याला अपवाद दोन गोष्टी मात्र होत्या. त्याच्या डोक्या-वरचे विपुल, काळेभोर केस आणि विशाल भावपूर्ण डोळे.

त्याच्याविषयीं लोकांना कांहींच माहिती नव्हती. त्याच्या खोलीच्या दारावर 'शांताराम आपटे' अशा नांवाची पाटी नसती तर त्याचं नांवहि कदाचित् लवकर कळलं नसतं.

त्याच्या खोलीच्या दाराचे स्टंपस् करून क्रिकेटचा खेळ खेळणाऱ्या चाळींतल्या अवखळ पोरांनीं एकदां तो घरीं असतांनाहि आपला सामना आणि त्यापेक्षां अधिक भरदार आरडाओरडा चालवला. बऱ्याच वेळानं त्यानं दार उघडलं. दारावर धाड्धाड् आदळणारा चेंडू नेमका त्याच्या खोलींत शिरला. सर्व मुलं स्तिमित होऊन पाहूं लागलीं. त्यानं मुका-ट्यानं चेंडू आणून दिला व तो म्हणाला—"खालीं जाऊन खेळा ना."

आपटेला बोलता करण्याचा मुलांचा हा सांघिक प्रयत्न असल्यास तो यशस्वी झाला नाहीं. परंतु आपटे 'मास्तर' असल्याचा शोध मात्र त्यांनीं लावला. ह्याशिवाय, आपटेला नातेवाईक किंवा मित्र कोणी नसावेत, त्याच्या एकलकोंड्या जीवनांत कांहीं जबर दुःख असावं, त्याची प्रेमनिराशा झाली असावी, असे विविध कयास चाळींतल्या इतर लोकांनीं बांधले होते.

परंतु आपटेच्या शेजारीं अडीच खोल्यांच्या ब्लॉक्मध्यें कुटुंब नसलेला परंतु सपाटून वत्सल असलेला एक गृहस्थ रहात असे. त्याची जिज्ञासा एवढ्यानं तृप्त झाली नाहीं. 'जांवई कांहीं वाईट नाहीं' अशा उघड शब्दांनीं त्याच्या पाठीमागं आणि सूचक रीतीनं त्याच्या 

तोंडावर, चाळींतल्या इतर लोकांनीं त्याची जरी थट्टा केली असली, तरी आपटेविषयीं त्याला अकारण वाटणारी अनुकंपा कमी झाली नाहीं. आपटे आपल्या खोलींत जरा स्थायिक झाल्यापासून त्यानं त्याच्यावर नियमानं हल्ले करायला सुरवात केली होती. पण त्याच्या चढाईची कल्पना येतांच आपट्यानं नुसती पद्धतशीर माघार घेतली; एवढंच नव्हे तर, गनिमी काव्यानं तो या प्रेमळ शेजाऱ्याला टाळूं लागला.

परंतु त्यामुळं कोणाला राग आला नाहीं. आपटेचा अबोलपणा विचित्र होता खरा. पण तरी आपटेला जिवंत सहानुभूति दाखवावी अशी दुर्दम्य इच्छा त्याच्या शेजाऱ्याला होत होती.

एकदां किल्ली आंत राहिल्यामुळं कुलूप फोडून घेत असलेल्या आपटेला शेजाऱ्यानं पाहिलं. हा मोका साधून, 'हें कसं झालं बुवा!' 'मग कुलूप उघडेपर्यंत आमच्याकडे बसा' 'फार लाजतां बुवा तुम्ही!' इत्यादि प्रश्नांचा आणि उद्गारांचा भडिमार त्यानं आपट्यावर केला. अबोलपणं, नम्रतापूर्वक त्याचे आभार मानीत आपटे आपल्या खोलींत शिरला, पण शेजारी त्याच्या पाठोपाठ टुणकन् आंत आला. स्वतःच त्याच्या कॉटवर बैठक ठोकीत तो आपट्याला म्हणाला, "बसा ना."

आणि आपले कपडे आपणच धूत असल्यानं ज्या खोलींत रामा गड्यालाहि आतांपर्यंत प्रवेश मिळाला नव्हता, त्या खोलीभर शेजाऱ्यानं नजर टाकली. कॉट, एक बादली, तांब्या, आणि एक ट्रंक याशिवाय खोलींत विशेष सामान असं नव्हतंच. भिंतीवरच्या फळीवर बरीचशीं पुस्तकं मात्र होतीं.

 पाठोपाठ आलेल्या चार दोन वत्सांना, "जा रे, ताईला

दोन कप चहा करायला सांगा" असं फर्मावून आणि हुसकून शेजाऱ्यानं आपटेकडे मोर्चा वळवला.

"तुम्ही शिक्षक आहांत नाहीं का?"

आपटेनं होकार दिला.

"कुठल्या शाळेंत?"

गिरगांवांतल्या एका मुला-मुलींच्या शाळेचं नांव आपट्यानं सांगितलं.

"कुठल्या वर्गाला शिकवतां?"

"दुसरी-तिसरी-"

"असं का? बरं."

या प्रश्नाचा रोंख आपट्याच्या ध्यानीं आला नाहीं. पण कदाचित् ही सरबत्ती थांबवावी अशा उद्देशानें तो एकदम म्हणाला—

"मी इंटरपर्यंत शिकलों आहें. आणि आतां प्रायव्हेटली अकौन्टन्सी शिकतों आहें."

आणि आपण किती बोललों अशा जाणीवेनं आपटे वरमला.

परंतु शेजाऱ्याची कळी खुलली. आजकाल व्यापाराचं शिक्षण घेणं किती महत्त्वाचं आहे यावर त्याचं प्रवचन सुरू झालं.

चहा आला. आपट्यानं तो न बोलतां घेतला. शेजारी म्हणाला—

"तुम्हांला घरीं कोण कोण आहे?"

"एक मोठी बहीण."

"बाकी कोणी नाहीं?"

मानेनं नकार.

"अरेरे! मला वाटलंच असं कांहींतरी असेल."

आपटेनं त्याच्याकडे आश्चर्यानं पाहिलं.

" पण मिस्टर आपटे, तुम्ही फार संकोची आहांत बुवा! तुमच्यासारखा अबोल गृहस्थ मी दुनियेंत पाहिला नसेल. हें पहा, असं करूं नका. तुम्ही येत चला आमच्याकडे. माझीं सर्व मुलं चांगलीं बोलकीं आहेत. तुमचाहि वेळ जात जाईल. अहो, मैत्री केली म्हणजे होते. एकटं बसून कंटाळा नाहीं का येत?"

आपटे म्हणाला—"नाहीं. मला काम असतं. मी वाचतों."

"ठीक, ठीक. मलाहि दांडगा शोक आहे पुस्तकांचा. आपण चर्चा करीत जाऊं. पण तुम्ही यायला पाहिजे आमच्या-कडे. हें पहा, असं करा. आतां सुटी लागेल ना तुम्हांला दिवाळीची? काय प्लॅन आहे तुमचा?"

आपटे म्हणाला—" कांहीं नाहीं."

" मग तुम्ही दिवाळीचं आमच्याकडे जेवायलाच आलं पाहिजे." जणूं कांहीं हें ठरलं अशा निश्चितपणानं आनंदांतच शेजारी निघून गेला.

एक दिवस संध्याकाळीं आपट्याच्या खोलीला कुलूप दिसून आलं! सुटी सरतां सरतां आपटे परत आला. शेजारी म्हणाला—

"हें हो काय आपटे?"

आपटे शरमेच्या स्वरानं म्हणाला—

" अचानक जावं लागलं. आय ॲम् सॉरी.

शेजारी हातबुद्ध होऊन स्वस्थ राहिला. आपल्याकडे येणाऱ्यांना तो नंतर म्हणाला—" मास्तरचा धंदा तोंड वाजवण्याचा. हा शाळेंत काय करीत असेल कुणास ठाऊक!"

आपटे शाळेंत काय करीत असेल हा खरोखरी विचार करण्यासारखाच प्रश्न होता. वर्गांत बोलल्याशिवाय गत्यंतरच

 नाहीं म्हणूनच तो बोलत असला पाहिजे आणि तरीहि

शेजारच्या वर्गांतील मास्तर सांगायचें कीं आपल्याच्या वर्गांत त्याच्यापेक्षां मुलां-मुलींच्या बोलण्याचा आवाजच अधिकच ऐकूं येतो.

सुटीच्या वेळेला किंवा कॉमनरूम मीटिंग असली म्हणजे आपटेसारखा शांत व सहनशील श्रोता दुसरा सांपडणें अशक्यच, असं सर्वांचं एकमत झालं होतं. कॉमन-रूममध्यें असूनहि स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव उमटूं न देण्याची आपटेची अबोल पद्धति आतां सर्वांच्या परिचयाची झाली होती. शाळेतल्या बाका–खुर्च्यांच्या निर्जीव पसाऱ्यांतील आणखी एक वस्तु अशी बहुतेकांनीं आपटे-विषयीं आपली भावना करून घेतली होती. एका मानस-शास्त्री शिक्षकानं आपटेच्या अबोल, एकाकी जीवनाची विदग्ध मीमांसा कॉमनरूममध्यें केली होती. परंतु या सर्व चर्चा-प्रसंगांत आपटेविषयीं उपहासाची किंवा तिरस्काराची छटा नव्हती हें लक्षांत घेण्याजोगं होतं.

खरं म्हणजे आपटेविषयीं निश्चित् मत बनवणं जरा कठीण झालं होतं. त्यानं कधीं कोणापाशीं याचना केली नाहीं कीं असा कधीं प्रसंग उत्पन्न केला नाहीं, कीं ज्यामुळें त्याची दया वाटावी. तो अहंमन्य नव्हता. कारण त्याच्या अबोल शालीनतेविषयीं कोणाला संशय नव्हता. त्याच्याविषयीं तिरस्कार करणंहि शक्य नव्हतं. लोकांना नवल वाटे त्याचं कारण हें गूढ.

आपटेच्या दृष्टीनं विचार केला म्हणजे त्याला, (मानस-शास्त्राच्या शब्दांत) समुदायभीति वाटत असो किंवा नसो, एक गोष्ट खरी कीं, बारा-तेरा वर्षांच्या मुलां मुलींचे वर्ग सांभा-ळायचे असूनहि आपटे बरेच वेळां बावरून जात असे. विशेषतः तिसरीच्या वर्गांत एक सौदामिनी नांवाची मुलगी होती तिला कसें सांभाळावं हें त्याला कळेचना.

ही सौदामिनी मोठी गोड छोकरी होती. वर्ण सांवळाच होता. पण मुखावर अतिशय तेज होतें. बारीक सरळ नाक, लहानशी जिवणी आणि मोठे काळेभोर तेजस्वी डोळे यांनीं ती सर्व वर्गांत उमटून दिसायची. ती दोन शेपट्यांची वेणी घालीत असे. तिचा परकर व ब्लाउज नेहमीं एकरंगी असे. सौदामिनी मोठी अवखळ होती. कित्येक वेळां मिस्किलसुद्धां असावी असें वाटे. बोलतांना माना वेळवायची व मुरकायची तिला संवय होती. ती हें मुद्दाम करते असं वाटलं असतं, परंतु तिचं वय आणि मुखावरचा निरागस भाव पाहिले म्हणजे ही शंका दूर होई.

या गोष्टींनीं आपट्याला बावरण्याचें कांहींच कारण नव्हतें. झाला तर त्याच्यावर अनुकूलच परिणाम व्हावा. परंतु तिची एक संवय अशी होती कीं, वर्ग चालू असतांनाही भान न राहून तिच्या मुखांतून एकदम गाण्याची लकेर बाहेर पडे! दुसऱ्या शिक्षकांनीं तिची ही संवय घालविण्यासाठीं तिला वेगवेगळ्या शिक्षासुद्धां केल्या होत्या. परंतु तिच्या तें ध्यानींच रहात नसे. आपटेला तिला शिक्षा करण्याचा, नुसता रागावून बोलण्याचाहि धीर कधीं झाला नाहीं. शिकवीत असतांना अचानक तिची लकेर बाहेर पडे. सर्व वर्ग हंसू लागे. आपटे तिच्याकडे पाही आणि सौदामिनी, हंसत, मान वेळवीत ओशाळून म्हणे, "माझ्या ध्यानांतच राहत नाहीं. आतां नाहीं, सर!" थोड्या वेळानें शिकवणें पुन्हां सुरू होई. पण पुन्हां असा अडथळा केव्हां होईल याचा नियमच नव्हता.

दुसरी गोष्ट म्हणजे सौदामिनी आपल्या सरांशीं बोलायची ती अंगाशीं लडिवाळपणा करीत. आणि ती काय बोलेल याला नियम नव्हता. तिची ही संवय सुधारण्याचा इतर शिक्षकांनीं फारसा प्रयत्न केला नाहीं! पण आपटे मात्र

 ओशाळत असे. एकदां वर्ग चालू असतांना ती आपटेला

म्हणाली होती, " सर, तुम्ही केस उलटे कां वळवलेत? चांगले नाहीं दिसत. भांगच पाडा, सर!"

आपटे कांहीं बोलला नाहीं. पण एक दिवस उलटे केस वळविण्याची त्याला जी लहर आली होती, ती त्यानं कायमची दाबून टाकली.

एकदां शुद्धलेखन दाखवायला सौदामिनी जवळ गेली असतां अचानक त्याचा टाय् हातांत घेत ती म्हणाली होती,

" सर, काय छान टाय् आहे!"

आणि एकदां त्याच्याविषयीं तिनं आपलं शेवटचं मत सांगून टाकलं होतं—" सर, मला तुम्ही फार आवडता!"

या गोष्टी उघड उघड वर्गांत व्हायच्या. प्रत्येक वेळीं आपटेलाच ओशाळल्यागत होई. आपटे या गोष्टीची वाच्यता करण्याचा संभव कधींच नव्हता आणि त्या चिमुकल्यांच्या वर्गांत असं कांहीं झालं म्हणजे हंशा पिकण्याशिवाय दुसरं कांहीं घडणं अशक्य होतं.

सौदामिनीच्या वागणुकीचा सराव पडल्यानं आपटेला हळूहळू कांहीं वाटेनासं होऊं लागलं. आणि शाळेची पहिली टर्म् जशी संपली तसं आपटेच्या संकोचाचीं आवरणंहि कमी कमी होऊं लागल्याचीं चिन्हं दिसूं लागलीं.

सौदामिनीविषयीं त्याला जिव्हाळा उत्पन्न झाला. पूर्वी संकोचानं आणि आतां सुख वाटतं म्हणून तिच्या वागणुकीचा प्रतिकार त्यानं कधीं केला नाहीं.

पण त्याची वृत्ति तटस्थच होती. म्हणूनच सहामाहीच्या परीक्षेंत आपल्या विषयांत सौदामिनीला सर्वांत जास्त मार्क देण्याचा मोह त्यानं सहजीं टाळला होता.

दुसऱ्या टर्मच्या पहिल्या दिवशीं आपटेनं जेव्हां पेपर वर्गांत वाटून दिले, आणि वर्गाला 'मी दिवाळीची सुटी कशी घालविली' यावर छोटासा निबंध लिहायला सांगितला 

तेव्हां सौदामिनी लिहिण्याच्या ऐवजीं बाहूंत तोंड लपवून हुंदके देत असलेली त्यानं पाहिली; तेव्हां सौदामिनीला कमी मार्क मिळाले आणि तिच्या शेजारी नेहमीं बसणाऱ्या सुशिला रेगेला सर्वांत जास्त मार्क मिळाले, हें त्याचं कारण असावं असाच आपटेनं कयास बांधला.

त्यानं बराच वेळ लक्ष दिलं नाहीं. मात्र त्याला मनांतून फार वाईट वाटलं. सुशिला रेगेचा पेपर सर्वांत चांगला होता यांत शंकाच नाहीं. पण सौदामिनीला इतकं रडतांना पाहून तो व्याकूळ झाला.

धीर करून तो तिच्या बाकाजवळ गेला व त्यानं विचारलं.

"रडायला काय झालं ?"

पण उत्तर द्यावयाच्या ऐवजीं सौदामिनी अधिकच रडूं लागली. आपटेनं सुशिला रेगेकडे पाहिलं. तीहि रडकुंडीला आल्यासारखी दिसत होती !

आपटे दूर झाला व बाकांच्या ओळींमधून फेऱ्या घालूं लागला. वर्गाकडे पहात त्यानं पुकारा केला—

"चला, लवकर लवकर लिहा. तास संपायच्या आंत झालं पाहिजे. तपासून मी मार्क देणार आहें."

सौदामिनीकडे वळलेल्या सर्व माना एकदम आपोआप खालीं वळल्या. आणि हात यांत्रिकपणें लिहूं लागले.

परंतु आपटेला दिसून आलं कीं सर्व जणांचे चेहरे उतरलेले आहेत. जणूं कांहीं सर्व वर्गांत कांहीं अबोल दुःख पसरलं होतं आणि त्याची छटा प्रत्येक चेहऱ्यावर उमटली होती.

आपटेला समजेच ना ! इतका शांतपणें बसलेला वर्ग त्याला प्रथमच दिसत होता ! आपटेची पाठ असली कीं सर्व डोळे सौदामिनीकडे वळत आणि पाठ फिरली कीं पुन्हां एकदम खालीं होत. एकदां आपटेच्या हें ध्यानांत आलं.

 तो अधिकच बुचकळ्यांत पडला.

सौदामिनी कदाचित् वर्गाचीसुद्धां लाडकी असेल. पण म्हणून तिची योग्यता नसतांना, तिला जास्त मार्क द्यायचे कसे? आणि तेवढ्यासाठीं हा एवढा देखावा?

आश्चर्याची गोष्ट असेल, पण आपटे चिडला, रागावला. तो ताडकन् सौदामिनीच्या बाकाजवळ आला आणि त्यानं दरडावून विचारलं—

"निबंध लिहायचं सोडून रडायला काय झालं?"

सौदामिनीनं मानहि वर उचलली नाहीं. पण सुशिला रेगे एकदम दचकलेली त्याला दिसली. त्याच क्षणीं सर्व वर्ग आपल्या रागाच्या अनपेक्षित आविष्कारानं दचकला असं आपटेला वाटलं. पण त्यानं पुन्हा रागानं तोच प्रश्न विचारला.

सुशिला रेगे भीत भीत म्हणाली—

"रागावूं नका, सर! सौदामिनीचे वडील दिवाळींत वारले सर—"

आणि तिलाहि, इतका वेळ दाबून धरलेलं रडं फुटलं! आपटे क्षणार्धांत स्तंभित झाला!

न बोलतां तो वर्गाच्या मागं जाऊन उभा राहिला. सर्वांचे चेहरे खालीं झालेले होते. परंतु प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू तरंगत आहेत असं त्याला वाटलं.

सावकाशपणं तो टेबलाजवळ आला व वर्गाकडे पहात म्हणाला—

"मला माहित नव्हतं. बरं आहे, नका लिहूं निबंध." आपटेच्या लक्षांत आलं कीं आपला स्वर रुद्ध झाला आहे.

जरा वेळानं पहिल्या बाकावरचा बसक्या, नाकाचा गोखले मुलगा म्हणाला—

"सर, आमचं लक्षच लागत नाहीं अभ्यासाकडे आज."

त्यादिवशीं मधल्या सुटींत कॉमनरूममध्यें जाऊन चहा 

घेण्याऐवजीं आपटे पुन्हां वर्गांत आला. दोन तासांच्या अवधी-नंतर सौदामिनी शांत झाली होती. आपटे तिच्याजवळ आला व स्नेहल स्वरांत म्हणाला :—

" मला अगोदरच कां सांगितलं नाहींस तूं ? मला माहित असतं तर मी असा विषय निबंधाला दिलाच नसता. आणि रागावलोंहि नसतों."

त्याच्या अंगाशीं डोकं घुसळल्यासारखं करीत आणि डोळे उचलून अथांगपणं त्याच्याकडे पहात सौदामिनी म्हणाली—

" तुम्ही विचारलंच कुठं, सर ? "

आपटे खिन्नपणें हंसला. जणूं कांहीं तिच्या निरागस भावाला आपण कधीं हुंकारा दिला नाहीं, आपण अगदीं तटस्थपणानंच राहिलों अशी अपराधी जाणिव त्या हंस-ण्यांत होती.

नकळत तिच्या मस्तकावर हात फिरवीत आपटे म्हणाला—

" माझी दिवाळीची सुटीसुद्धां फार वाईट गेली."

आपटेच्या वृत्तींत अलीकडे फरक पडत चालला होता. वास्तविक हा फरक अगदीं सूक्ष्म होता. परंतु आपटे-कडे सर्व कुतूहलानं पहात असल्यानं कोणाच्याहि नज-रेंतून हा फरक सुटला नाहीं. आपटे बोलका झाला होता असं म्हणतां आलं नसतं. कारण ती काव्यमय अतिश-योक्ति झाली असती, परंतु पूर्वी ज्याप्रमाणं आपटे अगदीं तटस्थपणानं बसून अबोल श्रोत्याचं काम करीत असे, तसं आतां न होतां तो अवधानपूर्वक ऐकूं लागला आणि मधून मधून एकादं वाक्य बोलून आपलं मतहि प्रदर्शित करूं लागला.

आपटे गबाळ्यासारखा कधींच रहात नसे. परंतु आतां त्याच्या पोषाखांत लक्षपूर्वक आणलेला नीटनेटकेपणा
 दिसूं लागला. पूर्वींच्या तपकिरी कोटाची जागा आतां एका

निळ्या कोटानं घेतली. आणि या कोटाला उठाव देईल असा एक लाल पट्टे असलेला नेव्ही ब्ल्यू टाय् त्यानं वापरायला सुरवात केली. मूळचे सुरेख असलेले केस तो अधिक काळजीनं विंचरूं लागला.

आपटेच्या देहयष्टींत फरक पडला नव्हता किंबहुना पडण्यासारखा नव्हता. परंतु पूर्वी जो एक अबोल गंभीरपणा आणि आर्तपणा त्याच्या चेहऱ्यावर असे तो आतां मावळला. त्याची मुद्रा जरा प्रसन्न दिसूं लागली. आणि डोळ्यांत समाधानाची छटा प्रकटली.

इतरांना कदाचित् आपटेच्या या बदललेल्या वृत्तींचं कारण कळलं नसतं. पण सौदामिनीमुळं हें घडून आलं होतं याविषयीं शंका नाहीं. आणि एकाद्या चाणाक्ष व्यक्तीला हा अंदाज बांधतां आला असता.

शाळेचं स्नेहसंमेलन नुकतंच झालं होतं. त्यांत सौदामिनीनं एक सुरेखसा नाच केला होता. बारा-तेरा वर्षांच्या या मुलीच्या अप्रतीम कौशल्याचं कौतुक आणि बोलबाला खूप झाला. गोड गळ्याचं सुरेल गायन, शरिराची अत्यंत मोहक आणि लयबद्ध हालचाल आणि हृदयाला व्याकुळ करील असं भावदर्शन यांचा त्रिवेणीसंगम सौदामिनीच्या त्या प्रात्यक्षिकांत प्रकटला होता. प्रेक्षकांना तर आनंदाचे उमाळे आलेच होते. पण त्याप्रसंगीं एक सिनेमा-दिग्दर्शक हजर होता. त्यानं सौदामिनीला एकदम मागणी केली होती, ही बातमीहि सर्वतोमुखीं झाली होती.

कॉमनरूममध्यें सौदामिनीबद्दल अलिकडे बरंच बोलणं निघे. प्रत्येक वेळीं आपटेचा चेहरा अभिमानानं उजळल्यासारखा दिसे. एकदां असाच विषय निघाला असतां आपटे एकदम म्हणाला —

"तिच्यांत हें पहिल्यापासूनच आहे. वर्गांतसुद्धां कांहीं विचा- 

रायचं असलं तर ती अगदीं लाजत मुरडत अंगाला येऊन बिलगते आणि मग विचारते."

लोक त्यावर हंसले. आपटे प्रथम संकोचला. पण मागून त्यालाहि बरं वाटलं.

त्यादिवशीं तो इतका आनंदांत होता कीं त्या भरांत त्यानं आपल्या 'वत्सल' शेजाऱ्याला आपल्या खोलींत येऊं दिलं आणि त्याच्याशीं 'कर्मण्येवाधिकारस्ते' या श्लोकावर चर्चाहि केली !

आपटेच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना नवल वाटलं. पण मनांतून बरंहि वाटलं.

आपटेच्या शांत वृत्तींत आतां नवीन तरंग उत्पन्न होऊं लागले. सौदामिनी कुठें रहाते, तिच्या घरीं कोण कोण आहे हें माहित करून घ्यावं, त्यांच्याशीं ओळख करावी अशी इच्छा त्याला झाली.

शाळा सुटल्यानंतर, प्रार्थना समाजाच्या कोंपऱ्यावर वळून स्टँडर्स्ट रस्त्यानं सौदामिनी सरळ जाते हें त्यानं अनेक वेळां पाहिलं होतं. एक दिवस त्याला रहावेना. तो गुपचुप तिच्या मागोमाग निघाला. योग्य अंतर मधें राखून सौदामिनीवरची दृष्टि हलूं न देतां तो चालूं लागला. आपल्या एकदोन मैत्रिणींबरोबर मोठ्यानं बोलत, हंसत मुरडत ती चालली होती. ऑपेरा हाऊसच्या नाक्याजवळ आल्यानंतर सौदामिनी एकटी उजव्या हाताला वळली. आपटे न कळत बराच जवळ आला होता. सौदामिनी फ्रेंच पुलाकडे वळली आणि तिनं उजवीकडे सहज नजर टाकली त्यावेळीं तिनं आपल्याला पाहिलं आणि ती हंसली असं त्याला वाटलं. तो दचकला, शरमला. घाईघाईनं त्यानं पावलं वळवलीं आणि तो कोंपऱ्यावरच्या अॅलीज् रेस्टॉरॉंमध्यें शिरला.

सौदामिनी दिसेनाशी झाली होती. परंतु आपटेच्या मनांतली खळबळ कमी झाली नाहीं. आपण कांहींतरी वेड्यासारखं केलं या जाणिवेनं त्याला सुचेनासं झालं. त्याच्या सर्वांगाला घाम फुटला. त्यानं लगेच एक थंड पेय मागवलं. किती तरी वेळ तो तिथंच बसून राहिला.

त्यानंतर आपटे जरा शांत झाला.

बऱ्याच दिवसांनंतर सौदामिनी तास संपल्यावर त्याच्याकडे आली. आणि नेहमींच्या पद्धतीनं लडिवाळपणा करीत म्हणाली—

" सर, आमच्या घरीं आज सत्यनारायण आहे. तुम्ही याल का ? "

आपटेच्या मुखावर स्मित झळकलं. तिच्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला—

" हो, येईन कीं. किती वाजतां येऊं ? "

" अं...रात्रीं ! "

" बरं. बरं. येईन हं. "

सौदामिनी मुरडत दूर झाली. कांहीं आठवल्याप्रमाणं ती पुन्हां वळली आणि हंसत म्हणाली—

" सर, पण आमचं घर ठाऊक आहे का तुम्हांला ? "

आपटे हंसून म्हणाला—

" अं...नाहीं ! पत्ता सांगून ठेव. "

" फ्रेंच पुलावर शांतिनिवास आहे. तिथं पहिल्या मजल्यावर. "

" बरं...मी काढीन शोधून. "

" सर, या हं पण नक्की—"

मान कलती करीत सौदामिनीनं शेवटचं वाक्य उच्चारलं आणि ती वर्गाकडे पळाली.

या आमंत्रणानं आपटे पुन्हां उल्हसित झाला. संध्याकाळ केव्हां होते असं त्याला झालं. व्यवस्थित पोशाख करून 

तो घरून निघाला. अंतर कांहीं फार नव्हतं. आणि आपण फार लवकर चाललों आहोंत असं त्याला वाटलं. तो कोंपऱ्यावरच्या रेस्टॉरॉंमध्यें शिरला. चहाच्या कपाबरोबर वर्तमानपत्र चाळण्यांत त्यानं खूप वेळ घालवला. समोरच्या घड्याळाकडे लक्ष जाऊन त्यांत आठ वाजलेले त्यानं पाहिले. घाईनं तो उठला.

सौदामिनीचं घर सापडायला त्याला मुळींच त्रास पडला नाहीं. इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ उभं असतांनाच वरच्या मजल्यावरचा झगझगीत प्रकाश, आणि ग्रामोफोन. संगीताशी मिसळलेला हास्याचा आणि बोलण्याचा आवाज या गोष्टींनीं आपण बरोबर आलों याविषयीं त्याला शंका राहिली नाहीं.

आपटे दचकतच जिना चढून वर आला. दिवाणखान्यांत त्यानं प्रवेश केला. एका कोंपऱ्यांत मांडलेली पूजा, त्याभोंवतींची आरास, झुंबराचे दिवे, कांचेच्या प्रचंड-अलमाऱ्या, जागजागीं अंथरलेले भारी गालीचे, चांदीच्या उपकरणांतून ठेवलेलं पानसुपारीचं साहित्य, गाद्या, लोड, सोफा सेट्स, खिडक्यांना लावलेले तलम पडदे—या सर्वच गोष्टी लोभस वैभवाची उत्कृष्ट साक्ष देत होत्या.

आपटे थिजून दाराजवळच उभा राहिला. दिवाणखान्यांत फारशीं माणसं नव्हतीं. फक्त ग्रामोफोनच्या भोंवतीं सौदामिनीच्या मैत्रिणी आणि आपटेच्या विद्यार्थीनी, घोळ घालून बसल्या होत्या. आपटेला पहातांच सर्वांनीं ओंठांवर हात दाबले आणि "अय्या, सर!" असं ओरडत त्या आंत पळाल्या.

आपटेला काय करावं हें सुचेना. जरा वेळ तो तसाच उभा राहिला, आणि मग असं राहणंहि वाईट दिसेल

 असं वाटून तो जवळच्या खुर्चीकडे वळला. तेवढ्यांत एक

नोकर आला; त्यानं आपटेला कोण पाहिजे म्हणून विचारलं. उभ्यानंच आपटे म्हणाला—

" मी...सौदामिनीचा मास्तर..."

आपटे घुटमळला. त्याला बसा म्हणून सांगून नोकर निघून गेला. पुन्हां जरा वेळ गेला. दिवाणखान्यांत आपटे एकटाच होता. आंतून बोलण्याचा व हंसण्याचा आवाज त्याच्या कानीं सारखा येत होता. शेवटीं तो खुर्चीवर बसला. तो बसतो न बसतो तोंच एक मध्यमवयीन, सुरेख, नटलेली बाई आली. आपटेकडे पाहून तिनं स्मित केलं. आणि आंत दृष्टी टाकीत ती मोठ्यानं म्हणाली—

" अग, मिनी ! तुझे मास्तर आले आहेत. त्यांना प्रसाद दे पाहूं." आणि आपटेकडे वळून—

" मास्तर, प्रसाद घेतला नाहीं ना तुम्ही ? बसा अं. आतां येईल मिनी. मी जरा कामांत आहें—"

असं म्हणून ती आंत गेली. पुन्हां कांहीं वेळ गेला. मग सौदामिनी तिच्या मैत्रिणीबरोबर बाहेर आली. आपटे तिच्याकडे पहातच राहिला ! ती एक पारव्या रंगाची तलम साडी नेसली होती. केस वेगळ्या पद्धतीनं मस्तकावर बांधले होते. डोक्यांत खूप फुलं माळलीं होतीं. कानांत चमकणाऱ्या कुड्या आणि गळ्यांत मोत्यांचा एक सर होता. सौदामिनी या वेषभूषेंत खूप वेगळी, आणि अत्यंत मोहक दिसत होती. आणि विशेष म्हणजे ती अनपेक्षितपणें मोठी वाटत होती !

सौदामिनी आली. तिनं लाजत, मुरडत आपटेच्या हातावर प्रसाद दिला आणि तशाच धांदलींत ती लाजून आंत पळाली. आणि तिच्या मैत्रिणी लाजत, हंसत, " अय्या सर !" असं ओरडत हातानं ओंठ झांकीत तिच्या पाठोपाठ पळाल्या.

तरी आपटे विस्मितपणें पहातच होता! मग त्याच्या लक्षांत आलं कीं आपलं काम झालं, आपण जायला पाहिजे. तो उठला. तेवढ्यांत मघाचा नोकर पुन्हां आंत आला व त्यानं प्रश्नार्थक मुद्रेनं आपटेकडे पाहिलं. " कांहीं नाहीं. जातों मी " असं पुटपुटत आपटे बाहेर पडला.

रस्त्यावरच्या मोकळ्या हवेवर आल्यावर त्याला बरं वाटलं. पण त्यामुळं तो अधिकच विस्मित झाला.

सौदामिनीच्या बाबतींत आपटेची मनोघटना अशी नव्हती कीं त्याला वरील प्रसंगाचं वाईट वाटावं किंवा राग यावा. सौदामिनीची आई खरंच कामांत असावी. आणि सौदामिनी तर एक पोरगी. लाजण्यांतच तिचा अर्धा जीव गेला. जवळ बसून गप्पागोष्टी कराव्या किंवा औपचारिक आतिथ्य करावं हें तिला कसं समजणार?

सौदामिनी श्रीमंताच्या घरची आहे व त्यामुळं ही बेपर्वाई अनुभवाला आली असं त्याला वाटलं नाहीं. फक्त तिच्याकडे गेल्यावर तिच्याशीं, तिच्या घरच्या माणसांशीं काय बोलायचं, कसं वागायचं याचे त्यानं आपल्या मनाशीं जे बेत योजून ठेवले होते ते अंमलांत आले नाहींत, त्यामुळं त्याची निराशा झाली खरी.

परंतु सौदामिनीच्या वागणुकींत कांहीं फरक आपटेला दिसला नाहीं.

आपटे वर्गांत आला कीं मुलामुलींची कुजबुज चाले, सर्व डोळे सौदामिनीकडे वळत. आणि ती 'आम्ही नाहीं जा' अशा लाजऱ्या आविर्भावांत मुख लपवी, असं आपटेला आढळून आलं. पण हें नेहमीचंच आहे अशा भावनेंत आपटेनं त्याकडे लक्ष दिलं नाहीं. आपटेच्या मनाचं समाधान झालं होतं. तेवढा उल्हास त्याला पुरे होता.

 पण एक दिवस सौदामिनी वर्गांत दिसली नाहीं. असं

करतां करतां आठ दिवस गेले. मग मात्र तो अस्वस्थ झाला. त्यानं वर्गात प्रश्न केला.

सुशिला रेगे हंसत म्हणाली...

" सर, ती आतां यायची नाहीं. "

" म्हणजे ? " आपटेनं आश्चर्यानं विचारलं. " परीक्षा तर अगदीं जवळ आलीय् ! "

" हो सर ! " सुशिला रेगे पुन्हां हंसून म्हणाली, " पण मिनी सिनेमांत गेली, ती कशाला येईल आतां ? तुम्हांला ठाऊक नाहीं, सर ? "

आपटेला खरंच ठाऊक नव्हतं. इतकंच नव्हे तर आतां सांगूनहि त्याला समजेना. वर्गात एकदम संमिश्र किलबिल सुरू झाली. प्रत्येकाच्या बोलण्यांतला ' मिनी ' शब्द तेवढा त्याला ऐकूं येत होता.

सर्व वर्गात खूप आनंदी वातावरण उत्पन्न झालं होतं. वेलीवरच्या फांद्यांवर कळया उठून उभ्या रहाव्या आणि त्यांनीं बोलायला लागावं असा नवलाचा देखावा तयार झाला होता.

आपटे मात्र सुन्नपणं वर्गासमोर उभा होता. पहिल्या-बाकावरचा बसक्या नाकाचा गोखले मुलगा म्हणाला—

" सर, मिनीचा सिनेमा लागला म्हणजे सगळा वर्ग मिळून पहायला जायचं आमचं ठरलंय्. तुम्ही याल ना सर ? तुम्हांला मिनी खुर्चीचा पास देणार आहे ! "

आपल्यासमोर ओसंडणारा आनंद आपटेला दिसत होता. पण त्याला काय बोलावं तें सुचेना !

मात्र जेव्हां तो कॉमनरूममध्यें आला तेव्हां एकादी अशक्य; किंवा कुठल्याहि सृष्टिनियमांनीं असिद्ध अशी घटना घडून यावी म्हणजे जें असीम आश्चर्य वाटतं तशा स्वरानं तो एकदम म्हणाला—

" मिनी सिनेमांत गेली ! "

त्याच्या त्या अचानक आविष्काराचा कोणाला अर्थ कळला नाहीं. सर्व विस्मितपणं त्याच्याकडे पाहूं लागले. तेवढ्यांत मानसशास्त्री म्हणाले—

त्या मुलीकडे पाहिलं म्हणजे हें भविष्य कोणीहि वर्तवलं असतं. बाप दारुड्या, कर्जबाजारी. त्याच्या पश्चात् करायचं कसं? आहे घरची खाण. तेव्हां ती उरकलीच पाहिजे! तुम्हांला ठाऊक नाहीं का? तिचा करार झाल्या-वर सत्यनारायणाचा केवढा थाट उडवून दिला होता तो!"

आपटे कांहीं बोलला नाहीं.

त्यादिवशीं तो घरीं आला तेव्हां त्याला बरं वाटत नव्हतं. रात्रभर झोंप आली नाहीं. अंगही फणफणलं.

अंतर्यामांत खोल, अबोल जखम व्हावी असं त्याला वाटलें. आपल्या शरीराचा एकादा भाग आपल्या डोळ्यां-देखत, भूल न देतां, कापून काढावा अशा वेदना त्याला झाल्या.

जणूं एकादं परकं रोप नव्या भूमीवर लागावं, कांहीं काळ अचानक उमलावं आणि एकाएकीं उमळून पडावं...दोन छोटे मोठे प्रवाह क्षणभर एकमेकांना स्पर्शावेत आणि कल्पना नसतांना विरुद्ध दिशांनीं फुटून जावेत...असे कांहींसे विचार त्याच्या मनांत येऊन गेले.

पण दुसऱ्या दिवशीं तो उठला आणि आपल्या अखंडित नियमाप्रमाणं शाळेच्या वेळेवर निघाला.

चार दोन दिवसांतच आपटेची शारीरिक अवस्था सर्वां-च्या नजरेस आली. आपटेचा वत्सल शेजारी त्याला आस्था-पूर्वक म्हणाला—

"मि. आपटे, तुमची प्रकृति अलीकडे फार खराब झालेली दिसतेय्! अशा वेळींहि तुम्ही आम्हांला कांहीं सांगत नाहीं,

मदत करूं देत नाहीं. म्हणजे कमाल झाली बुवा! निदान रजा काढून विश्रांति तरी घ्या."

ओशाळत आपटे म्हणाला—

" आतां लौकरच रजा पडणार आहे."

पण रजा पडली त्या दिवशीं सर्वच सामानाची बांधाबांध करून आपटेला निघालेला पाहतांच त्याचा शेजारी चकित झाला. आपटे सौम्य स्वरानें म्हणाला—

" इथलं काम संपलं. मी मुंबई सोडून जातोंय्."

हमालाच्या डोक्यावर सामान देऊन जिना उतरतांना आपटेनं सहज वळून पाहिलं. त्याचे सर्व शेजारी जमा झाले होते. कोणी तरी करुण स्वरानं म्हणालं—" प्रकृतीला जपा हं!

भरल्या डोळ्यांनीं हंसण्याचा प्रयत्न करीत आपटे पुट-पुटला—" थँक्यू..."

" रागिणी "
दिवाळी-पुष्प १९४५

## स्वा-क्ष-री

“ मित्रहो, मी आज आपल्यापुढं जें प्रतिपादन करीत आहेत तें आपल्याला नवीन वाटेल. पण वाङ्मयीन दृष्टिकोनाच्या या नव्या मनोभूमिकेचें रहस्य आपण समजून घेतलं पाहिजे. केवळ नवीन आहे म्हणून त्याचा तिटकारा करतां कामा नये, असं कविकुलगुरु कालिदास सांगतो...”

महनीय प्रवक्त्यांनीं, श्रोत्यांनीं खचून भरलेल्या सभागृहांत एकदां चहूंबाजूला दृष्टि फेंकली. असंख्य आतुर डोळे आणि उत्कट चेहरे त्यांना दिसून आले...विजेच्या परावर्तित प्रकाशांत चमकणाऱ्या कांहीं चेहऱ्यांवर त्यांनीं क्षणमात्र नजर स्थिरावली. आणि मग आपल्या चोपून बसविलेल्या केसांवरून उगीचच हात फिरवीत, व्यासपीठाच्या समोर डौलदारपणें झुलणाऱ्या कागदी फुलांच्या तोरणावर डोळे रोखले. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटलें. जणूं कांहीं तोरणांतल्या मधल्या गेंदेदार लाल फुलांतून त्यांच्या स्फूर्तीनें

उचल घेतली अशा आविर्भावांत नजर तेथेंच स्थिर करीत त्यांनीं सुरवात केली—

"या दृष्टिकोणाचा विशेष असा कीं—"

झाडांच्या पानांत वाऱ्याच्या झुळुकीनें जशी क्षणभर सळसळ, अशांतता होते तशी सभागृहांत, विशेषतः खुर्च्यांच्या पहिल्या एकदोन रांगांत झाली. कुजबुजीनें महनीय प्रवक्त्यांचं लक्ष गेंदेदार फुलापासून चळलं. त्यांनीं समोर पाहिलं. आणि मग श्रोत्यांच्या दृष्टीचा अनुरोध घेत आपल्या डाव्या हाताच्या दरवाजाकडे दृष्टि वळवली.

उत्सवसमितीचे चिटणीस एका वृद्ध गृहस्थाला घेऊन आंत प्रवेश करीत होते. ती व्यक्ति वृद्धपणाशीं विसंगत अशा त्वरीत गतीनं आंत आली. पहिल्या रांगेंतले एकदोन श्रोते आपणहून उठले. ती व्यक्ति त्यांतल्या एका खुर्चीवर महनीय प्रवक्त्यांच्या समोरच बसली. कुजबुज हळुहळू ओसरूं लागली.

महनीय प्रवक्त्यांनीं डोळे बारीक करून त्या वृद्ध व्यक्तीकडे पाहिलं. असं करतांना त्यांच्या डोळ्यांभोंवतीं सूक्ष्म सुरकुत्या प्रकट झाल्या.

त्याच वेळीं सभागृहाच्या शेवटीं किंचित् गलका झाला.

उजव्या हातानं शांत राहण्याची खूण करीत महनीय प्रवक्ते स्मित करून म्हणाले—

"मित्रहो, तुमच्या अधीरपणाची मला पूर्ण कल्पना येऊं शकते. पण या स्वल्पविरामाबद्दल मला क्षमा केली पाहिजे. आतांच माझ्यासमोर येऊन बसलेले वृद्ध गृहस्थ—माननीय अण्णासाहेब–एक थोर साहित्यिक होते याची तुमच्यापैकीं पुष्कळांना माहिती असली पाहिजे. मराठी साहित्याच्या क्षेत्रांत बुद्धिमत्तेचा प्रकाश आणून कला ही केवळ निर्बुद्ध करमणूक नव्हे असं त्यांनीं आपल्या लेखणीनं दाखवून दिलं होतं. हल्लीं ते लिहीत नाहींत. लिहिण्यासारखं 

जवळ नाहीं असं ते म्हणतात. तें कसंहि असो, त्यांनीं एका काळीं वाहिलेली धुरा आम्ही चालवीत आहोंत. आजच्या माझ्या व्याख्यानप्रसंगीं ते उपस्थित होऊं शकले ही फार आनंदाची गोष्ट आहे. त्यांना अभिवादन करून आणि या विषयांतराबद्दल आपली पुनश्च क्षमा मागून मी प्रतिपादन चालू करतों..."

महनीय प्रवक्त्यांनीं अण्णासाहेबांना स्मितपूर्वक अभिवादन केलं. पहिल्या एकदोन रांगांतल्या कांहीं श्रोत्यांनीं टाळ्या वाजविल्या. जरा वेळानं सभागृहाच्या मागें त्याचा प्रतिध्वनि उमटला...नंतर शांतता झाली आणि व्याख्यान सुरूं झालं—

● ●

क्षणभर काय झालं हें अण्णासाहेबांच्या ध्यानीं आलं नाहीं. ध्यानीं येतांच त्या अकल्पित स्वगौरवानं ते किंचित् बावरले, लाजले...त्यांनीं पापण्यांच्या आडून शेजारच्या दोन्ही बाजूंना चोरटी दृष्टि फेंकली. पण त्यांना आढळून आलं कीं त्यांच्याकडं कोणी पाहात नव्हतं...मागं वळून पाहाण्याचा त्यांना धीर झाला नाहीं. पण झाल्या तेवढ्याच जाणिवेनं त्यांना बरं वाटलं...आणि इतरांप्रमाणं त्यांनींहि समोर, वर नजर केली...

महनीय प्रवक्ते शांत, संथ, मधुर आवाजांत आपला विषय प्रतिपादित होते. ध्वनिवर्धक यंत्राशीं काटकोन करून ते उभे होते. आणि त्यांची दृष्टि अधांतरीं अंतराळांत किंवा तोरणांतल्या गेंदेदार फुलांकडे होती. आढ्यावरून सोडलेला विजेचा दिवा त्यांच्यासमोर किंचित् वर आलेला होता. आणि त्याचा संपूर्ण झोत त्यांच्या मुखावर नी आकृतीवर पडला होता.

अण्णासाहेबांचं लक्ष त्यांच्याकडे गेलं......त्यांच्या मनांत विचार आले—

 '...याचं वय पस्तीस.. नाहीं चाळीस आहे...पण हा

दिसतो त्या मानानं तरुण, नाहीं? चेहरा अगदीं गुळगुळीत आहे. केंस काय चापूनचोपून व्यवस्थितपणानं बसविले आहेत! मग मधूनच केंसावरून हात फिरवायची काय जरूर आहे?...नाहीं, पद्धत असली पाहिजे अशी... आणि ही मधूनच मान किंचित् कलती करण्याची सुद्धां पद्धत असली पाहिजे. आपल्याला कांहीं ठाऊक नाहीं...

'...कितीतरी...कित्येक...वर्षांपूर्वी आपण असेच साहित्योत्सवाचे अध्यक्ष होतों. त्या वेळीं असा झगझगाट-अशी व्यवस्था नव्हती. नाहीं, पण...त्या वेळीं या गोष्टी नसतीलच. आपल्याला आतां कांहीं आठवत नाहीं. पण एक मात्र आठवतं. रात्रीं आपण गाडीनं उशीरां येऊन पोंचलों ...नंतर झोंप घ्यायची सोडून गप्पा मारीत बसलों आणि मग सकाळीं धांदल झाली...खरंच, आपलं अध्यक्षीय भाषण सकाळला झालं, नाहीं का? म्हणूनच दिवे-बिवे... पण त्या धांदलींत दाढी करायलाही पुरेसा वेळ मिळाला नाहीं... कशीबशी खरडून धांवपळ करीत आपण सभास्थानीं आलों...

'...छे...असा व्यवस्थितपणा जमला नाहीं आपल्याला... आतां या पोषाखाचंच पहा ना...इंग्रजी पद्धतीच्या पोषाखांत माणूस कसं नेटकं, सुटसुटीत दिसतं!...पण यानं पिवळ्या रंगाची कोट-पाटलोन नको होती घालायला...काळी सुरेख दिसली असती...पण आपल्याला कुठं कळतं यांतलं?... त्यांनाच बरोबर पद्धत माहित असली पाहिजे...पण एक मात्र बरं आहे गड्या...नेकटाय् नाहीं...बोलतांना उगीचच बांधून ठेवल्यासारखं होतं...ही उघड्या गळ्याची कॉलर सुरेख आहे...आणि कोटावर येऊन ती डौलांत बसलीहि आहे! ...पण त्यामुळं गळ्याचीं हाडं मात्र दिसतात...नाहीं तरी हा फारच सडपातळ आहे...त्यांत ठेंगणा...पण तरी कसा कॉलेजांतल्या पोरासारखा दिसतो, नाहीं?

' ...अन् आपण...गबाळच म्हणायचे, नाहींतर काय ? ...हा असाच पांढरा फेटा कसातरी घाईत गुंडाळला होता... बोलतां बोलतां त्याचा पुढचा पदर सुटून तोंडावर आला होता. तसेंच तें शेंपूट आपण कोंबून दिलं होतं !...आणि हा असाच लांब डगलेवजा कोट आपण घातला होता . नाहीं, घोंगडीचा कोट होता...दुसरा पांढरा कोट प्रवासांत आणि इतर वेळीं घालायला आणि उत्सवासाठीं मुद्दाम आपण घोंगडीचा कोट घेतला होता...वा ! हीं तरुण माणसं फारच व्यवस्थित असतात !...आपण वृद्ध म्हणून मानतात...नाहीं तर खरा नीटनेटकेपणा...'

—सभागृहांत एकदम टाळ्यांचा कडकडाट झाला. अण्णासाहेब दचकून भानावर आले... त्यांना बावरल्यासारखं झालं... नकळत खुर्चीत अर्धवट उठल्यासारखं करीत त्यांनीं आजूबाजूला आणि झटकन् मागं पाहिलं...सर्वांचे डोळे व्यासपीठाकडेच होते—

'...आपल्याला वाटलं...आपल्यालाच टाळ्या...' अण्णासाहेबांच्या मनांत विचार आले—' याच्या भाषणाला पडल्या या टाळ्या...काय बरं म्हणाला हा...?... छान ! आपलं लक्षच होतं कुठं भाषणाकडे ? आपल्याच नादांत गुंतलों होतों वाटतं आपण...?...नाहीं, ऐकूं द्या...काय म्हणतो हा... एवढ्या टाळ्या...'

—अण्णासाहेब खुर्चीत नीट बसले आणि ऐकूं लागले. तसं कांहीं त्यांना नीट समजेना म्हणून त्यांनीं पायांतला जोडा काढून पाय वर घेतले...मांडी घातली...गळ्यासभोवतालच्या उपरण्याचा एक वेढा कमी केला. खुर्चीच्या हातावर कोपर टेकलं...आणि त्या तळहातावर गाल रेलून ते ऐकूं लागले.

महनीय प्रवक्ते सांगत होते—

● ●

" आपण असं लक्षांत घ्या आतां कीं, ज्या क्रांती-विषयीं मी आपल्यासमोर बोलत आहे ती प्रचंड युद्धाच्या रणधुमाळींतच प्रकट होते असं नव्हे. जीवनाच्या शाखोपशाखांतून, कणाकणांतून हे तेजस्वी स्फुलिंग प्रकट होतात !... हें माझ्यासमोरचं फूल पहा --" त्यांनीं तोरणाकडे डौलदारपणें हात केला —" हें गेंदेदार लाल पुष्प—हेंहि एक प्रकारच्या क्रांतीचं प्रतीक आहे !..."

त्यांनीं महनीय प्रवक्त्यांकडे पुन्हां पाहिलं, त्यांच्या मुखावर हास्य मात्र होतं...अण्णासाहेबांच्या मनांत आलं—

'याचे गाल जरा खोल गेले आहेत...पण हंसण्यानं याचा चेहरा उजळ दिसतो...याचा आवाज मधुर आहे... कां मधुर वाटतो ? आपला आवाज मात्र घोगरा आहे... त्या वेळीं कसा होता ?...'

—अण्णासाहेबांनीं जरा खोकून पाहिलं...आणि मग त्यांच्या लक्षांत येतांच अपराधीपणानं त्यांनीं झटकन् आजूबाजूला पाहिलं. आपल्या खोकण्यानं व्यत्यय आला नाहीं, कोणाचं लक्ष नाहीं, हें पाहून त्यांना बरं वाटलं !...त्यांनीं भाषणाकडे पुन्हा लक्ष वळवलं...पण ते पुन्हां स्वतःच्या विचारांत गर्क झालं—

'...हा क्रांति वगैरे कांहीं सांगतो...आपलं पहिल्यापासून लक्ष नव्हतं, नाहीं तर आपल्यालाहि समजलं असतं...बाकी हा पहिल्यापासून जरा बंडच आहे...आपण अध्यक्ष होतों तेव्हां नाहीं का ?...सभागृहांत हा काय ऐटबाज बेफिकिरीनं येऊन बसला होता ! सुरेख पोषाख...धोतराचा सोगा मुद्दामच कोटाच्या खिशांत कोंबलेला...आणि बरोबर...हो, एक मुलगी होती...सुरेख...गोलगोल नेसलेली...सैल अंबाडा 

आणि एक गुलाबाचं फूल...असंच लाल होतं...नाहीं का ? सभागृहांत क्षणभर खूप कुजबूज झाली होती...आपल्याला कांहीं वेळ भाषण वाचतांना थांबावं लागलं होतं!...आपण काय बरं बोललों होतों त्या वेळीं...हं...सच्छील वाङ्मय... सारस्वताचं पावित्र्य!...कांहीं तरीच...आंघोळ करून मुकटा नेसल्यासारखं!...लोकांना आतां आवडायचं नाहीं...क्रांति ...छान आहे, नाहीं ? असं पाहिजे...'

—पुन्हां टाळ्यांचा कडकडाट झाला आणि अण्णासाहेब भानावर आले...त्या अखंडित घोषानं त्यांच्या लक्षांत आलं कीं, भाषण संपलं!...त्यांना कांहीं कळलं नाहीं तें...पण तो फार चांगलं बोलला असं त्यांना वाटलं...आणि त्यांनीं कौतुकानं त्याच्याकडे पाहिलं...

महनीय प्रवक्ते व्यासपीठावरून खालीं उतरत होते... त्यांनीं हंसून अण्णासाहेबांकडे पाहिलं...अण्णासाहेबांनीं जागींच चुळबुळ केली आणि बसायला जागा करण्यासाठीं घाईघाईनं आजूबाजूला पाहिलं...

पण अण्णासाहेबांना काळजी करावी लागली नाहीं. सर्वच श्रोते जागचे उठले होते...महनीय प्रवक्त्यांच्या भोंवती प्रचंड कडाळं पडलं होतं...

त्यांची वाट पहात अण्णासाहेब जागींच मांडी घालून बसून राहिले.

पण गर्दी मोडूनहि ती कमी होण्याचं लक्षण दिसेना... उलट हळूहळू सरकत तें कडाळं पलीकडच्या खिडकीजवळ गेलं होतं...आणि महनीय प्रवक्ते दिसेनासे झाले होते... अण्णासाहेबांच्या आसपास कोणी नव्हतं...

त्यांना समजेना...कौतुकानं शाबासकी देण्यासाठीं ते थांबले होते...पण त्यांची सुटका होण्याचं लक्षणच दिसेना...
 जो तो तिकडे धांवत होता...अण्णासाहेबांनीं एकाला थांबवून

विचारण्याचा यत्न केला, पण त्याचं घाईघाईतलं पुटपुटणं त्यांना कळलं नाहीं...

अण्णासाहेबांच्या आसपास मात्र कोणीच नव्हतं...

क्षणभर त्यांना चमत्कारिक वाटलं...नंतर त्यांनीं डोळे उचलून वर पाहिलं...समोर एक मुलगी चुळबुळत असलेली त्यांना दिसली.

त्यांना काय वाटलं कुणास ठाऊक...ते उठले व त्या मुलीच्याजवळ जाऊन म्हणाले—

"काय हवंय् तुला मुली ?"

ती जरा गोंधळली...बावरली..मग एकदम हंसून म्हणाली—

"मला त्यांचा आटोग्राफ हवाय्...."

तिनं उडाविलेल्या मानेनं आणि नाचवलेल्या डोळ्यांनीं तिचं कुणाशीं काम होतं, हें अण्णासाहेबांच्या लक्षांत आलं. पण तिला काय हवं होतं, हें त्यांना चटकन् उमगलं नाहीं...त्यांनीं पुन्हां विचारलं—

ती हंसली. आणि आपल्या हातांतली नाजूक वही त्यांच्या-पुढं उघडून धरीत म्हणाली—

"मला या वहींत त्यांची स्वाक्षरी-म्हणजे सही हवी आहे, आजोबा !..."

आजोबा शब्दानं ते जरा दचकले...पण लगेच हंसून ते कौतुकानं म्हणाले—

"काय काय आहे या वहींत !"

मान कलती करीत ती म्हणाली—

"यांत किनई साहित्यिकांच्या सह्या अन् त्यांचे संदेश आहेत. मीं सर्व साहित्यिकांकडून मिळविले आहेत .."

तिच्या धीट, गोड, साभिमान भाषणाचं त्यांना फार कौतुक वाटलं. आणि नकळत त्यांचा हात वरच्या खिशां-तल्या पेन्सिलीकडे गेला—

पण त्याच क्षणीं ती अधीरपणानं म्हणाली—

" गर्दी तरी काय आहे बाई ! अशानं जातीलसुद्धां हे !" आणि चटदिशीं ती वही मिटीत दरवाजाकडे वळलेल्या कडाळ्याकडे धांवली—

अण्णासाहेब स्तिमित होऊन पहातच राहिले...त्यांना समजेना...

सभागृह रिकामं झाल्याचं मात्र त्यांच्या जरा वेळानं लक्षांत आलं...

ते स्वतःशीं कांहीं पुटपुटले. अनंत खिन्न विचार त्यांच्या मनांत आले...त्यांचा चेहरा शरमेनं उतरला...

रिकाम्या सभागृहाकडे एकवार पाहून ते तुरुतुरू बाहेर पडले—

दाराजवळ एक छोटा मुलगा त्यांचा कोट धरून ओढीत असलेला त्यांना दिसला...अण्णासाहेबांचं लक्ष जातांच तो एक कागदाचं चिटोरं त्यांच्यापुढं करीत म्हणाला—

" सही पाहिजे मला—"

त्यांनीं खालीं वांकून त्याच्याकडे पाहिलं...न कळत त्यांचा हात खिशाकडे गेला...

पण दुसऱ्याच क्षणीं झटका बसल्यासारखे ते ताठ झाले आणि अपराधीपणानं पुटपुटले—

" मी नाहीं..."

त्या मुलानं गोंधळून त्यांच्याकडे पाहिलं...त्याच्या मुद्रेवरील भाव पाहून त्यांना वाईट वाटलं--

समोर लॉबीमध्यें अजून गर्दी रेंगाळत होती...अण्णासाहेबांनीं त्या मुलाचा हात धरला आणि त्याला मृदु स्वरांत म्हटलं—

" ही गर्दी आहे ना ?... इथं आहेत ते—"

 तो मुलगा तिथं धांवला... पण आपल्यासमोर प्रचंड पाठी

पाहून तो दबकला . त्यानं केविलवाणेपणानं वळून अण्णासाहेबांकडे पाहिलं—

"हं, तिथंच घूस आंत..."

त्या मुलानं पाहिलं...पाहिलं...अन् समोरच्या दोन पायांमधून तो आंत घुसला!...

अण्णासाहेबांना हंसूं आलं!

'यशवंत'
दसरा–अंक १९४५

## अंधार-उजेड

दगडू संध्याकाळीं जरा उशिरांच परतला. घराचं किल-किलं दार त्यानं हलक्या हातानं उघडलं.

आंतल्या अंधारांत त्यानं जागींच थांबून कानोसा घेतला. त्याला कांहीं ऐकूं आलं नाहीं...

भेदरल्यागत होऊन त्या वीतभर जागेच्या चारहि पडक्या टोकांकडे त्यानं नजर फेकली. पण त्याला कांहीं दिसलंहि नाहीं...बाहेरच्या ओघळत्या अंधारांतून तो आंत आला होता. म्हणून घरांतला अंधार त्याला जास्तच दाट वाटला. घरांत उजेडाची अस्पष्ट सांवलीसुद्धां नव्हती. घराच्या भिंतीला त्यानं जीं खिडकीवजा चार-दोन भोकं पाडलीं होतीं तीं हल्लीं चिंध्या, कागद यांनीं भरून टाकलीं होतीं. छपरालासुद्धां जीं भोकं होतीं तीं इथूनतिथून गोळा करून आणलेल्या अशाच मालमसाल्यांनीं सध्यां बुजवून टाकलेलीं होतीं. डोळे मोठे करूनहि त्याला कांहीं दिसलं नाहीं...

 दचकून तो जागींच थबकला. आंत नीरव शांतता

होती. त्याला आपलाच श्वासोच्छ्वास जोरानं होत असलेला ऐकूं आला. त्यानं घाबरून आपला कणखर पंजा आपल्या दगडासारख्या छातीवर रोवला. पण त्याला हृदयाची धडपड समजली नाहीं. उलट, त्याच्या स्पर्शबधिर बोटांना घट्ट, दाट स्नायूंच्या लडी मात्र जाणवल्या...

दगडूनं पुन्हा डोळे मोठे केले...चार पावलं पुढं टाकलीं. आणि जरा पुढं वांकून कानोसा घेतला...

खोलींतला अंधार त्यांच्याशीं अजून बोलूं लागला नव्हता.

त्यानं हळूंच हांक मारली, "रामचंदर–"

त्या नीरव शांततेंत कुजबुजल्यागत उच्चारलेला तो शब्द दगडूला फारच मोठा वाटला. कांहीं चुकलेंसं वाटल्याप्रमाणं तो मनाशीं किंचित् वरमला.

आणि जणूं या जाणिवेनं त्यानं आपलीं पावलं अधिक सावकाशीनं उचललीं. पण त्याच्या राकट, चवड्या पावलांचा खालच्या विषम जमिनीवर फारच मोठ्यानं आवाज होत आहे असं त्याला वाटलं...

आज आपल्याला असं काय होतं आहे हें त्याला कळेना. परवां रात्रीपासून त्याला त्याची कारभारीण म्हणाली होती कीं, 'मला कसलाहि आवाज सहन होत नाहीं.' दगडू तें विसरला नव्हता. साऱ्या हालचाली तो सावकाशीनं, अबोलपणानं, आवाज न करतां करण्याची मनापासून धडपड करीत होता. सकाळीं जेव्हां आपल्याच हातानं केलेला भाकरतुकडा त्यानं पोराला खायला दिला तेव्हां तो त्याला घेऊन दाराबाहेर बसला होता. आपल्याला कळत असलं तरी पोराला कसं कळणार? न जाणो, रामचंद्रा बडबडेल...नाहींतर, आपल्या मजबूत दातांखालीं करांकरां तुकडा चावील. कदाचित् तेवढासुद्धां आवाज कारभारणीला सोसणार नाहीं. दगडूला काळजी वाटत 

होती...म्हणून पोराचं खाणं झाल्यावर त्यानं त्याला दुपारची भाकर जवळ बांधून दिली...तेवढ्यासाठींसुद्धां त्यानं चालण्याचा आणि गाडग्या–मडक्याचा आवाज करायला नको... पोरच तो...त्याला काय कळणार? आणि दगडूनं त्याला सांगून ठेवलं होतं...'दाराजवळ बसून राहा.. ओरडायचं असलं तर लांब जा...पाणी प्यायलासुद्धां समोरच्या विहिरीवर जा...तुझ्या आयला तरास देऊं नको.'

रामचंद्रा या सर्व गोष्टींना समजूतदारपणें कबूल झाला होता...त्या आनंदांत दगडू कामासाठीं बाहेर पडला होता...

आणि आतां आपल्याच श्वासाचा, पावलांचा आवाज होतो आहे हें पाहून त्याला स्वतःचाच राग आला. आज असं काय होतं आहे हें त्याला कळेना...

कारभारणीला जिवापाड जपण्यासाठीं त्याला तळमळ लागून राहिली होती, ती म्हणेल तसं वागण्यासाठीं तो आपल्याकडून आटापीट करीत होता...त्याला वाटलं, कीं आपलं दणकट, राकट शरीर या प्रयत्नांच्या आड येतं आहे. कितीहि सावकाशीनं जपून पावलं टाकलीं तरी त्यांचा धप्‌दिशी आवाज होतो...कितीहि हळूं बोललं तरी नरड्यांतून जाडाभरडा आवाज येतो.. आपण कारभारणीसारखं अंगापिंडानं लहान, कापसासारखे मऊ असतों तर?...

कसला तरी आवाज झाला, असं वाटून त्यानं कानोसा घेतला...अगदीं हळू बांगडीवर बांगडी वाजली होती.. त्याचा बारीक किणकिण आवाज झाला होता.

दगडूचा चेहरा आनंदानं उजळला. त्यानं बरोबर रोखानं डाव्या हाताच्या कोपऱ्याकडे पावलं वळवलीं...अगदीं घाईनं पण हळू. आणि त्यानं शक्य तितक्या हळू आवाजांत हाक

 मारली, "कारभारनी..."

दगडूला अजून कांहीं दिसत नव्हतं. पण तो न चुकतां तिच्या अंथरुणाजवळ येऊन बसला. तिचा मंद श्वास त्याला चांगला स्पष्ट ऐकूं आला. त्यानं पुन्हां हाक मारली...

अर्धवट, अगदीं थकल्यासारखी, जणूं निर्जीव अशी सूक्ष्म हालचाल झाली. बांगडीचा आवाज पुन्हा किणकिणला. दगडू अगदीं बरोबर अंदाजानं तिच्या उशागतीं सरकला...आपला दणकट पंजा त्यानं शक्य तितक्या हळुवारपणानं तिच्या डोक्यावर ठेवला...तो उत्सुकतेनं, अधीरपणानं तिच्याकडे कान लावून बसला...

अगदीं खोल गेलेल्या आवाजांत उसासा टाकून ती पुटपुटली, "कवाशी आल्यात जनु ?"

दगडूची छाती आनंदानं भरून आली. काल रात्रीपासून कारभारीण गुंगून पडली होती...ती बोलली नव्हती. तिला कशाचाहि आवाज सहन होत नव्हता म्हणून तो अबोलपणानं कामासाठीं सकाळीं निघून गेला होता. सबंध दिवस तो बाहेर होता. त्याच्या गैरहजेरींत कारभारीण बोलली कीं नाहीं तें त्याला ठाऊक नव्हतं...बहुधा नसावी. म्हणून त्याला आनंद झाला...शिवाय, तिचा आवाज त्याला फार आवडत असे. त्या आवाजाचं त्याला वर्णन करतां येत नसे. पण कांहीं महिन्यांपूर्वीं बाजाराच्या दिवशीं त्याला अकल्पित चांगली मजुरी मिळाली होती. तेव्हां त्यानं जास्वंदीच्या फुलासारख्या लाल बांगड्या तिच्यासाठीं आणल्या होत्या. त्या बांगड्या जेव्हां तिनं आपल्या नाजूक हातांवर चढवल्या आणि त्याच्याकडे पाहून तोंडावर हात ठेवीत लाजत हास्य केलं, तेव्हां त्या बांगड्यांचा मजेदार आवाज झाला होता...दगडूला एकदम समजलं आणि तो मोठ्यानं हंसून म्हणाला होता, "आतां गावलं कारभारनी ! तुझा आवाज या बांगडीवानी गोड है. हेरलं ना म्यां ?" कारभारीण पुन्हां लाजून 

हंसली होती. पुन्हां बांगड्यांचा आवाज झाला होता...आणि पुन्हां दगडू आनंदून मोठ्यानं हंसला होता...आतांहि बांगडीचा आणि तिच्या बोलण्याचा आवाज झाला होता. दोन्ही अस्पष्ट...खोल गेलेले पण दोन्हीहि सारखे...म्हणून त्याला आनंद झाला.. ...

जरा वांकून त्यानं हर्षभरानं उत्तर दिलं, "ह्यो आतांच आलों नव्हं का?"

ती आणखी कांहींतरी विचारील म्हणून तो उत्कंठेनं थांबला. त्या शांततेंत त्याला तिचा मंद श्वास पुन्हां ऐकूं आला...थोड्या वेळानं अर्धवट, निर्जीव हालचाल जाणवली...

त्यानं वांकून हळूच विचारलं, "कारभारनी, दिवा लावूं का?"

प्रश्न विचारल्याबरोबर त्याच्या मनांत येऊन गेलं... दोन दिवसांपासून आपण घरांत दिवा लावला नव्हता. त्याला माहीत होतं कीं घरांत तेल नव्हतं...तरी कालच्या रात्रीं त्यानं हाच प्रश्न तिला विचारला होता. कारभारणीनं हो म्हटलं असतं तर त्यानं कांहींतरी केलंच असतं...पण तिला जणूं सारं समजत होतं...ती म्हणाली होती कीं उजेड सहन होत नाहीं. दगडूला वाटलं होतं कीं तेल नाहीं हें समजूनच ती असं बोलली, म्हणून आतां तो अधीरपणानं म्हणाला, "कारभारनी, तेल हाये घरांत. म्यां घेऊन आलों हाये..."

पुन्हा सूक्ष्म हालचाल झाली. दगडूला आवडणाऱ्या बांगडीवजा खोल आवाजांत ती पुटपुटली, "लावा होवं तर–"

दगडू आनंदानं उठला...पण धसमुसळेपणानं आपला हात तिच्या डोक्याला लागला हें ध्यानांत येतांच तो

 वरमला...स्वतांवर रागावला. आणि मग हळूच पावलं

टाकीत त्यानं पलीकडच्या कोपऱ्यांतली खापरपणती–न चुकतां–घेतली, तिच्यांत तेल ओतलं, एक चिंधी भिजवली, आणि दिवा लावला...

त्याच्या मनांत होतं, दिवा तिच्याजवळ नेऊन ठेवावा. पण त्याला तिचे शब्द ऐकूं आले, " तकडंच ठिवा."

त्यानं तत्परतेनं कोपऱ्यांतच दिवा ठेवला, व तो हळूच तिच्याजवळ आला. आतां त्याला सारं दिसायला लागलं होतं.

चिरगुटावर निश्चल पडलेल्या कारभारणीकडे दगडूनं पाहिलं. ती मुळांतच अंगापेरानं अगदीं लहान होती–आणि आतां तर ती त्याला एखाद्या लहान मुलीसारखी दिसली. नकळत त्याच्या मनानं तिची स्वतःशीं तुलना केली. त्याच्या मनांत विचार आला कीं, आपल्याला अशी एखादी मुलगी असती तर तीसुद्धां हिच्यापेक्षां मोठी दिसली असती. या कल्पनेची मौज वाटून त्यानं पुन्हां तिच्याकडे पाहिलं. हेलकऱ्याच्या जातीला ती जशी फार लहानगी आणि नाजूक होती तशी ती त्या मानानं उजळहि होती.

दगडूनं हलक्या हातानं तिच्या पायावरचं पांघरूण नीट केलं. तिचा इवलासा तळवा त्याला फार लहान वाटला. पांघरुणानं तो काळजीपूर्वक लपेटतांना त्यानं विचारलं, " कारभारनी, थंडी न्हाइ ना लागत ? "

" आज वाढूळ मोल मिळालं ? " तिनं उलट विचारलं.

दगडूनं तिच्या उघडलेल्या डोळ्यांकडे पाहिलं. ते अगदीं शांत होते. पण त्याला वाटलं कीं, तिचे विलग ओंठ हळूच हंसत आहेत. तो आनंदानं हसला आणि मग आपण केवढा आवाज केला हें उमगतांच तो वरमला. उत्साहभरल्या पण हळू आवाजांत तो सांगूं लागला.

असं नशीब एखाद्याच दिवशीं लागतं खरं. एरव्हीं या 

हंसली होती. पुन्हां बांगड्यांचा आवाज झाला होता...आणि पुन्हां दगडू आनंदून मोठ्यानं हंसला होता...आतांहि बांगडीचा आणि तिच्या बोलण्याचा आवाज झाला होता. दोन्ही अस्पष्ट...खोल गेलेले पण दोन्हीहि सारखे...म्हणून त्याला आनंद झाला.. ...

जरा वांकून त्यानं हर्षभरानं उत्तर दिलं, "ह्यो आतांच आलों नव्हं का?"

तीं आणखी कांहींतरी विचारील म्हणून तो उत्कंठेनं थांबला. त्या शांततेंत त्याला तिचा मंद श्वास पुन्हां ऐकूं आला...थोड्या वेळानं अर्धवट, निर्जीव हालचाल जाणवली...

त्यानं वांकून हळूच विचारलं, "कारभारनी, दिवा लावूं का?"

प्रश्न विचारल्याबरोबर त्याच्या मनांत येऊन गेलं... दोन दिवसांपासून आपण घरांत दिवा लावला नव्हता. त्याला माहीत होतं कीं घरांत तेल नव्हतं...तरी कालच्या रात्रीं त्यानं हाच प्रश्न तिला विचारला होता. कारभारणीनं हो म्हटलं असतं तर त्यानं कांहींतरी केलंच असतं...पण तिला जणूं सारं समजत होतं...ती म्हणाली होती कीं उजेड सहन होत नाहीं. दगडूला वाटलं होतं कीं तेल नाहीं हें समजूनच ती असं बोलली, म्हणून आतां तो अधीरपणानं म्हणाला, "कारभारनी, तेल हाये घरांत. म्यां घेऊन आलों हाये..."

पुन्हा सूक्ष्म हालचाल झाली. दगडूला आवडणाऱ्या बांगडीवजा खोल आवाजांत ती पुटपुटली, "लावा होवं तर–"

दगडू आनंदानं उठला...पण धसमुसळेपणानं आपला हात तिच्या डोक्याला लागला हें ध्यानांत येतांच तो

 वरमला...स्वतांवर रागावला. आणि मग हळूच पावलं

टाकीत त्यानं पलीकडच्या कोपऱ्यांतली खापरपणती–न चुकतां–घेतली, तिच्यांत तेल ओतलं, एक चिंधी भिजवली, आणि दिवा लावला...

त्याच्या मनांत होतं, दिवा तिच्याजवळ नेऊन ठेवावा. पण त्याला तिचे शब्द ऐकूं आले, " तकडंच ठिवा."

त्यानं तत्परतेनं कोपऱ्यांतच दिवा ठेवला, व तो हळूच तिच्याजवळ आला. आतां त्याला सारं दिसायला लागलं होतं.

चिरगुटावर निश्चल पडलेल्या कारभारणीकडे दगडूनं पाहिलं. ती मुळांतच अंगापेरानं अगदीं लहान होती–आणि आतां तर ती त्याला एखाद्या लहान मुलीसारखी दिसली. नकळत त्याच्या मनानं तिची स्वतःशीं तुलना केली. त्याच्या मनांत विचार आला कीं, आपल्याला अशी एखादी मुलगी असती तर तीसुद्धां हिच्यापेक्षां मोठी दिसली असती. या कल्पनेची मौज वाटून त्यानं पुन्हां तिच्याकडे पाहिलं. हेलकऱ्याच्या जातीला ती जशी फार लहानगी आणि नाजूक होती तशी ती त्या मानानं उजळहि होती.

दगडूनं हलक्या हातानं तिच्या पायावरचं पांघरूण नीट केलं. तिचा इवलासा तळवा त्याला फार लहान वाटला. पांघरुणानं तो काळजीपूर्वक लपेटतांना त्यानं विचारलं, " कारभारनी, थंडी न्हाइ ना लागत ? "

" आज वाढूळ मोल मिळालं ? " तिनं उलट विचारलं.

दगडूनं तिच्या उघडलेल्या डोळ्यांकडे पाहिलं. ते अगदीं शांत होते. पण त्याला वाटलं कीं, तिचे विलग ओंठ हळूच हंसत आहेत. तो आनंदानं हसला आणि मग आपण केवढा आवाज केला हें उमगतांच तो वरमला. उत्साहभरल्या पण हळू आवाजांत तो सांगूं लागला.

असं नशीब एखाद्याच दिवशीं लागतं खरं. एरव्हीं या 

दरिद्री गांवांत कमी मोलानं मागूनहि फारशीं ओझीं मिळत नाहींत. बाजारच्या दिवशीं जें काय मिळत असे तेवढंच, नाहीं का ? बाकी, सांजेच्या वेळेपर्यंत ताटकळत बसावं तरी जेमतेम रात्रीच्या भाकरीपुरतं पदरीं पडायचं. पण आज गंमतच झाली ! दगडू सांगत होता, तिसऱ्या प्रहरीं एक गुजराती शेठ उतरला. त्याची बाइल का कुणी होतं, फार आजारी होती. तिला टांग्याचा धक्का सहन व्हायचा नाहीं. तिला अलगत पाठीशीं घेऊन घरीं न्यायचं होतं. आणखी चार-दोन माणसं होतीं त्यांच्याजवळ. सामानहि होतं. त्या शेठच्याभोवतीं सारे लोभ्यासारखे गोळा झाले–दौल्या, करीम... ...शेठनं दगडूकडे पाहिलं आणि बाजूची सारी गर्दी दूर केली. दगडू आनंदानं पुढं झाला आणि म्हणाला, " फुलावानी घेऊन जातों खांद्यावर." नकळत त्याची नजर आपल्या खांद्यांकडे गेली, आणि शेठहि तिकडेच पाहात आहे असं त्याला आढळून आलं. दगडूनं जरा लाजून खालीं पाहिलं. पण त्याची छाती फुगून आली होती. दौल्या, करीम त्याच्यापुढं पोरं दिसत. ते वाचाळ होते. ओझं मथवायचं कसब त्यांना फार चांगलं येत होतं. पण केव्हांतरी असं व्हायचं. एखादं गिऱ्हाईक आपल्या बोजाकडे आणि दगडूकडे पाही आणि मग त्यालाच ठरवून घेई. दगडूची मोलाबद्दल तक्रार नसे. " धनी, कामाकडं पाहा, आन जें बेश असेल तें द्या. म्यां बोलत नाय..." आज असंच झालं. त्या शेठनं त्यालाच काम सांगितलं, इतकंच नव्हे तर ज्या मोठ्या दोन-चार पेट्या जवळ होत्या त्या त्यालाच खेपा करून आणायला सांगितला.

" आन् कारभारनी, " दगडू म्हणाला. किती पैका दिला माहीत हाये ? तीन रुपयं-एक, दोन आन् तीन. "

 पैसे घेतांना दगडूला स्वतःचा विश्वास वाटला नव्हता–

आणि आतां तिला सांगतांनाहि त्याचे डोळे विस्मयानं मोठे झाले होते...कारभारीण प्रयासानं डोळे उघडून त्याच्याकडे पाहात होती. दगडूला वाटलं, तिच्या ओठांभोवतीं मघासारखं हंसूं खेळत आहे...

आनंदून तो म्हणाला, "कारभारनी, आन् सकाळपून लइ नशीब लागलं व्हतं. चार रुपये कमावलं हाये आज..."

तिनं त्याच्याकडे पाहिलं. तिच्या शांत डोळयांत विचाराची छाया क्षणभर डोकावली. एकेक शब्द जुळवीत ती म्हणाली, "भाकर खाल्ली का?"

दगडू मनापासून हंसली. सकाळीं भाकर करून त्यानं रामचंद्राला न्याहारी दिली. दुपारची भाकर ठेवून दिली, आणि स्वतःसाठीं बांधून घेतली होती. पण आज इतकीं ओझीं लागलीं कीं त्याला वेळच मिळाला नाहीं मग तो विसरून गेला, आणि पुन्हां जेव्हां त्याला आठवण झाली तेव्हां त्याच्या मनांत आलं : गेल्या कितीतरी दिवसांत कारभारणीनं कांहीं खाल्लं नाहीं. आज सकाळीं ती शांत झोंपली होती. रात्रीं तिला खायची इच्छा होईल–व्हावी. मग गरमगरम भाकरी करून तिला घालतां येईल. हें त्याला इतकं खरं वाटलं होतं कीं, त्या भरांत त्यानें आपल्याजवळची भाकरी रस्त्यावरच्या भिकाऱ्यांना तुकडा तुकडा करून वाटली होती. आज तो खरंच आनंदांत होता...

"कारभारनी," त्याच आनंदी विचारांत तो म्हणाला, "म्या नाय खाल्ली भाकर. तुला होवी का? म्या गरमगरम करतों. आपुन. संगं खाऊं. ?..."

त्याला वाटलं कारभारीण आपल्याकडे पाहून हंसते आहे. तो उत्सुकतेनें तिच्याकडे लक्षपूर्वक पाहत राहिला. ती म्हणाली, "मला नग–तुम्ही खावा. आज लइ काम झालं... मला पानी द्यावा."

दगडूला एकदम आठवण झाली. आज त्याला काय झालं होतं कोण जाणे, तो सारखा एकेक गोष्ट विसरतच होता. त्याला पुन्हा स्वतःचा राग आला. पण त्याला कारभारणीला चकित करायचं होतं. तो उत्साहानं तिच्याजवळ वाकला आणि म्हणाला, " कारभारनी, चा व्होवा का ? "

दगडूची कल्पना बरोबर होती. तिच्या मलूल चेहऱ्यावर चहाचं नांव काढल्यावर आश्चर्य उमटलं. तिचा मुळींच विश्वास बसणार नाहीं याची जाणीव असल्यानं दगडू आपल्या गुपिताच्या आनंदांत भराभर बोलूं लागला, " आज लइ पैका मिळाला नव्हं का ? म्हून म्या वान्याच्या दुकानांतून चा आनला, साकरबी आनली...तुझ्यासाटीं करूं चा ? "

आतां ती खरंच मंदपणं हंसली आणि म्हणाली, "आदुगर पानी द्या. "

दगडू आनंदानं ताडकन् उठला. त्याच्या हाताचा तिला पुन्हां धक्का लागला. अपराधीपणानं त्यानं तिच्याकडे पाहिलं; पण तिनं डोळे मिटून घेतले होते. दगडू हळूच उठला आणि गाडगं घेऊन हलक्या पावलांनीं बाहेर विहिरीकडे वळला...

चहा करण्याचा विचार मनांत आल्यापासून त्याला घरांत दूध नसल्याची जाणीव झाली होती. पण आज कांहीं चिंता नव्हती. एक आणा देऊन रामचंद्राला पलीकडच्या आळींतल्या सखूबाईकडे पाठवलं कीं काम झालं. कितीतरी दिवसांनीं चहा करायचा-आणि तो रामचंद्राचा हट्ट पुरविण्यासाठीं नव्हे तर कारभारणीसाठीं मुद्दाम-मग दुधाशिवाय थोडाच करतां येईल आज ?

या सुखद विचारांतच विहिरीकडे जातांना पोराची आठवण होऊन तो रामचंद्राला धुंडूं लागला. त्याला काळजी वाटली नाहीं. कारण रामचंद्रा त्याच्या आईसारखाच इवलासा,

 देखणा होता आणि भारी समंजस होता. कधीं कांहीं मागा-

यचा नाहीं, सांगितलेलं बरोबर ऐकायचा, करायचा. एखादेच वेळीं हट्ट करायचा—पण तें साहाजिकच नाहीं का ? पोरच तो ! आतां कालपासून त्यानं जिलबीसाठीं हट्ट चालवला होता, पण दगडूनं त्याला येत्या बाजारीं जिलबी देण्याचं आश्वासन दिल्यानंतर त्यानं पुन्हां कांहीं म्हटलं नाहीं. आपण सांगितल्याप्रमाणं, घरांत जाऊन उगीच गडबड न करतां आसपासच मुकाट्यानं बसला असेल तो कुठंतरी अशी दगडूला खात्री होती. म्हणूनच त्याला काळजी वाटली नाहीं.

त्याला रामचंद्रा दिसला नाहीं, पण अगोदर कारभारणीला प्यायला पाणी द्यावं आणि मग त्याला धुंडावं असा विचार करून दगडू विहिरीवर आला. आणि पाहतो तों विहिरीच्या कट्ट्याला लागून रामचंद्रा शांतपणें झोंपी गेलेला.

दगडू स्वतःशींच हसला. त्यानं रामचंद्राला हळूंच उठवलं, शेंदून पाणी काढलं, आणि झोपेंतून एकदम उठल्यामुळं अंधारांत नीट चालतां येणार नाहीं म्हणून एका हातानं रामचंद्राला उचलून घेतलं, आणि आणि दुसऱ्या हातांत पाण्याचं गाडगं येऊन तो सावकाश मजेंत चालूं लागला. दगडू आज आनंदांत होता...

उंबरठ्यापाशीं त्यानं रामचंद्राला उतरवून ठेवलं, आणि तो आंत गेला.

कारभारीण डोळे मिटून पुन्हा शांत पडली होती. दगडूनं जवळ बसून तिच्या कपाळावर हात ठेवला. तिनं डोळे उघडले.

“ कारभारनी, पानी आनलं हाये— ” त्यानं वाकून हळूच म्हटलं. तिनं न बोलतां आ केला. दगडूनं गाडगं तिच्या तोंडाला लावलं. पण त्यांतून एकदम पाणी बाहेर पडलं, 

आणि तें तिच्या तोंडांत, नाकांत, चेहऱ्यावर आणि गळ्या-भोवतीं पसरलं-ती घाबरल्यासारखी होऊन एकदम शहारली...

दगडू दचकला-अकल्पित भीतीनं ताडकन् उठला. एक क्षण त्याला कांहींच सुचेना...

पण तिनं जरा वेळानं डोळे उघडले-दगडूची भीति ओसरली, पण त्याचबरोबर त्याला स्वतःचा अनिवार राग आला.

तिच्या ओठांची हालचाल त्याला दिसली...म्हणून तो अपराधीपणानं खालीं वाकला. तिनं थांबत थांबत त्याला सांगितलं कीं गाडग्यानं पाणी पाजलं म्हणजे असंच सांडतं. झाकणानं पाजलं पाहिजे...

खरंच, असंच नव्हता का दगडू पाणी पाजीत ?...कसा विसरला तो ?...झालंय तरी काय त्याला आज ?...त्याला पुन्हां स्वतःचा राग आला. पण तिच्या ओठांभोंवती हंसूं पाहून तो न बोलतां उठला व खापर आणून तिला पाणी पाजूं लागला.

ती चांगलं दोन खापरा पाणी प्यायली. आणि मग जरा उत्तेजितपणानं म्हणाली, “ आतां आदुगर भाकरी करा. आन् मंग चा करा. ”

क्षणापूर्वींची आपली धांदल विसरून आणि तिचा भाव जाणून तो म्हणाला, “ भाकरी व्हत्याल ग. आदी चा करतों आन दूद बी आनतों-दुदाचा चा करूं या. ” तो आनंदानं हंसला, आणि त्या भरांतच त्यानं मोठ्यानं हांक मारली, “ रामचंदर-”

रामचंद्रा धांवतच आंत आला-दगडूच्या लक्षांत आपली चूक आली. केवढ्यानं तो ओरडला होता. रामचंद्रा दणदण धावत आला. पण पोराला काय कळतं ? दगडूलाच समजायला

 नको का कीं एवढ्या मोठ्यानं ओरडायला नको होतं ? ..

त्याच्या मनांत भराभर विचार येऊन गेले...त्याला स्वतःचा आतां विश्वास वाटेना...

त्याला वाटलं, चहा वगैरे सारं बाहेरच करावं—सकाळसारखा धूर व्हायला नको. धडधड आवाज व्हायला नको. नकोच तें. कारभारणीला त्रास व्हायचा....

" कारभारनी, " अपराधी स्वरानं तो म्हणाला, " भाइरच करतों. म्हणजे तुला तरास व्हनार न्हाइ-"

" भाकरी बी करतां ना ? "

" तूं खाशील ? "

" न्हाइ. तुमांला. तुमी सकालपून खाल्लं न्हाइ ना ? "

" बरं बरं " म्हणून दगडू उठला हाताला धरून त्यानं रामचंद्राला बाहेर नेलं. एक लहान गाडगं आणि एक आणा त्याच्या हातीं देऊन त्यानं त्याला दूध आणायला पाठवलं. मग बाहेर दगड मांडून त्यानं काटक्या गोळा केल्या आणि चूल पेटवली.

त्याचं मन आतां जरा स्थिर झालं. स्वतःच्या धसमुसळेपणाचा त्याला जो राग येत होता तोहि हळुहळू कमी झाला. त्याच्या मनांत पुन्हां आनंद ठिबकूं लागला...

हें-तें आणण्यासाठीं आंतबाहेर करतांना तो अगदीं जपून हालचाल करीत होता, आणि प्रत्येक वेळीं कारभारणीकडे नजर टाकीत होता. ती डोळे मिटून अगदीं निश्चल, शांत पडलेलीं होती,

चहा होणार हें समजल्यापासून रामचंद्रा अगदीं खुषींत आला होता. लगबगीनं जाऊन त्यानं दूध आणलं. आणि आतां चुलीजवळ बसून उगीचच काटक्या आंत सारीत तो तयार होत असलेल्या चहाकडे उत्सुकतेनं पाहत होता, वटवट करीत होता. मधूनच त्यानं विचारलं, " बाबा, मलाबी देशील ना चा ? "

दगडूनं त्याच्याकडे पाहून आनंदानं हास्य केलं आणि म्हटलं, "हा, पन तूं देवावानी बस. तुझ्या आयला तरास व्हतो ना ?"

रामचंद्रा एकदम गप्प झाला. पण जरा वेळानं तो चुळ-बूळ करूं लागला. दगडू चहा-साखर घालून चुलीवर ठेवलेलं पाणी काडीनं ढवळीत होता. त्यानं विचारलं, "काय व्होवं रे ?"

बापानं रागांत विचारलं का कसं तें रामचंद्राला उमगलं नाहीं. पण त्याला राहवलं नाहीं. दबकत तो म्हणाला, "बाबा, माझी आय मरल का रे ?"

दगडूनं दचकून त्याच्याकडे पाहिलं. तो रागावला अशा समजुतीनं रामचंद्रा अधिकच दबकला, आणि जणु कांहीं आपला अपराध नाहीं हें दाखवण्यासाठीं घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला, "मी नाय बाबा–सकूबाय म्हणत व्हती–"

तो दबकून थांबला. पण दगडूनं कांहीं उत्तर केलं नाहीं. त्यानं रामचंद्राकडे पाहिलंहि नाहीं...

एकदम कांहींतरी झाल्याप्रमाणें दगडू गप झाला...पुन्हां कांहीं बोलण्याचा रामचंद्राला धीर झाला नाहीं.

न बोलतां रामचंद्रा आपल्या बापाकडे पाहूं लागला. दगडूनं चहा उतरवून खापरांत ओतला, त्यांत दूध घातलं, आणि बोट बुचकळून तें चाखून पाहिलं. मग दुसऱ्या एका लहान खापरांत त्यानं उरलेला चहा ओतला आणि तें राम-चंद्रापुढं केलं. तरी रामचंद्राचा धीर झाला नाहीं...

पण दगडू जेव्हां उठून आंत जाऊं लावला तेव्हां उंच मान करून त्याच्या गंभीर चेहऱ्याकडे पाहत रामचंद्रा हळूच म्हणाला, "बाबा, मी पेऊं चा ? तुला नग ?..."

दगडूनं न बोलतांच त्याला खुणेनं पी म्हणून सांगितलं, आणि तो हलक्या पावलांनीं कारभारणीजवळ येऊन बसला.

तिच्या मिटलेल्या डोळ्यांकडे, गोऱ्या दिसणाऱ्या मुखाकडे आणि लहान मुलीसारख्या इवल्या शरीराकडे तो आळीपाळीनें पाहूं लागला...कसल्यातरी आशंकेनें तो एकदम वांकला, आणि आपला कान त्यानं तिच्या नाकाजवळ नेला...अतिशय मंद आणि संथ चाललेला तिचा श्वास त्याला ऐकूं आला. त्याच्या धक्क्यानं ती जागी झाली, तिनं डोळे उघडले...

दगडू प्रथम दचकला... पण मग एकाएकीं त्याच्या चेहऱ्यावर आनंद पसरला...तिच्याकडे आणि हातांतल्या खापराकडे पाहत तो म्हणाला, "चा आनलाय्–"

ती किंचित् हंसली, आणि तिनं तोंड उघडलं. मघाचा पाणी पाजण्याचा प्रसंग आठवून दगडू तिला काळजीनं चहा पाजूं लागला. चार-सहा घोट पोटांत गेल्यावर ती चांगली हंसली आणि स्पष्ट आवाजांत म्हणाली, "बेश झालाय्..."

त्या अनपेक्षित उद्गारानं दगडू बावरला, गोंधळला, लाजला, आणि त्याची प्रचंड छाती भरून आली. आनंदानं अडखळत तो म्हणाला,

"साखर घातलीया...आन दूदबी...म्हून ."

पण त्याला पुढं बोलवेना...त्याच्याकडे पहात कारभारीण हंसून म्हणाली, "आतां आदुगर भाकरी करूनशान खा. भूक लागलीया असल–"

दगडू आनंदानं म्हणाला, "हां, करतुंया ना आत्ता. चा व्हेवा आनखी–"

पुन्हा हंसून ती म्हणाली, "नायबा. मस झाला–" आणि ती त्याच्याकडे टक लावून पाहूं लागली.

तिच्या नजरेला नजर भिडतांच दगडूला पुन्हा लाजल्यासारखं झालं. पण त्याच क्षणांत त्याची आशंका, भीति लोपली. चेहऱ्यावरचा गंभीरपणा गेला .. आणि काय बोलावं तें न सुचल्यामुळं तो हंसला...दुसऱ्याच क्षणीं चुकल्यासारखं 

वाटून त्यानं तिच्याकडे पाहिलं...पण तिची नजर शांत आणि निश्चल होती. आणि अजून तिच्या मुखावरचं स्मित गेलं नव्हतं...तें पाहून दगडू मोकळेपणानं हसला.

"तुम्ही आतां खावा...मला झ्वाप येतीया-" ती म्हणाली, आणि तिनं हळूंच डोळे मिटून घेतले...

दगडूनं उठून तिच्या अंगावरचं पांघरूण सारखं केलं, आणि तो हलक्या पावलांनीं बाहेर आला.

त्यानं पाहिलं तर रामचंद्रा तसाच बसून होता. चहाचं खापर त्याच्यापुढं तसं होतं, आणि त्यांत एक बोट बुडवून तो चोखीत होता. दगडूला पाहतांच त्यानं दबकून आपला हात पाठीमागं नेला—

दगडू त्याच्याजवळ आला आणि म्हणाला, "ठंड व्हइल. पेऊन टाक."

रामचंद्रानं दोन्ही हातानं लगेच खापर उचललं आणि तोंडालां लावलं. त्याच्याकडे समाधानानं पाहत दगडू म्हणाला, "रामचंदर, भाकर व्होवी न खाया ?"

बापाचा बदललेला नूर पाहून रामचंद्रानं एका घुटक्यासरशी सारा चहा पिऊन टाकला, आणि खापर खालीं आदळीतच मोठ्यानं म्हटलं, "गरम करतुंया भाकर ? माला आख्खी पाहिजे."

दगडूनं एकदम आपल्या ओंठांवर उभं बोट टेकलं आणि तो म्हणाला, "श्-श् मोठ्यानं बोलूं नग—तुझ्या आयला झ्वाप आलीया."

रामचंद्रा एकदम थांबला. त्याच्या गोंधळलेल्या मुद्रेकडे पाहून आणि पोराला खरंच काय कळतं हा विचार मनांत येऊन दगडूला हंसू आलं. आणि रामचंद्रा अधिकच बावरलेला पाहून तर तो चांगला आठ-दहा सेकंद हंसत राहिला.

 दगडूला आज खरंच आनंद झाला होता....

या आनंदानंच आंत-बाहेर ये-जा करीत त्यानं सैंपाकाची सिद्धता केली. भाकरी केल्या. रामचंद्राला खाऊं घातलं. आपण खाल्लं...आज सकाळपासून त्याच्या पोटांत कांहीं नव्हतं, तो दमला होता, त्याला खूप भूक लागली होती. तरी त्याला फारसं जेवण गेलं नाहीं.

रामचंद्रा आज लगेच पेंगला ..दगडूनं दाराजवळ बाहेर चिरगुटं अंथरलीं, त्यावर रामचंद्राला उचलून ठेवलं, अंगांतलं कुडतं काढून त्याच्या अंगावर घातलं, आणि आपणहि त्याच्याजवळ आडवा झाला.

दगडू मोठ्यानं घोरत असे. परवांपासून कारभारणीला आवाज सहन होईनासा झाला होता, तेव्हांपासून दगडू बाहेरच दाराजवळ झोंपायला लागला होता. त्याचं सारं लक्ष मात्र आंत असे आणि त्याला झोंप येत नसे. न जाणो, डोळा लागून जायचा आणि आपल्या घोरणामुळं कारभारीण जागी व्हायची म्हणून तो आपला रामचंद्राला घेऊन बाहेरच झोंपत असे. गेले दोन-तीन दिवस कारभारणीची तब्येत फारच खराब होती...ती गुंगल्यासारखी निश्चल पडून राह्यची .. आणि थोड्या वेळानं जागी होऊन लहान मुलासारखी कण्हायची... दगडू सारखा तिच्याजवळ बसून होता-दोन दिवस तो कामालाहि गेला नव्हता...

तो मनांतून फारच घाबरला होता. पण सकाळी तिला तिला हुशारी वाटली, आणि तिनंच सांगितलं म्हणून तो घराबाहेर पडला होता.

आजचा सारा दिवस चांगला गेला होता. फक्त मघा रामचंद्रानं सखूबाईचे शब्द सांगितल्याबरोबर त्याची पूर्वीची भीति जागी झाली होती...त्यानं चहा पिण्याचा प्रसंग आठवला...कारभारणीची शांत, साफ मुद्रा आणि तिचं मंद हंसणं व बोलणं त्यानं आठवलं...

त्याला वाटलं, आपल्याला उगीच भीति वाटली. त्यानं दाराजवळून लक्षपूर्वक कानोसा घेतला आणि मग समाधानानं डोळे मिटून घेतले...

गेल्या बरेच दिवसांत त्याला झोंप अशी मिळाली नव्हती. आणि कालपरवां तर त्यानं पापण्यासुद्धां मिटल्या नव्हत्या.... त्यावर आजची बाहेरची खूप मेहनत. त्याला वाटलं, आतां आपल्याला चांगली झोंप येईल; पण मघा जसं त्याला जेवण गेलं नाहीं तशी आतां झोंपहि येईना.

उघड्या डोळ्यांनीं तो वर आकाशाकडे पाहूं लागला... त्याच्या डोक्यांत विचार सुरूं झाले होते...

रामचंद्रानं हालचाल केली म्हणून त्याचं लक्ष त्याच्याकडे गेलं—आणि त्याला पहातांच दगडूला पुन्हा ते शब्द आठवले...

कारभारणीच्या मरणाच्या कल्पनेनं दगडू शहारला. पण लगेच त्याला तें खरं वाटेना. तिच्या मघाच्या बोलण्या-हंसण्यावरून तिला आतां दगा व्हायचा नाहीं असं त्याला वाटलं-पण मग सखूबाई असं कां बोलली ?...

या खेपेला कारभारीण फारच आजारी होती यांत शंकाच नव्हती. दगडूला नीट मोजून सांगतां आलं नसतं, पण तरी महिनाभर ती अंथरुणाला खिळून होती. दगडूला सारखं तिच्या जवळजवळ रहावं लागलं होतं. घरकामाचा सारा भार त्याच्यावर पडला होता. हातावरचं पोट भरतांना, रामचंद्राला भाकरतुकडा खाऊं घालतांना, आणि ह्यांनीं—त्यांनीं सांगितलेले काढे-पाले शिजवून, वांटून—कुटून कारभारणीला घालतांना दगडूची फार तारांबळ झाली होती.

नाहींतरी कारभारीण जरा नाजूकच होती. प्रथम ती जेव्हां दगडूबरोबर बाजारांत ओझीं उचलायला जायची तेव्हां दौल्या आणि करीम दगडूची नेहमी थट्टा करायचे. दौल्या
 दुष्ट स्वभावाचा होता. पण करीम मात्र फार सालस आणि

प्रेमळ होता. जेव्हां कांहीं काम नसेल आणि सारेजण एखाद्या झाडाखालीं बसलेले असतील तेव्हां दौल्या कारभारणीच्या पुढं पुढं करायचा. पण करीम दगडूच्या दंडाला लोंबकळून म्हणायचा, " मुकद्दम्, तुम्हारे हाथ गोश्त के हैं या लोहे के? तुम तो बिल्कुल शैतान जैसे दिखते हो!" त्यानं असं म्हटलं म्हणजे कारभारीण दगडूकडे हंसून पाहायची. मग करीम पुन्हा म्हणायचा, " और देख–मेरी मा कैसी फूल जैसी मुलाइम् नजर आती है!" यावर सगळेच हंसायचे. दगडू लाजून जायचा.

दगडूला आतां हें पुन्हा आठवलं. कारभारीण नाजूक होती यांत शंकाच नाहीं. विशेषतः त्याच्या मानानं ती फारच लहान दिसत असे. हेलकऱ्याच्या जातीला अशी मुलगी म्हणजे जरा नवलच. तिनं ओझीं उचलूं नयेत असं त्याला सारखं वाटे. पण ती ऐकायची नाहीं. वास्तविक रामचंद्रा झाला त्या वेळींच तिला खूप त्रास झाला होता. त्या आजारांतून उठल्यावर ती अगदीं फिकट, सुकलेली अशी दिसत होती. दगडूनं तिला सांगितलं होतं कीं तूं घरींच राहून भाकरतुकडा करीत जा, आपण एकटेंच काम करूं. तिनं हो म्हटलं होतं. दगडूला समाधान वाटलं होतं. पण कांहीं महिन्यानंतर त्याला एकदां दिसून आलं कीं, पोराला पाठीशीं बांधून ही खुशाल डोक्यावर ओझं घेऊन चाललेली. दगडू त्या वेळीं कांहीं बोलला नाहीं. पण घरीं आल्यावर त्यानं या प्रसंगाची जाणीव तिला करून दिली.

ती तोंडाला पदर लावून म्हणाली. " तुमी पाह्यलं जनुं?"

दगडू जरा रागांतच म्हणाला, " हां, आन ह्ये बरं नव्हं कारभारनी—"

ती पुन्हां हंसून म्हणाली, " आपला धंदाच नव्हं का ह्यो? मंग म्यां जनुं राजाच्या रानीवानी घरामंधीं बसून ऱ्हाऊं?" 

आणि ती मोठ्यानं हंसली. तिच्या उद्गाराची दगडूला मौज वाटली, पण तो तसाच राग दाखवीत म्हणाला, "हां, रानीवानी घरांत बसून ऱ्हा–ह्यो राजा करील समदं काम–"

नकळत केलेल्या कोटीनं दगडूला एकदम मनापासून हंसूं आलं होत. आणि मग दोघांच्या मनमोकळ्या हंसण्यांत सारा प्रसंगच विरून गेला होता...

दगडूला आतां हें सारं स्पष्टपणें आठवलं...

नंतर दगडूनं तिला आपल्याबरोबरच न्यायला सुरुवात केली होती...हो, आपल्या नकळत तिनं जायचं आणि न पेलण्यासारखीं ओझीं हालवायचीं, त्यापेक्षां बरोबर असलेली बरी–म्हणजे झेपतील असे तरी बोजे उचलत जाईल...

पण गेल्या तीन वर्षांत ती बरीच आजारी पडायला लागली होती. रामचंद्राच्या पाठीवर तिला दिवस गेले होते....आणि मधेंच ती धुपावली. नंतर तिला हीच संवय लागली. दोनदा झालं असं...आणि आतां असंच कांहींतरी होऊन गेल्या महिन्यापासून तिनं अंथरूण धरलं होतं...

दगडू तिचं सारं करी. चिरगुटं धुवीं...

सारा भार त्याच्यावरच पडला होता.

पण त्याला तिच्याजवळ बसून राहावं लागे. त्यामुळं काम हटलं. खरी पंचाईत ही झाली...

कोणाच्या सांगण्यावरून त्यानं गांवांतल्या वैद्याचं औषध दिलं होतं. त्यानं कांहीं फारसं बरं वाटलं नाहीं; पण दुसऱ्या खेपेला वैद्याला द्यायला पैसे नव्हते तर वैद्यानं औषध दिलं नव्हतं.

कारभारणीच्याबरोबर काम करणारी एक बाई होती. तिच्या सांगण्यावरून त्यानं तिला घरीं आणलं. दोघींचीं बराच

 वेळ बोलणीं झालीं...आणि नंतर तिनं कसला तरी पाला

आणून दिला. दगडू रोज तिच्याकडे जाऊन तो पाला आणीत असे आणि सांगितल्याप्रमाणें देत असे...

कारभारणीला जरा आराम पडला होता. पण गेल्या दोन दिवसांत पुन्हां कांहींतरी बिघडलं होतं.

आज मात्र बरं होतं, आणि आता संध्याकाळीं तर...

मग कशी दगावेल कारभारीण ?

दगडूच्या डोक्यांत विचार चालूच होते—

त्याला वाटलं, कांहीं होऊं तर नये....आणि झालं... व्हायचं असलं तर ...

आजचा दिवस त्याचा फार छान गेला होता.... ...अकल्पित चार रुपयांचं धन त्याच्या हातीं लागलं होतं...

आज सारं ठीक होईल. त्याला सगळं नीट करतां येईल. कुणाजवळ पैसे मागावे लागणार नाहींत–आणि मागणारा तरी कोणाजवळ ?...दौल्या दुष्ट आहे अगदीं. तो लागेल तें बोलतो. आणि करीम काय करणार बिचारा ? त्यांचीच म्हतारी आई दम्यानं मारायला टेकलेली होती...

आज चांगले पैसे हाताशीं आहेत...पुन्हां उभ्या जन्मांत असं नशीब लागतंय् कीं नाहीं कोणी सांगावं ?...

कांहीं झालं तर कारभारणीला घरांतच किती वेळ पडूं द्यायची ?...पण मग काय नुसती उचलून टाकायची ?... कोणाकडे भीक मागायची ?...छे...छे ..

त्यापेक्षां.. आजचा दिवस छान आहे...सारं कसं व्यवस्थित होईल...कदाचित् भटजीलाहि बोलावून मंत्र म्हणायला सांगतां येईल . त्याला दक्षिणा द्यायला पैसे आहेत आज....

आणि...

रामचंद्रानं चुळबूळ केली आणि तो झोपेंत ओरडला...

दगडूनं त्याला जवळ ओढलं आणि आपल्या विचाराच्या तंद्रींतच थोपटलं...

हो, रामचंद्रा कधींपासून जिलबीसाठीं हट्ट धरून बसला आहे–पोरच तो ! गेल्या महिन्यांत त्याला भाकरसुद्धां पुरेशी आणि वेळेवर देतां आली नाहीं...

आज सारं करतां येईल...

आज नशीब लागलं...चार रुपये हातीं आले...ते राहतीलच किंवा पुन्हा मिळतील याचा काय भरंवसा ?

दगडूनं अंधाऱ्या आकाशावरची दृष्टि खालीं वळवली. आपल्या मनांत आज हे काय भयंकर विचार येताहेत याची जाणीव होतांच तो इतका दचकला कीं त्याच्या तोंडांतून एक अस्फुट भीतीचा आवाज बाहेर पडला.

आपल्याच त्या आवाजानं तो पुन्हा दचकला. धडधडत्या छातीनं त्यानं आंतला कानोसा घेतला; पण इतक्या दुरून त्याला कसं काय ऐकूं येणार ?

दगडू उठला आणि हळूच आंत गेला.

खोलींतला दिवा विझला होता.

अंधारांतच त्यानं अंथरुणाकडे पाय वळवले. आणि तो कान देऊन ऐकूं लागला...

हें जमणार नाहीं असं वाटून तो दुसऱ्या कोपऱ्याकडे वळला. खापरपणतींत तेल टाकून त्यानं दिवा लावला आणि त्या उजेडांत तिथूनच कारभारणीकडे नजर टाकली.

ती अगदीं निश्चल होती. दगडूनं तिच्याकडे रोखून पाहिलं. तिचे डोळे अर्धवट मिटलेले होते. तोंड उघडं होतं. एका गालावरून गेलेला ओघळ जागींच सुकला होता...

जवळ येऊन, वांकून दगडूनं तिच्या नाकाजवळ कान नेला...टेकला...त्याला कांहीं ऐकूं आलं नाहीं

एकदम ढोरासारखं ओरडावं असं त्याला वाटलं...

पण कारभारणीला आवाज सहन होत नाहीं हें त्याला आठवलं...अपराध्यासारखं त्यानं तिच्याकडे पाहिलं.

तिच्या मुखावर नेहमींची हास्याची लकेर होती.

दगडू पुन्हा खालीं वाकला. त्यानं तिचे ओठ मिटले, हात छातीवर जुळवून ठेवले. पांघरूण वर ओढलं. दिवा उचलून वर तिच्या उशागती ठेवला. आणि त्या उजेडांतच पायांचा आवाज न करतां तो बाहेर आला.

त्याची छाती फुटायच्या बेतांत आली होती...सारं बळ एकवटून त्यानं दोन्ही हातांनीं छाती दाबून धरली...

पण बाहेरहि अजून अंधार होता...पुरं उजाडलं नव्हतं...

'अभिरुचि'
दिवाळी अंक १९४५

वाचनालय शाखा
वा. क्र. २६७१

IRBK-0102649

IRBK-0102649
IRBK-0102649


आवृत्ति [illegible]
[illegible]